धर्मग्रंथमाला

ॐ

१

# अद्वैतमीमांसा.

महादेव राजाराम बोडस एम्. ए.,

पुणें बुधवार पेठ

कुळकर्णी, गोखले आणि मंडळी.

सर्व अधिकार प्रसिद्ध करणारांकडे आहेत.

ॐ

धर्मग्रंथमाला

१

# अद्वैतमीमांसा.

( 'केसरी ' पत्रांत प्रसिद्ध झालेला लेख. )

योऽन्यथा सन्तमात्मानमन्यथा प्रतिपद्यते ।
किं तेन न कृतं पापं चौरेणात्मापहारिणा ॥

हें पुस्तक


**महादेव राजाराम बोडस एम्. ए.**


यांनीं लिहिलें तें


**कुळकर्णी, गोखले आणि मंडळीनें**

मालकाच्या परवानगीनें छापून प्रसिद्ध केलें.



( प्रसिद्ध करणारांनीं सर्व हक्क राखून ठेवले आहेत. )



पुणें १८९३.

पुणें येथें
“ आर्यभूषण ” छापखान्यांत छापिलें.

॥ श्रीगुरु ॥

# विनंति.

खुद्द आमच्या धर्मासंबंधानेंच आमच्या लोकांमध्यें फार अज्ञान पसरलें आहे. नुसते आमचे धर्मग्रंथ कोणचे असा साधारण लिहितां वाचतां येणाऱ्या माणसांना प्रश्न केला तर कोणाला यथोचित उत्तर देतां येत नाहीं असा प्रकार झाला आहे. त्याचा थोडाबहुत प्रतिकार करण्याकरितां धर्मसंबंधीं एकादें मासिकपुस्तक किंवा लहानशी ग्रंथ-माला प्रसिद्ध करावी असें माझ्या मनांत फार दिवस घोळत होतें; पण विद्वान् लोकांच्या साहाय्यावांचून हें काम घडणें अशक्य आहे व तें साहाय्य मिळण्याची मला आशा दिसेना यामुळें वरील हेतु जागच्याजागींच विलय पावतो कीं काय अशी भीति वाटूं लागली. इतक्यांत तीन महिन्यांपूर्वीं ‘ केसरी ’ वर्तमानपत्रांत ‘ अद्वैतमीमांसा ’ या सदराखालीं उत्तम लेख येण्यास सुरुवात झाली. तें पाहून बहुतेक नष्ट झालेली वरील आशा दुणावली; व लगेच संकल्प केलेल्या धर्मग्रंथमालेचें प्रथम पुष्प गुंफण्याला ही संधी बरी आहे असें जाणून ते लेख पुस्तकरूपानें प्रसिद्ध करण्याविषयीं केसरी-च्या मालकांची परवानगी विचारली; व ती त्यांनीं माझा सद्धेतु पाहून मोठ्या संतोषानें दिली, याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहें. तसेंच सदरहू लेख पुन्हा तपासून व शुद्ध करून देण्याचे श्रम घेतल्याबद्दल विद्वान् लेखकांचे-ही आभार मानणें जरूर आहे.

पुढील पुस्तकेंही सुप्रसिद्ध विद्वान् आंग्लसंस्कृत भाषाभिज्ञ गृहस्थांकडूनच लिहविण्याचा बेत आहे. तीं जसजशीं तयार होतील तशीं प्रसिद्ध करण्यांत येतील. या कामीं विद्वान् व अविद्वान् सर्व लोकांची सारखीच मदत पाहिजे आहे हें सांगावयाला नको. प्रस्तुत माला काढण्यांत द्रव्यप्राप्ति व्हावी हा मुळींच हेतु नसल्यामुळें कांहीं किफायत झाल्यास ती पुढील ग्रंथप्रकाशनाच्या कामीं खर्च करून ही माला स्वावलंबी व चिरस्थायी करण्याचा विचार आहे. सबब जितका लोकांकडून आश्रय मिळेल तितकें हें स्वधर्मरक्षणाचें काम अधिक झपाट्यानें चालेल. या मालेंत जीं पुस्तकें प्रसिद्ध होतील त्यांत जरी हिंदुधर्मसंबंधीं एक एका विषयाचें निरूपण होत जाईल; तथापि त्यांतील प्रत्येक मुद्यासंबंधानें लेखकच जबाबदार राहील हें येथें सांगून ठेवलें पाहिजे. शेवटीं स्वधर्माचा योग्य अभिमान बाळगणाऱ्या सज्जनांस माझी प्रार्थना एवढीच आहे कीं, त्यांनीं या आमच्या मालेस आश्रय देऊन ती चतुर व विद्वान् लोकांकडून गुंफली जाण्याला मदत करावी. या मालेंत गुंफण्यासाठीं जीं पुष्पें आणावयाचीं तीं त्या त्या विषयांत ज्यांनीं परिश्रम केले आहेत अशा पंडितांकडून मिळवून आणण्याचे प्रयत्न मला करावयाचे ते मी फार उत्साहानें करीनच; परंतु तो उत्साह कायम राहण्यास सुजनांकडून प्रोत्साहन पाहिजे. हें प्रोत्साहन कांहीं रकमा देऊन नको तर या मालेंतील पुष्पें जशीं बाहेर काढलीं जातील तसतशीं ग्रहण करण्याचें अभिवचन पाहिजे. ही प्रतिमासास निघणारी नव्हे. प्रत्येक पुस्तक पुरें छापून ग्राहकांकडे पाठवूं व त्याचें मूल्य खर्चाच्या मानानें अगदीं अल्प ठेवूं. तेवढें मूल्य द्यावें आणि पुस्तक हातीं घ्यावें. अशा तऱ्हेनें पुस्तक बाहेर पडलें कीं

खात्रीनें घेणारे लोक मिळाले कीं पुरे आहे. माझी तर अशी इच्छा आहे कीं प्रत्येक धर्माभिमानी कुटुंबांत हीं पुस्तकें दृ-ष्टीस पडावीं आणि असें झालें, तरच धर्माविषयीं जें अज्ञान आज अमावास्येच्या अंधाराप्रमाणें जास्त जास्त दाट पसरत चाललें आहे त्याचें निरसन होईल.

पुणें, ता० १३ जुलई सन १८९३ इ०. } विष्णु बाळकृष्ण गोखले.

# प्रस्तावना.

पुढील लेख ज्यावेळेस ‘ केसरी ’ पत्रांत येण्यास प्रारंभ झाला, त्यावेळेस ते पुढें स्वतंत्र पुस्तकरूपानें छापण्याचा प्रसंग येईल असें वाटलें नव्हतें. किंबहुना प्रथम प्रो० ड्यूसनच्या व्याख्यानावर टीकारूप तीन चार लेख लिहिण्याचाच मात्र विचार होता. पण पुढें विषय वाढत चालल्यामुळें तो बेत टाकून वेदांतप्रक्रियेंतील ठळक ठळक सिद्धांतांचें निरूपण करण्यांतच समाधान मानून घेणें भाग पडलें. प्रस्तुत लेखांत एकंदर विषयाची जुळणी संगतवार करतां आली नाहीं, व विवेचनही कित्येक ठिकाणीं अपुरें झालें आहे, वगैरे दोष मुख्यत्वेंकरून यामुळेंच राहिले आहेत. शिवाय, साधारण वाचकांना वेदान्तदर्शनाचें यथार्थ ज्ञान करून देणें हा या लेखांचा मुख्य उद्देश नसून, त्याविषयीं प्रस्तुतकाळीं जी अत्यंत अनास्था दिसून येते ती किंचित् तरी दूर व्हावी, व ब्रह्मविचारांची आधुनिक पिढीला गोडी लागावी एवढ्याच हेतूनें ते लिहिण्यांत आले. त्यांत पुष्कळ चुका राहिल्या असतील त्या दाखवून देणें विचारी लोकांचें काम आहे. तसेंच क्वचित् कोणाविरुद्ध कडक शब्दांचा उपयोग करावा लागला असेल तर ते या अति महत्त्वाच्या विषयाविषयीं वाटणाऱ्या कळकळीमुळें लेखनभरांत येऊन गेले असें समजून ती ती मंडळी विषाद मानणार नाहीं अशीही आशा आहे. सुदैवानें हे लेख ‘केसरी’च्या वाचकांस आवडले; इतकेंच नाहीं, तर जुन्या नव्या दोन्ही प्रकारच्या लोकांनीं त्यांचें अभिनंदन केलें ही गोष्ट विशेष आनंद मानण्यासारखी आहे. पुष्कळांनीं नानाप्रकारच्या सूचनाही केल्या. कोणाचें ह्मणणें सदरहू विषयावर स्वतंत्र व विस्तृत ग्रंथच ल्याहावा; एका धर्मशील गृहस्थानीं मासिक पुस्तक

काढावें असें सुचवून कायम वर्गणीदार होण्याचेंही कबूल केलें; कोणी ह्मणत प्रस्तुत अष्टाध्यायीलाच आणखी दोन तीन लेख जोडावे; व कित्येकांनीं असेंही सुचविलें कीं दुसरें कांहीं होत नसेल तर प्रो॰ **ड्यूसन**च्या व्याख्यानाचें समग्र भाषांतर तरी निदान द्यावें. अनेक कारणांमुळें प्रस्तुत पुनरावृत्तींत या सूचना अंमलांत आणतां आल्या नाहींत याबद्दल दिलगिरी वाटते; तथापि त्या कळविणाराचे आभार मानले पाहिजेत. वर्तमानपत्राच्या नेहमींच्या शिरस्त्याप्रमाणें हे लेख प्रथमतः फार घाईनें लिहिले गेल्यामुळें त्यांत पुष्कळ ठिकाणीं अपरिहार्य हस्तदोष व मुद्रणदोष राहिले होते ते मात्र दुरुस्त केले आहेत. तसेंच कित्येक ठिकाणीं अर्थस्पष्टीकरणार्थ अधिक मजकूर घालणें, छाटाछाटी करणें वगैरे बारीकसारीक फेरफारही करावे लागले आहेत; पण त्यांचा येथें स्थलनिर्देश करण्याची जरूर नाहीं. इंग्रजी वाक्यांचा व शब्दांचा ठिकठिकाणीं अर्थनिर्देश केला आहे; पण स्थलाभावामुळें संस्कृत वचनांचें मात्र सर्वत्र भाषांतर देण्यास सवड झाली नाहीं. असो; मुख्य गोष्ट सांगावयाची ती ही कीं, सदरहू लेखांनीं आमच्या जुन्या धर्मग्रंथांत काय आहे तें पहाण्याकडे व विशेषेंकरून वेदांतविचार करण्याकडे जर वाचकांची प्रवृत्ति होईल तरच प्रस्तुत पुस्तक प्रसिद्ध केल्याचें सार्थक झालें असें ह्मणतां येईल. यापेक्षां अधिक कामगिरीची असल्या छोटेखानी पुस्तकापासून आशा करणें कदापि रास्त होणार नाहीं. शेवटीं "यद्रोचते तद्ग्राह्यं यन्न रोचते तत्त्याज्यं" अशी सर्वांस प्रार्थना करून प्रस्तुत लेखांतील गुणदोषांचें विवेचन करण्याचें काम विद्वान् लोकांवर सोंपवितों.

# अद्वैतमीमांसा.

## प्रो. डय़ूसनचें व्याख्यान.

### अध्याय पहिला.

**"सर्वे वेदा यत्पदमामनन्ति तपांसि सर्वाणि च यद्वदन्ति ।
यदिच्छन्तो ब्रह्मचर्यं चरन्ति तत्ते पदं संग्रहेण ब्रवीमि ॥ "**

कांहीं दिवसापूर्वी एका यूरोपस्थ पंडिताच्या सहवासाचा अलभ्य लाभ पुण्यपत्तनस्थ जनांस मिळाला. **प्रोफेसर पाल डय़ूसन** ह्यांचा जरी दोन चार दिवसच येथें मुक्काम होता तरी तेवढ्या अवकाशांत त्यांनीं येथें बऱ्याच ओळखी केल्या; व त्यामुळें त्यांची विद्वत्ता, सौजन्य व शोधकबुद्धि चांगली प्रत्ययास आली. डा. **डय़ूसन** हे जर्मनींतील कील युनिव्हर्सिटींत तत्त्वज्ञानाचे आचार्य आहेत; व त्यांनीं अलीकडेच संस्कृत विद्येचा अभ्यास सुरू केला असल्यामुळें, इकडील लोकांस जरी त्यांचें नांव आजपर्यंत फारसें ऐकून माहीत नव्हतें, तरी यूरोपखंडांत **डय़ूसन**साहेबांच्या विद्वत्तेची पुष्कळ ख्याति आहे. त्यांचें पूर्ववृत्त फार मनोरंजक व बोधप्रद आहे. तरुणपणापासून ज्ञानार्जनाविषयीं त्यांना इतका कांहीं हव्यास असे कीं, केवळ इंग्रजी भाषा शिकण्याकरितां ह्मणून त्यांनीं मुद्दाम एका इंग्रजी बाईशीं लग्न लावलें; व त्यांच्या सुदैवानें ती बाईही हल्लीं त्यांच्याच तोडीची विदुषी झाली आहे. **डय़ूसन**-

साहेबांना स्वभाषेखेरीज इंग्लिश, फ्रेंच, स्पॅनिश, इटालियन संस्कृत वगैरे इतर भाषाही चांगल्या अवगत आहेत. संस्कृत भाषेचा अभ्यास करण्याकडे त्यांची प्रवृत्ति होण्यास फार चमत्कारिक कारण झालें, तें इकडील सुशिक्षित ह्मणविणाऱ्या तरुण मंडळीनें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. पूर्वीपासून तत्त्वज्ञानाकडे त्यांचा फार कल असल्यामुळें अतिप्राचीन ग्रीक तत्त्ववेत्त्यांपासून तों अर्वाचीन क्यान्ट हेगेल प्रभृति युरोपियन मतवाद्यांपर्यंत बहुतेकांचे ग्रंथ त्यांनीं वाचले; पण चित्ताचें समाधान होईना. जो तो आपलें ह्मणणें तेवढें खरें व बाकी सर्व मतें खोटीं, असें प्रतिपादन करी; परंतु प्रतिपक्षाच्या सर्व शंकांचें निवारण एकाच्यानेंही चांगलें होत नाहीं, अशी डच्यूसनसाहेबांची खात्री झाली. ईश्वराचें स्वरूप, जगाची उत्पत्ति, आत्म्याचें अमरत्व वगैरे गहन मुद्यांसंबंधानें अनेक परस्परविरुद्ध सिद्धांत सदृहू ग्रंथकारांनीं ठोकून दिलेले आढळतात; व जरी त्यांपैकीं कित्येकांत थोडाबहुत सत्याचा अंश सांपडतो तरी त्यापासून खऱ्या जिज्ञासूचें समाधान होण्याचा मुळींच संभव नाहीं, असें त्यांच्या लक्षांत आलें; व त्यामुळें त्यांच्या चित्तास फार उद्वेग झाला. एकादी यःकश्चित् वस्तु मिळविण्याकरितांही मनुष्य किती खटपट करितो, आणि दीर्घ प्रयत्न करूनही ती न मिळाल्यास त्याची केवढी निराशा होते, हें नित्य व्यवहारांत क्षणोक्षणीं दिसून येतें. मग ज्याच्यावर आपलें चिरकालिक सुख व आत्मिक शांति अवलंबून राहणार अशा अत्यंत दुर्लभ तत्त्वज्ञानाची इच्छा करणाऱ्या जिज्ञासूला तें न मिळाल्यास अतिशय उद्वेग होईल हें सांगावयास नकोच. मृगजलाच्या पाठीमागें शेंकडों कोस धांवत जाणाऱ्या हरिणाप्रमाणेंच डा० डच्यूसन यांची थोडीबहुत अवस्था झाली होती. त्यामुळें ह्या परस्परविरोधी मतवाद्यांच्या वादकलहापासून त्रिकालाबाधित सत्स्वरूपाचें कधीं-

ही ज्ञान होणार नाहीं असा त्यांचा ग्रह झाला. इतक्यांत सुदैवानें **शोपेनहोर** नामक शार्मण्य अद्वैतवाद्याचा ग्रंथ त्यांच्या सहज अवलोकनांत आला, व त्यावरून त्यांच्या बुद्धींत एकदम प्रकाश पडला. **शोपेनहोर**चे सिद्धान्त संस्कृत उपनिषदावरून घेतले असल्यामुळें **डच्यूसन**साहेबांना तीं उपनिषदें वाचण्याचीही उत्कट इच्छा झाली. व त्याकरितां त्यांनीं तावडतोब संस्कृत भाषेचा अभ्यास सुरू केला. हल्लीं त्यांना बहुतेक मुख्य उपनिषदें मुखोद्गत आहेत; इतकेंच नाहीं, तर वेदान्त ग्रंथाचें खरें रहस्य त्यांच्याइतकें युरोपिअन विद्वानांपैकीं फारच थोड्यांस समजत असेल. **शंकराचार्यां**च्या शारीरक भाष्याचें त्यांनीं जर्मन भाषेंत समग्र भाषांतर केलें असून वेदान्त सिद्धान्तांचें निरूपण करण्याकरितां दोन स्वतंत्र ग्रंथही लिहिले आहेत. हल्लीं पाश्चात्य तत्त्वज्ञानाचा संकलित इतिहास लिहिण्याचें त्यांच्या मनांत आल्यावरून जेथें जेथें आजपर्यंत निरनिराळ्या तत्त्वसांप्रदायांचा उगम झाला, असे सर्व देश प्रत्यक्ष पाहण्याचा त्यांनीं संकल्प केला. चार महिने हिंदुस्थानांतील सर्व ठिकाणें फिरल्यानंतर स्वदेशीं जाण्यापूर्वीं ह्या इतिहासप्रसिद्ध पुण्यपत्तनाचेंही एकवार दर्शन घ्यावें असें त्यांच्या मनांत आलें; व ह्मणूनच येथील लोकांस त्यांच्या भेटीचा लाभ झाला. यांचें व्याख्यान ऐकण्याची येथें पुष्कळांची इच्छा होती परंतु तो योग आला नाहीं. तथापि मुंबईच्या रॉयल एशिआटिक सोसायटीपुढें ता० २ फेब्रुवारी रोजीं वेदान्तावर त्यांनीं एक सुरेख निबंध वाचला. त्यावरून त्यांचीं कोणत्या प्रकारचीं मतें आहेत, व परजातीय असूनही हिंदुतत्त्वज्ञानाविषयीं त्यांना किती अभिमान वाटतो हें चांगलें ध्यानांत येईल. सबब प्रत्येक इंग्रजी जाणणाऱ्या इसमानें तो वाचावा अशी आह्मी शिफारस करून मराठी वाचकांकरितां त्यांतील ठळक ठळक मुद्दे मात्र येथें देतों.

संस्कृत विद्येच्या अभिवृद्ध्यर्थ मुंबईच्या एशिआटिक सोसायटीनें केलेल्या प्रयत्नाबद्दल तिचे आभार मानल्यानंतर **प्रोफेसर ड्यूसन** ह्मणालेः—हिंदुस्थानांतील लोकांनीं अद्वैतमताचें आजपर्यंत रक्षण केल्यामुळें पृथ्वीवर उत्तरोत्तर वाढत जाणाऱ्या नास्तिकपणाचा प्रतिकार करण्याचें चांगलें साधन उरलें आहे, याबद्दल आपण सर्वांनीं आनंद मानला पाहिजे. हिंदुस्थानांत आजपर्यंत पुष्कळ दर्शनें व मतें होऊन गेलीं पण त्यांपैकीं बहुतेक नामशेष झालीं, व हल्लीं आहेत त्यांमध्येंही शांकरमताइतका कोणाचाही प्रचार नाहीं ही गोष्ट त्या मताच्या सत्यत्वाविषयीं चांगली साक्ष देते. विशिष्टाद्वैत, द्वैत, शुद्धाद्वैत अशीं वेदान्ताचीं अनेक रूपांतरें झालीं आहेत; परंतु त्या सर्वांपेक्षां मूळ शांकरमताचाच विशेष प्रसार आहे. हल्लीं शंभर वेदांती घेतले तर त्यांत फक्त पंधरा रामानुज, पांच माध्व व पांच वाल्लभ सांपडतील, बाकीचे पंचाहत्तर शांकरमतानुयायी आहेत, ही गोष्ट मला एका विद्वान् रामानुज पंडिताकडून कळली आहे; तेव्हां ती खरी मानण्यास हरकत नाहीं. माझ्या मतें उपनिषदें व त्यावरील **शंकराचार्यांचीं** भाष्यें, **प्लेटो क्यांट** वगैरे पाश्चात्य तत्त्वज्ञान्यांच्या ग्रंथांची सहज बरोबरी करतील. उपनिषदांतील प्रत्येक वाक्य प्रमाणभूत मानलें गेल्यामुळें त्यांत जागोजाग आढळून येणाऱ्या परस्परविसंगत विधानांची एकवाक्यता करणें फार कठीण होतें; तथापि भाष्यकारांनीं फार खुबीदार रीतीनें ती एकवाक्यता केली आहे. ह्या बाबतींत ख्रिस्ती मतवाद्यांनीं **शंकराचार्यांचा** अवश्य कित्ता घ्यावा. ही खुबी इतकीच कीं, उपनिषद्भागाचें त्यांनीं निर्गुण किंवा पारमार्थिकी विद्या व सगुण अथवा व्यावहारिकी विद्या असे दोन विभाग करून, पहिली पंडितांकरितां व दुसरी साधारण लोकांकरितां अशी व्यवस्था केली; आणि अशा रीतीनें विसंगत भासणाऱ्या वचनांतील विरोध काढून टाकला आहे.

एकंदर औपनिषद सिद्धांतांचे व्याख्यात्यांनीं विषयभेदानें चार वर्ग केले. १. ब्रह्म, २. जगदुत्पत्ति, ३. आत्मा आणि ४. मुक्ति. ब्रह्मासंबंधानें अनेक तऱ्हेचीं काल्पनिक वर्णनें आढळतात. आकाश, आदित्यवासी पुरुष, अक्षिनिवासी पुरुष, विश्वरूप, जगदात्मा, ईश्वर, सुखदुःख, विभक्ता वगैरे अनेक नांवें ब्रह्माला दिलेलीं आढळतात. त्या सर्वांचा **शंकराचार्यांनीं** सगुणविद्येंत अंतर्भाव केला आहे. पण तिच्याहून श्रेष्ठ अशा निर्गुणविद्येंत परब्रह्माचें शुद्ध, बुद्ध, मुक्त, अनंत, अपार असेंच वर्णन केलेलें असतें. "यतो वाचो निवर्तन्ते अप्राप्य मनसा सह । अविज्ञातं विजानतां विज्ञातमविजानतां ॥" "नेति नेति" इत्यादि परविषयक वाक्यांनीं चिदात्म्याचें दुर्बोधत्व प्रतिपादिलेलें आहे. **वाष्कलीनें** ब्रह्मस्वरूपाविषयीं प्रश्न केला तेव्हां **बव्हानें** मौन स्वीकारलें यांतील भावार्थ हाच. **कयांट** नामक जर्मन तत्त्वज्ञान्याचेंही असेंच मत होतें. तथापि हें ब्रह्म आपल्यापासून दूर नाहीं, तर प्रत्येकाच्या हृदयांतच आहे. 'अहं ब्रह्मास्मि', मी ब्रह्म आहें, असा अनुभव मात्र झाला पाहिजे. हा ब्रह्मसाक्षात्कार केवळ समाधीनेंच होणारा आहे.

जगदुत्पत्तिसंबंधानेंही पर व अपर विद्या असे **शंकराचार्यांनीं** दोन विभाग केले आहेत. अविद्यामूलक संसार अपरविद्येचा विषय होय. सर्व बाह्य सृष्टीच्या ठिकाणीं केवळ व्यावहारिक सत्यत्व असून ती मायेच्या योगानें ब्रह्मावर आभासरूपानें भासते; तथापि संसाराला बीजांकुरन्यायानें अनादिच मानलें पाहिजे. एरव्हीं ईश्वरानें सृष्टि निर्माण कां केली ह्या प्रश्नाला समर्पक उत्तर कधींही देतां येणार नाहीं. जगत् उत्पन्न करण्यांत कर्त्याचा कांहीं तरी हेतु असला पाहिजे; पण तसा हेतु शुद्ध ब्रह्माच्या ठिकाणीं मुळींच संभवत नाहीं. झाड वाळून गेलें तरी बीज राहतेंच, व त्यापासून दुसरा वृक्ष उत्पन्न होतो.

त्याचप्रमाणें मनुष्य मेला तरी त्याचें कर्मबीज पुनर्जन्मास कारण होतें. येणेंप्रमाणें ही उत्पत्तिनाशाची अनादि परंपरा सतत चालत राहणार अशी हिंदुस्थानांतील व्यक्तिमात्राची दृढ समजूत झाली असल्यामुळें, ती आपत्काळीं मनाचें शांतवन करण्यास किती उपयोगीं पडते हें मीं तुम्हांस सांगावयास नको. परविद्येचा केवळ सच्चिदानंदस्वरूपी शुद्ध ब्रह्मच विषय आहे; आणि भासमान सृष्टि मृगतृष्णिकेप्रमाणें केवळ मायारूप आहे. या मायेचें नानाप्रकारच्या दृष्टान्तांनीं वर्णन केलें आहे. त्या सर्व दृष्टांतांत **शंकराचार्यांनीं** दिलेला स्वप्नाचा दृष्टान्त माझ्या मतें फारच समर्पक आहे. संसार स्वप्नवत् आहे ही कल्पना **पिंडार, सोफोक्लीज, शेक्सपीअर**प्रभृति अनेक पाश्चात्य कवींच्या काव्यांतून आढळते; पण तिचें खरें तात्पर्य **शंकराचार्यां**प्रमाणें कोणींही दाखविलें नाहीं. ह्या मायेचें सत्वरूपी ब्रह्मावर दाट आवरण पडलें असल्यामुळें आपणास त्याचा विसर पडतो. हें अज्ञान दूर होण्यास निदिध्यासपूर्वक आत्मानुभवच साधन होय; केवळ तर्क अकिंचित्कर आहे. **पार्मिनाईडिस** आणि **प्लेटो** या ग्रीक तत्त्वज्ञान्यांचें असेंच मत झालें होतें. ह्या बाबतींत **प्लेटोचे** सिद्धान्त आणि वेदान्त ह्यांचें निकट साम्य आहे; तथापि **प्लेटो** व **शंकराचार्य** या दोघांनाही आपल्या मतांची तर्कद्वारा बरोबर उपपत्ति करतां आली नाहीं. तें काम अर्वाचीन जर्मन ग्रंथकार **क्यांट** याणें केलें. दिशा, काळ व कार्यकारणभावसंबंध या वस्तु बुद्धीचे विकार आहेत, त्यांना बाह्यास्तित्व मुळींच नाहीं, ही गोष्ट **क्यांट** आणि त्याचा अनुयायी **शोपेनहोर** या दोघांनीं निर्विवाद सिद्ध केली आहे. येणेंप्रमाणें जगताच्या मिथ्यात्वाविषयीं हिंदुस्थानांतील **शंकराचार्य**, ग्रीस देशांतील **प्लेटो** व जर्मनींतील **क्यान्ट** या तिघां महात्म्यांचें पूर्ण ऐक्य असलेलें पाहून कोणास आश्चर्य वाटणार नाहीं !

आत्मस्वरूपासंबंधानेंही वरच्यासारखाच द्विधा विभाग केला आहे; जीवात्मा आणि परमात्मा. माझा आत्मा मला प्रत्यक्ष भासत असल्यामुळें तो मिथ्या नाहीं, व अद्वितीय ब्रह्माहून भिन्न असल्यामुळें त्याला सत्यही म्हणतां येणार नाहीं, असा उभयतः विरोध येतो. त्याचा परिहार करण्याकरितां व्यवहार-दशेंत जीवात्मा परमात्म्याहून भिन्न; पण परमार्थतः ते दोन्ही एकच, अशी **शंकराचार्यां**नीं सुरेख व्यवस्था केली आहे. जीवाला ब्रह्माचा अंश, किंवा विकार, किंवा ब्रह्माहून भिन्न मानणारे वाल्लभ, रामानुज, माध्व, वगैरे वेदांताचे मागून पोटभेद उत्पन्न झाले; परंतु त्या सर्वांच्या सिद्धांतांचें **शंकराचार्यां**नीं अगोदरच अनुवाद करून खंडण केलें आहे. तात्पर्य, जीव परमात्मस्वरूपच आहे, हाच सिद्धांत खरा होय. व तोच **शंकराचार्य, प्लेटो, प्लोटिनास, क्यान्ट, शोपेनहोर** या सर्वांस संमत झाला आहे. “ अहं ब्रह्मास्मि ” हें महातत्त्व सर्वांना कबूल आहे. पण **शंकराचार्य** बाकीच्यापेक्षां आणखी पुढें गेले आहेत. ते म्हणतात, जीवब्रह्माचा जर पूर्ण अभेद आहे, तर ब्रह्माप्रमाणें जीवही वस्तुतः निर्गुण निरहंकार असला पाहिजे. अर्थात् जरी संसारदशेंत जिवाच्याठायीं उपाधीमुळें अहंकारादि भासले तरी ते मिथ्या असल्यामुळें कधीं तरी नाहींसे होतील, आणि जीवाचा परब्रह्मांत पूर्ण लय होईल. ही मुक्तीची कल्पना मात्र वरील पाश्चात्य तत्त्वज्ञान्यांच्या डोक्यांत आली नव्हती. आतां ह्या उपाधि कोणत्या असा एक प्रश्न उद्भवतो. एकादश इंद्रियें, पंचप्राण व अहंकार अशा सतरा वस्तु मिळून बनलेल्या सूक्ष्म शरीराला उपाधि म्हटलें आहे. व जन्मजन्मांतरींच्या कर्मांच्या बळानें ही उपाधि आत्म्याला चिकटली असल्यामुळें जीवाला जन्ममरणादि परंपरा भोगावी लागते. ह्या उपाधीचें मूलकारण अविद्या होय. पण ती अविद्या आली कोठून हा प्रश्न राहतोच. येथें सर्व ग्रीक व

हिंदु तत्त्वज्ञानी निरुत्तर होतात; परंतु **क्यांटनें** मात्र त्याला समर्पक उत्तर दिलें आहे. तो म्हणतो, हा प्रश्नच उद्भवत नाहीं; कारण कार्यकारणभावसंबंध ही वस्तुच अविद्येनंतर उत्पन्न झाली असल्यामुळें अविद्येच्या पलीकडे ती शोधूं जाणें मूर्खपणा होय.

आतां मरणानंतर काय स्थिति होते याविषयीं दोन शब्द सांगून हा विषय पुरा करितों. ऋग्वेदांत स्वर्गनरकाची कल्पना आहे; पण अनादि संसाराची कल्पना मागून उत्पन्न झाली. ह्या दुसऱ्या कल्पनेप्रमाणें एका जन्मांतील पापपुण्याचें बक्षीस स्वर्गनरकासारख्या भिन्न लोकांत न मिळतां पृथ्वीवरच पुढच्या जन्मांत मिळतें. वेदान्त ग्रंथांतून ह्या दोन्ही कल्पनांची एकवाक्यता केली आहे. यज्ञयागादि पुण्यकर्मे करणारांना पितृयान, सगुण ब्रह्मोपासकांना देवयान, आणि पापी लोकांना एक मोघम 'तृतीय स्थान', असे तीन मार्ग सांगितले आहेत. पितृयानमार्ग चंद्रलोकाप्रत जातो, व तेथें कर्मफलभोग संपल्यानंतर तो जीव पुनः खालीं येतो. देवयानमार्गानें जाणारे सगुण ब्रह्मापर्यंत पोंचतात, पण तेथून पुनः परत येत नाहींत. आणि ज्यांना निर्गुण ब्रह्माचा साक्षात्कार झाला असेल ते येथल्या येथेंच मुक्त होतात. बाकी राहिलेल्या तृतीय स्थानालाच पुढें पुराणादिकांतून रौरव नरकादि नांवें प्राप्त झालीं. ह्या सर्व गोष्टी अर्थात् संसाराप्रमाणें व्यवहारदृष्टींत मात्र खऱ्या आहेत, परमार्थतः त्याही खोट्याच. शुद्ध ब्रह्माच्या दृष्टीनें विचार केला म्हणजे जन्ममरणादि ज्याप्रमाणें मिथ्या आहेत, तसाच मोक्षही मिथ्याच. " भिद्यते हृदयग्रंथिश्छिद्यन्ते सर्व संशयाः । क्षीयन्ते चास्य कर्माणि तस्मिन्दृष्टे परावरे ॥ " येणेंप्रमाणें एकदां परब्रह्मसाक्षात्कार झाला म्हणजे, जन्म नाहीं, मृत्यु नाहीं, संसार नाहीं व मोक्षही नाहीं. चांगलीं व वाईट दोन्ही प्रकारचीं कर्मे जीवाला बंधनकारक असल्यामुळें

टाकून दिलीं पाहिजेत, असें वेदान्ताचें मत आहे. येणेंप्रमाणें सदाचरणाचाही निषेध केल्याबद्दल कित्येक लोक वेदान्ताला दोष देतात; परंतु ही त्यांची चूक आहे. वेदान्तग्रंथांतून अतिश्रेष्ट नीति सांगितली आहे. ख्रिस्ती लोकांचें पवित्र शास्त्र स्वतःप्रमाणेंच शेजाऱ्यांवर प्रीति करा असें सर्व लोकांस सांगतें मात्र; परंतु सुखदुःखें केवळ मलाच भोगावीं लागत असतां मीं दुसऱ्यावर कां प्रीति करावी, असा प्रश्न केला असतां बायबलांत उत्तर मिळत नाहीं. तें अद्वैतवादी देऊं शकतो. कारण "तत्त्वमसि" ह्या महावाक्यानुसारें माझा आणि दुसऱ्याचा आत्मा वस्तुतः एकच आहे, भेद वाटतो तो मायामूलक आहे; तो नाहींसा करून दुसऱ्याला आपणासारखेंच मानणें हें प्रत्येकाचें कर्तव्य होय. आपपरभाव नष्ट झाल्यावर "न हिनस्त्यात्मनात्मानं" या भगवद्गीतावचनाप्रमाणें दुसऱ्यावर प्रीति कर असें निराळें सांगण्याची जरूरच नाहीं. अशी तादात्म्यबुद्धि ज्याची झाली तोच खरा जीवन्मुक्त होय; मग तो जगांत राहिला तरी त्याला संसारबाधा होत नाहीं. त्याचें शरीर जरी येथें असलें तरी तो ब्रह्मांत मिळून जातो. ज्याप्रमाणें नद्या अनेक दिशांनीं वाहात येऊन समुद्रांत मिळाल्यावर स्वतःचें नामरूप टाकून देतात, त्याचप्रमाणें विद्वान् पुरुषही जीवभाव टाकून ब्रह्मरूप होतो. ह्यावरून अत्यंत उदात्त व शुद्ध मतापासून इहलोकींच्या कष्टमय संसारयात्रेंतून समाधानवृत्तीनें पार पडून जाण्यास किती साहाय्य होतें ह्याची सहज कल्पना होण्यासारखी आहे. सुदैवानें हिंदुलोकांना हें अमोल तत्त्वज्ञान प्राप्त झालें आहे त्याचा तुह्मी अव्हेर करूं नका. असा ड्यूसनसाहेबांनीं शेवटीं सर्व लोकांस आग्रहपूर्वक उपदेश केला. तो सर्वांनीं व विशेषेंकरून आमच्या पुरातन धर्माचा उपहास करणाऱ्या अर्वाचीन पंडितंमन्यांनीं ध्यानांत ठेवण्यासारखा आहे. **डा. ड्यूसन**सारखा युरोपियन गृहस्थ अतिप्रयासानें वेदान्त-

ग्रंथांचें अध्ययन करून त्यांतील तत्त्वज्ञानानें आपल्या चित्ताची शांति करून घेतो; इतकेंच नाहीं, तर शेंकडों कोसांवरून हिंदुस्थानांत येऊन आम्हांलाही तसाच उपदेश करितो, हें त्याला जितकें भूषणावह आहे तितकेंच आम्हांला लाजिरवाणें आहे. परकीयांनीं आमचीं पोथ्यापुस्तकें घेऊन जावीं, वेदादिकांचें पठण करावें; त्यांतील रहस्य समजून घेऊन आमच्या पूर्वजांचे गुणानुवाद गावे, व आम्हीं मात्र त्याच पूर्वजांचा उपहास करावा, त्यांचे ग्रंथ वाण्याकडे पाठवावे व परकीयांच्या दिखाऊ आचारविचारांस भुलून स्वेच्छाचारी बनावें, हें पाहून कोणालाही खेद वाटल्यावांचून राहणार नाहीं.

**डा० डयूसन**साहेबांनीं आम्हांस कांहीं नवीन गोष्टी सांगितल्या असें नाहीं. तथापि आमचा आम्हांसच विसर पडल्यामुळें त्या आतां नवीन भासूं लागल्या आहेत. स्वतःचें तोंड दिसत नसल्यामुळें जशी आरशाची जरूर लागते त्याचप्रमाणें आमचींच शास्त्रें युरोपिअन लोकांपासून शिकण्याची आम्हांस आतां पाळी आली आहे ! एका अर्थी हेंही इष्टच मानलें पाहिजे. जे सिद्धांत मूळ संस्कृत ग्रंथांत असतांना कवडीमोल वाटतात तेच एकाद्या गोरकायाच्या तोंडून व इंग्रजीसारख्या पवित्र भाषेंत ऐकले म्हणजे आमच्या सुशिक्षित लोकांस ग्राह्य वाटतात ! अशी चमत्कारिक स्थिति झाली असल्यामुळें, **डयूसन**-सारख्यांनीं येथें येऊन आम्हांस आमच्याच अद्वैतमताचा उपदेश केल्याबद्दल त्यांचे आभार मानणें जरूर आहे. असो. ह्या अत्यंत महत्वाच्या विषयाकडे आजपर्यंत फार दुर्लक्ष झालें; सबब तो हातीं घेण्याचें आम्हीं योजिलें आहे. प्राचीन वेदांतसिद्धांतांची आधुनिक विचारांशीं एकवाक्यता करण्याचा आमचा मुख्य उद्देश आहे. पुढील विवेचनांत कोठें अभिनवत्व असल्यास त्याची जबाबदारी आमच्यावरच आहे हें येथें सांगावयास पाहिजे असें नाहीं.

# धर्मसुधारणेचा समेट.

## अध्याय दुसरा.

**वेदान्तविज्ञानसुनिश्चितार्थाः संन्यासयोगाद्यतयः शुद्धसत्वाः ॥ ते ब्रह्मलोकेषु परान्तकाले परामृताः परिमुच्यन्ति सर्वे ॥**

मुण्डकोपनिषत्.

पंचदशीकारांनीं सांगितलेल्या ' दशमस्त्वमसि ' दृष्टांतांतील आपणांस विसरणाऱ्या दीड शहाण्या गृहस्थाप्रमाणें सध्यां आमची स्थिति झाली आहे. दहा असामी नदींतून पोहून गेल्यावर सर्व सुरक्षित आले कीं नाहीं हें पाहण्याकरितां त्यापैकीं प्रत्येकजण स्वतःला सोडून नऊ जणानांच मोजी. येणेंप्रमाणें नऊ असामीच जिवंत आहेत, व कोणी तरी एक नदींत बुडाला असें समजून सर्वजण दुःख करूं लागले; पण कोण हरवला हें एकालाही उमगेना. अशी हल्लीं धर्मांच्या बाबतींत आह्मा हिंदुलोकांची अवस्था झाली आहे. खांद्यावर मुलगा असून गांवभर धुंडाळणाऱ्या बापाप्रमाणें, अत्यंत शुद्ध उदात्त व सत्य अशीं धर्मतत्त्वें आमच्या हस्तगत असतां आम्हीं परकी धर्मांत व विदेशी तत्त्वज्ञान्यांच्या ग्रंथांत त्यांचा शोध करूं लागलों आहों. हंसक्षीरन्यायानें हरएक धर्मांतील चांगला तेवढा अंश ग्रहण करण्याचा आव घालणारे समाजिष्ट पितृपितामहागत हिंदुधर्माला मात्र वगळतात; त्याचप्रमाणें धर्ममात्राचा उपहास करणारी आमच्यापैकीं होतकरू नास्तिक मंडळी मिल्ल स्पेन्सरादिकांचें कोरडें गौरव करण्यांत गुंग होऊन, त्याच विषयासंबंधानें आमच्या प्राचीन ऋषिवर्यांनीं काय सिद्धांत काढले आहेत ते पाहण्यास मुदलींच

विसरते. तत्त्वशोधनाची इच्छा करून सर्व जगावरील धर्मपुस्तकें पुष्कळजण पालथीं घालीत आहेत; पण आमच्या प्राचीन श्रुतिस्मृत्यादिकांच्या पोथ्याही कसरीच्या तोंडून सोडविण्याकडे कोणाचें लक्ष जात नाहीं! व ही स्थिति आधुनिक आंग्लविद्याविभूषित लोकांतच आढळते असें नाहीं, तर जुन्या हिंदुधर्माभिमानी म्हणविणाऱ्या पुराणप्रिय गृहस्थभिक्षुकमंडळींत देखील तितकीच किंबहुना त्याहूनही अधिक अनास्था दृग्गोचर होते. ह्या दुसऱ्या प्रकारच्या लोकांत तोंडी धर्माभिमानाची रेलचेल असते; पण हिंदुधर्मातील रहस्य स्वतः समजून घेण्याविषयीं किंवा इतरांना समजून देण्याविषयीं प्रयत्न करण्याच्या नांवानें मात्र पूज्य! एका वर्गाला हिंदुधर्म ह्मणजे पुराणांतल्या भाकडकथा व हरएक सामाजिक व्यंगांचें माहेरघर वाटणार; तर दुसरा वर्ग आमचा सर्व धर्म खाण्यापिण्यांत व निजण्याउठण्यांतच येऊन बसला आहे असा आग्रह धरणार. खंडोबापुढें नारळ ठेवण्यास सांगतो ह्मणून एकाच्या दृष्टीनें तो कुचकामाचा ठरतो, व चहाच्या पेल्यांत धर्म बुडाल्याबद्दल दुसरा आक्रोश करतो. एकूण बिचाऱ्या हिंदुधर्माची दोन्ही घरच्या पाहुण्याप्रमाणें मधल्यामध्यें हेळसांड होत आहे! हिंदुधर्मातील बीज काय, त्यांतील प्रधानभूत सिद्धांत कोणते, व आनुषंगिक कोणते, आमच्या श्रुतिस्मृत्यादि आर्ष ग्रंथांचें तात्पर्य काय, खऱ्या हिंदूंचीं कर्तव्यें काय, चालू प्रचारांपैकीं शास्त्रविहित कोणते व गर्हित कोणते, तसेंच आवश्यक कोणते व वैकल्पिक कोणते, वगैरे गोष्टींचा विचार करून वेळोंवेळीं धर्माला चालन द्यावें लागतें ही गोष्ट एकाही पक्षाच्या अजून ध्यानांत येत नाहींसें दिसतें. मळीण झालेल्या सुवर्णपात्राला मृद्भाण्ड समजून एकजण तें फेंकून देतो, व दुसरा त्याचा भलत्याच कामीं उपयोग करतो, इतकाच काय तो दोन्ही पक्षांत भेद आहे; बाकी खऱ्या सुवर्णाची परीक्षा एकालाही नाहीं. ज्या

भरतखंडांत याज्ञवल्क्य जनकादिकांसारखे महायोगी आत्मानात्मविचार करण्यांत आयुष्यें घालवीत असत, तेथेंच आतां खायपेयासारख्या क्षुल्लक बाबतींकरितां तुंबळ रणें पडूं लागलीं आहेत, हें पाहून कोणास वाईट वाटल्यावांचून राहणार नाहीं! रिकामटेंकड्या येशुपुत्रांनीं आपल्या तुटपुंज्या धर्मज्ञानाची शिदोरी सात समुद्रांपलीकडून येऊन आह्मांपुढें मांडावी, व आह्मीं आपलें स्वतःचें सर्व भांडार कडीकुलुपांत अडकवून ठेवून हताश होत्साते विधर्मीयांच्या निंदा व उपहास निमूटपणें सोशीत बसावें ह्यापेक्षां आमच्या अजागळपणाचें दुसरें चिन्ह तें कोणतें! वस्तुतः आह्मींच आपल्या स्वतःची ओळख विसरलों तर दुसऱ्यांनीं तरी ती कां ठेवावी! ख्रिस्ति, मुसलमान, बौद्ध, वगैरे सर्व धर्मांचे लोक स्वमतप्रसारार्थ उद्योग करीत असतां आह्मी हिंदुधर्माचा प्रसार तर राहिलाच, पण बचाव करण्यापुरतेंही त्याचें ज्ञान संपादन करीत नाहीं! विधर्मीयांनीं हिंदुधर्मावर आणलेल्या अक्षेपांना समर्पक उत्तर देणें तर एकीचकडे; उलट शुष्क ग्रामण्यांनीं आपआपसांत कलह माजवून जगापुढें आपल्या मूर्खपणाचें बडें प्रदर्शन मात्र आह्मी मांडतों; आणि तेणेंकरून आपणच आपला उपहास करून घेतों. इतरांबरोबर शर्यतींत पळावयाचें सोडून उलट आपले हातपाय तोडून टाकण्यासारखेंच हें कृत्य नव्हे काय! **मोक्षमुल्लर** भट्टानीं आमच्या वेदाचा अर्थ आह्मांस शिकवावा, व **आल्काट** **ड्यूसन** **कटर**प्रभृति गौरकायांनीं हजारों कोसांवरून येथें येऊन हिंदुधर्माची प्रशंसा करावी; आणि आह्मीं मात्र आह्मांला शास्त्र कळत नाहीं असें मोठ्या डौलानें भर सभेंत सांगावें, किंवा इतरांनीं केलेल्या प्रशंसेस आमचा धर्म अगदीं अपात्र आहे असें आपल्याच वाणीनें नाहीं तर आचरणानें जगास विदित करावें, हा सृष्टिविरुद्ध क्रम आमच्या मतें फक्त हिंदुस्थानांतच सांपडेल. इतर सर्व लोकांना आपापल्या बऱ्या वाईट धर्माचा

अभिमान असतो; पण आह्मांला फाल्गुन वद्य प्रतिपदे-प्रमाणें आपलें नैसर्गिक सुंदर शरीर मुद्दाम चिखलानें माखण्यांतच हौस वाटते. तात्पर्य 'आपुळें आपणचि ओळखावें' ह्या साधुवचनाचा उपदेश आमच्यांतील जुन्या नव्या सर्व लोकांच्या मनावर ठसेल असा कांहीं तरी उपाय योजणें अत्यंत अवश्यक झालें आहे. "आत्मज्ञानविहीना मूढास्ते पच्यन्ते नरकनिगूढाः" ही आचार्योक्ति प्रत्येकाच्या अंतःकरणावर बिंबल्याशिवाय परवशतेपेक्षांही अधिक दुःसह अशा स्वतिरस्कारपूर्वक परानुकरणप्रवृत्तिरूप नरकापासून आमची कधींही सुटका व्हावयाची नाहीं. व ह्याच उद्देशानें **प्रो. ड्यूसन-**साहेबांच्या सुंदर व्याख्यानाचा सारांश आह्मीं मागील भागांत दिला होता. परंतु तें व्याख्यान केवळ तत्त्वप्रतिपादक असल्यामुळें तेवढ्यानें सर्व प्रकारच्या लोकांचें व विशेषेंकरून आधुनिक सुशिक्षित ह्मणविणाऱ्या वर्गाचें समाधान होण्याचा संभव नाहीं. सबब हिंदुधर्माचा शिरोभूत जो वेदांत त्याचें उत्तमत्व दाखविण्याकरितां कांहीं लेख लिहिण्याचें आह्मीं योजलें आहे.

प्रथमतः कोणी अशी शंका काढील कीं, आजपर्यंत हजारों संस्कृत प्राकृत ग्रंथांतून ह्या विषयाचा काथ्याकूट झाला असतां पुनः हा विषय हातीं घेण्याचें प्रयोजन काय? छांदोग्यादि उपनिषदांच्या काळापासून तों अलीकडील बायाबापड्यांस उपदेश देणाऱ्या हरदास पुराणिकापर्यंत कोट्यावधि लोक वेदांत विषयाचें पिष्टपेषण करीत आले आहेत; शेंकडों मतांतरें उपस्थित होऊन त्यांच्या वितंडाकलहानें ग्रंथचे ग्रंथ भरले आहेत; व हल्लीं कलियुगांत तर फाल्गुनोत्सवांतील बालकांप्रमाणें जिकडे तिकडे वेदांत्यांच्या सुळसुळाट झाला आहे. तेव्हां ह्या कंटाळवाण्या झालेल्या विषयासंबंधानें तुह्मी आणखी नवें तें काय सांगणार? असा कोणी प्रश्न केल्यास तो अगदींच गैर होईल असें नाहीं. त्याला आमचीं अनेक उत्तरें आहेत. एक

तर वेदांतग्रंथांतून जरी ह्या विषयाचें पुष्कळ विवेचन असलें तरी ते ग्रंथ समजून वाचणारे हल्लीं क्वचितूच आढळतात. प्रत्येक ख्रिस्तधर्मानुयायी मनुष्य दर रविवारीं बायबलाची आवृत्ति करतो; पण जन्मांतून एकदां तरी भगवद्गीता मुळांतून नाहीं तर भाषांतरद्वारा वाचलेले आमच्यांत किती आढळतील ! हरदासाचा वेदांत तर आख्यानांत व पेटीच्या सुरांत अलीकडे लुप्तप्रायच झाला आहे. आणि पुराणिकबुवानींही तांदुळ सुपारी देखील मिळेनाशी झाल्यामुळें हळुहळु पोथी गुंडाळण्याचाच मार्ग स्वीकारला आहे. दुसरें, वरील ग्रंथांतील विचारप्राचुर्यच कांहीं अंशीं त्यांच्या मुख्य उद्देशाला विघातक झालें आहे. कारण तेणेंकरून पूर्वपक्षोत्तरपक्षरूपी तर्कजालांच्या भाराखालीं मुख्य सिद्धांत अजिबात लोपून जाऊन अवांतर मुद्यालाच फाजील महत्व आलें आहे. त्यामध्यें महावाक्यचतुष्कापेक्षां पंचाहुती प्रतिपादक वाक्यांचा अधिक विचार आढळतो, व सगुणोपासनेचें फाजील बंड वाढविलें असल्यामुळें निर्गुणब्रह्मापर्यंत जाऊन पोंचणें बिचाऱ्या मुमुक्षूंस फार अवघड जातें. तेव्हां हें माजून वाढलेलें कोटिकर्माचें जंगल तोडून टाकून आद्यसिद्धांत लोकांच्या मनावर बिंबविणें प्रस्तुतकाळीं फार अगत्याचें झालें आहे. पञ्चख्यातिवाद, अजातवाद, षट्प्रमाणवाद इत्यादि प्राचीनदर्शनकारांमधील वादविषयक अवांतर मुद्यांचा जो सविस्तर ऊहापोह केलेला आढळतो, त्यांतील बराच भाग अलीकडील शास्त्रीय शोधांनीं गतार्थ झालेला आढळेल, सबब त्याला फांटा देऊन नवीन उद्भवणाऱ्या शंकांना नवीन समाधानें तयार केलीं पाहिजेत. पण आज हा विषय हातीं घेण्याचें मुख्य कारण हल्लींच्या काळीं त्याचें ज्या तऱ्हेचें विवेचन जरूर आहे तसें तें वरील ग्रंथांतून मुळींच केलेलें नाहीं, व केलें जाण्याचा संभवही नव्हता. ज्या वेळेस हरएक बाबतींत वेदवाक्य प्रमाण मानलें जात होतें, तेव्हां प्रत्येक उपनिषद्वाक्याचा अद्वैतांत समन्वय करणें ठीक

होतें; व एकादशसूत्रीनें पूर्ण ब्रम्हज्ञान होईल हें ह्मणणेंही अंशतः बरोबर होतें. पण अर्वाचीन तार्किकापुढें तें सर्व पांडित्य निरुपयोगीं होय. तसेंच प्रस्तुतकाळीं अद्वैतमताची सत्यता व उत्तमत्व दाखविण्याकरितां त्याची इतर धर्मांशीं व तत्त्वज्ञानांशीं तुलना केली पाहिजे; इतकेंच नाहीं, तर त्याचा ऐतिहासिकदृष्ट्या, व नैतिकदृष्ट्याही विचार केला पाहिजे. पण हें प्राचीन ग्रंथांत मुळींच नाहीं. त्याबद्दल त्या ग्रंथकारांना दोष देतां येणार नाहीं हें खरें; कारण त्याची त्यांना जरूरच भासली नव्हती. पण हल्लीं असल्याच विवेचनाला विशेष मान आहे. तेव्हां जर अद्वैतमताचें महत्व आधुनिक लोकांच्या मनांत ठसविणें इष्ट असेल, तर ह्या नवीन बाजूनें त्याचा विचार करणें अत्यंत आवश्यक आहे, असें कोणीही कबूल करील. हें काम सविस्तर रीतीनें व यथायोग्यपणें बजावण्यास कोणी महान् तत्त्ववेत्ता आमच्यांत उत्पन्न झाला पाहिजे, किंवा निदान अनेक विद्वानांचा त्या कामीं सहोद्यम तरी पाहिजे. वर्तमानपत्रकारांसारख्यांना तितका अवकाश नाहीं व योग्यताही नाहीं. तथापि ह्या अत्यंत महत्वाच्या विषयाकडे लोकांचें लक्ष लागण्यास कोणी तरी पुढाकार घेतलाच पाहिजे. सबब त्याचें यथामति दिग्दर्शन मात्र करण्याचा आह्मीं पत्कर घेतला आहे.

आमचा पहिला सिद्धांत हा कीं, औपनिषदर्शन हेंच हिंदुधर्माचें यथार्थ व शुद्ध स्वरूप होय. व तें श्रीशंकराचार्यप्रणित ग्रंथांत दाखविलें आहे तसेंच घेतलें पाहिजे. कर्मकाण्ड, भक्ति, ह्यांसारखे ईश्वरोपासनेचे स्वतंत्र मार्ग, सांख्य, तार्किक, माध्व वगैरे द्वैतप्रयुक्त दर्शनें, व रामानुज, वाल्लभ वगैरे अद्वैत मताचीं रूपांतरें, इत्यादि हिंदुधर्माखालीं मोडणारे अनेक पंथ पूर्वी होते, व अजूनही शेंकडों आहेत. पण एक तर प्रस्तुत प्रसंगीं धर्माच्या आद्यसिद्धांतासंबंधानेंच आह्मांला विचार कर्तव्य असल्यामुळें अवांतर मुद्यांवरील मतभेदामुळेंच उत्पन्न झालेल्या

ह्या इतर पंथांचा उल्लेख करण्याची जरूर नाहीं; व दुसरें त्या सर्वांपेक्षां शांकरमतच श्रेष्ठ व ह्मणून हिंदुधर्माचें शुद्ध स्वरूप मानलें जाण्यास कां पात्र आहे याला पुष्कळ कारणें देतां येतील. उदाहरणार्थः—

१ शांकरमताइतकें दुसरें कोणतेंही दर्शन किंवा पंथ सर्व हिंदूंनीं पूज्य मानलेल्या श्रुतिस्मृत्यादि ग्रंथांशीं संगत नाहीं; व **शंकराचार्यां**प्रमाणें दुसऱ्या कोणत्याही आचार्यांनीं एकंदर श्रुतिवाक्यांची समाधानकारक एकवाक्यता केलेली नाहीं.

२ मन्वादि इतर आचार्यांना पुष्कळदां स्वमतपुष्ट्यर्थ श्रुतिवाक्यांचा आधार न मिळाल्यामुळें पुराणादि पौरुषेय ग्रंथांतून वचनें द्यावीं लागतात तसा **शंकराचार्यांना** कधींही प्रसंग येत नाहीं. त्यांच्या प्रत्येक विधानाला आधारभूत श्रुतिवाक्य आढळतें.

३ शांकर सांप्रदायांत जितके भामती पंचदशीसारखे सर्वमान्य ग्रंथ, व **सुरेश्वर हस्तामलक विद्यारण** प्रभृति विद्वान् ग्रंथकार होऊन गेले तितके दुसऱ्या पंथांत झाले नाहींत.

४ इतर सर्व पंथांपेक्षां शांकरमत अधिक प्राचीन व व्यापक आहे इतकेंच नाहीं, तर हल्लींही **ड्यूसन**साहेबांनीं ह्मटल्याप्रमाणें एकंदर हिंदूंपैकीं शेंकडा पाऊणशें किंबहुना अधिक लोक शांकरमतानुयायी सांपडतील.

५ धर्म संबंधानें उद्भवणाऱ्या प्रश्नांचा **शंकराचार्यांनीं** जितका पूर्ण व्यापक व समाधानकारक विचार केला आहे तितका इतर संप्रदायग्रंथांत तर नाहींच, पण खिस्ती, बौद्ध वगैरे परकी धर्मांतही क्वचितच केलेला सांपडेल. त्यामुळें बाकीचे संप्रदाय शांकरमताचीं केवळ अर्धवट व अपूर्ण रूपें असल्यासारखीं दिसतात.

६ अधिकारी भेदानें सर्वांचा अंतर्भाव करण्याची व काल-स्थलानुरूप संकोच विकास पावण्याची शांकरसिद्धांताप्रमाणें

इतर पंथांत किंबहुना पृथ्वीवरील दुसऱ्या कोणत्याही धर्मांत शक्ति नाहीं.

तात्पर्य धर्माच्या चिरस्थायित्वाला आवश्यक असलेला जो लवचीकपणा तो अद्वैत मतांत पूर्णपणें भरला असल्या-कारणानें इतर संप्रदाय नष्ट झाले किंवा होण्याच्या मार्गास लागले तरी अद्वैत मत येथें अजून जिवंत आहे; इतकेंच नाहीं तर अन्य देशांतूनही पसरत आहे. ह्मणूनच आह्मीं त्याला आद्यस्थान दिलें, व इतर धर्मांशीं तुलना केली असतां हिंदुध-र्माकडे जें श्रेष्ठत्व येतें तें त्याच्या योगानेंच. इतर सुधारले-ल्या देशांत धर्म आणि तत्त्वज्ञान ह्यांमध्यें नेहमीं लढाई चालू असते, व जसजसा विद्याप्रसार वाढत जातो तसतसें तत्त्वज्ञा-नाचें पाऊल पुढें सरकून धर्माचा पाडाव होतो; परंतु आमच्या-दूरदृष्टि ऋषींनीं अद्वैतरूपी उदात्त तत्त्वज्ञानाच्या पायावर हिं-दुधर्माची सर्व इमारत उठविल्यामुळें सदर्हू विरोध नाहींसा हो-ऊन लढाईचें मूळच अजीबात खुंटलें. व तेणेंकरून विद्याप्र-साराबरोबर तत्त्वज्ञानाचा व धर्माचाही सारखाच उत्कर्ष होत गेला. हिंदुस्थानच्या व इतर देशांच्या सुधारणेतिहासांत मो-ठा फरक दिसून येतो तो येथेंच. ख्रिस्ती, मुसलमानी देशां-तून धर्म व सुधारणा ह्यांचें व्यस्त परिमाण असतें, पण हिंदु-स्थानांत त्या दोघांचें परस्परांस आजपर्यंत साहाय्यच होत आ-लें आहे व पुढेंही होईल. हिंदुलोक सर्वांच्या अगोदर सुधार-णेच्या शिखरास जाऊन पोंचले ह्याला जसा त्यांचा श्रेष्ठ धर्म कारण झाला, तसेंच अजूनही इतर राष्ट्रांपेक्षां ते अधिक धार्मिक आहेत ह्याला त्यांचा धर्मभोळेपणा किंवा मूर्खपणा नि-मित्त नसून प्राचीन सुधारणाच कारण झाली असें सूक्ष्म वि-चारांतीं दिसून येईल.

सारांश धर्म आणि सुधारणा ह्यांच्यामध्यें इतर देशांत जसा विरोध आढळून येतो तसा येथें नाहीं, हा महासिद्धांत

आमच्यांतील प्रत्येकानें ध्यानांत ठेवला पाहिजे. तो न उमगल्यामुळेंच धर्माभिमानी व सुधारक असा हल्लीं मिथ्या भेद उत्पन्न झाला आहे. सुधारणा झाली असतां धर्म बुडेल अशी जुन्या लोकांची समजूत झाली आहे, व हिंदुधर्म आपल्या सुधारणेला आड येतो असें सुधारकांना वाटतें. पण हे दोन्ही ग्रह वस्तुतः चुकीचे आहेत. कारण अद्वैतवाद्यांच्या मताप्रमाणें द्वैतमात्र मिथ्या असल्यामुळें हिंदुधर्म आणि सुधारणा ह्यांचेंही पूर्ण तादात्म्य मानलें पाहिजे. "यत्र हि द्वैतमिव भवति तदितर इतरं पश्यति" ( जेथें द्वैतभाव भासतो तेथें एक दुसऱ्याला निराळा पहातो ) हें तत्त्व प्रस्तुत विषयांतही लागू पडेल. तात्पर्य आमच्यांतील जुन्या नव्यांचा कलह मोडून टाकून अद्वैतप्राप्ति करून घ्यावयाची असेल तर हा धर्मसुधारणेचा विरोध मिथ्या आहे, व वस्तुतः दोघांची एकमेकाला अतिशय जरूर आहे अशी जुन्या नव्या प्रत्येक मनुष्यानें आपली खात्री करून घेतली पाहिजे.

---

## अद्वैत मताचा इतिहास.

### अध्याय तिसरा.

को अद्धा वेद क इह प्रवोचत्कुत आजाताकुत

इयं विसृष्टिः ॥ अर्वाग्देवा अस्य विसर्जनेनाथा को

वेद यत आबभूव ॥ १ ॥

ऋग्वेद मं. १० सू. १२९ ऋ. ६.

मागील भागांत अद्वैत मत हेंच हिंदुधर्माचें खरें स्वरूप आहे

असा सिद्धांत स्थापन केला. व माध्वरामानुजादि इतर संप्रदायांपेक्षां शांकरमतालाच हा मान कां दिला पाहिजे ह्याचीं कारणेंही सांगितलीं. प्राचीन सांख्ययोगापासून तों अर्वाचीन वारकरी मंडळीच्या भक्तिमार्गापर्यंत किंवा त्याहूनही अलीकडील अर्धवट ख्रिस्ती समाजिष्टांच्या साप्ताहिक प्रार्थनेपर्यंत लाखों मतें, प्रक्रिया, व संप्रदाय ह्या भरतखंडांत आजतक प्रादुर्भूत झाले. त्यांपैकीं कित्येक उत्पन्न विनष्ट झाले, व कित्येक संस्कृत तत्त्वग्रंथांतून नामशेष मात्र राहिले आहेत; कित्येकांचें पहिलें उदात्त स्वरूप जाऊन त्यांस अडाणी धर्मभोळ्या किंवा लबाड लोकांच्या हातीं सांपडल्यामुळें अति निकृष्टावस्था प्राप्त झाली आहे, व कित्येक तुरळक ठिकाणीं लहानमोठ्या जनसमूहांत जेमतेम जीव धरून राहिले आहेत इतकेंच; परंतु अद्वैत मत मात्र पहिल्यापासून आहे तसेंच अजून जागृत आहे. किंबहुना अगदीं आरंभापासून हिंदुधर्माचा इतिहास पाहिला तर आजपर्यंत उद्भवलेले बहुतेक पंथ व संप्रदाय बाह्यतः विरोधी वाटले, तरी वस्तुतः अद्वैत सिद्धांताच्याच पायावर उभारले आहेत असेंही सिद्ध करतां येईल. **ड्यूसन**साहेबांनीं शेंकडा पाऊणशें लोक शांकरमताचे आहेत असें ह्मटलें; पण एका दृष्टीनें हिंदुमात्र अद्वैतानुयायी आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. ज्याप्रमाणें ख्रिस्तीधर्मात अवांतर मतभेदानें निरनिराळे शेंकडों पंथ झाले असले तरी त्या सर्वांना साधारण अशीं कांहीं मतें आहेत, व ह्मणूनच ख्रिस्ती असें साधारण नांव सर्वांना देण्यांत येतें; त्याचप्रमाणें हिंदुधर्मातही अनेक पंथ असले तरी जगदुत्पत्ति, कर्तृस्वरूप, आत्मा, मुक्ति इत्यादिकांसंबंधाचे धर्मबीजरूपी सिद्धांत सर्व पंथांमध्यें तुल्यरूप आढळतात. ह्या निरनिराळ्या पंथांनीं पूज्य मानलेल्या ग्रंथांची एकवाक्यता सहज होऊं शकते, व ती केली असतां त्या सर्व ग्रंथांचें शेंवटीं अद्वैतांत पर्यवसान होतें, असेंही सिद्ध करतां येईल. बौद्धधर्माच्या

काळापर्यंत हिंदुस्थानांत वेद, ब्राह्मणें, उपनिषदें, स्मृती पुराणें वगैरे जे धर्मग्रंथ झाले, त्यांची एकवाक्यता **शंकराचार्यांनीं** केली व त्यामुळेंच त्यापूर्वीच्या मतांतरांचा उच्छेद होऊन जिकडे तिकडे अद्वैत मताचा प्रसार झाला. पण आचार्यांच्या मागून गेल्या हजार वर्षांत जे अनेक पंथ व संप्रदाय उद्भवले, त्यासंबंधानें असा प्रयत्न झालेला नाहीं. हल्लीं धर्मसंबंधानें घोंटाळा व बेबंदशाही इतकी माजण्याचें बहुशः हेंच कारण असावें. आद्य **शंकराचार्यांनीं** दिग्विजय करून चार दिशांस चार जगद्गुरुमठांची स्थापना केली; पण हल्लीं प्रत्येक गांवांत नाहीं तरी प्रत्येक जातींत निराळा शंकराचार्य झाला आहे. तेणेंकरून पूर्वीचें धर्मैक्य नष्ट होऊन सर्व धार्मिक व नैतिक बंधनें शिथिल झाल्यामुळें घराचे वासेच एकमेकांशीं भांडतात अशी हिंदुसमाजाची स्थिति झाली आहे. अलीकडील ग्रंथकारांचा व मतवाद्यांचा कल बहुधा परस्परविरोध दाखवून कलह वाढविण्याकडे विशेष दिसून येतो. पण सर्व मतांतील असत्य व त्याज्य भाग टाकून देऊन त्यांची एकवाक्यता करण्याचा कोणीं प्रयत्न केलेला दिसत नाहीं. वस्तुतः अशी एकवाक्यता करणें हाच जीर्णप्राय झालेल्या धर्माला पुनः चालन देण्याचा खरा मार्ग होय. प्राचीन काळीं जे जे धर्मसंस्थापकाचार्य झाले, त्यांनीं हाच मार्ग पत्करला व ह्मणूनच त्यांचे हेतु तडीस गेले. ब्रह्मसूत्रकारांनीं सर्व श्रुतींचा समन्वय व स्मृतींचा अविरोध दाखविण्याकरितां जो इतका खटाटोप केला आहे तो केवळ निरर्थक नव्हता. तेणेंकरून धर्मसंबंधीं विचार करण्याची खरी दिशा त्यांनीं पुढील पिढीस दाखवून दिली असें ह्मटलें तरी चालेल. भगवद्गीतेंत श्रीकृष्णांनीं देखील तशाच प्रकारचा सांख्ययोगादि प्रधानमतांचें ऐक्य करण्याचा प्रयत्न केला आहे, व पुढें **शंकराचार्यांनींही** त्याच रीतीचें अवलंबन केलें. "येन त्वंशेन न विरुध्यते तेनेष्टमेव सांख्ययोगस्मृत्योः सावकाशत्वम्" (ज्या

बाबतींत सांख्य व योगदर्शनें आमच्या विरुद्ध तेवढ्या अंशानें आह्माला तीं मान्य आहेत ) असें "एतेन योगः प्रत्युक्तः" ( ब्रह्मसू० २-१-४ ) ह्या सूत्राच्या भाष्यांत सांख्ययोगमतासंबंधानें आचार्यांनीं ह्मटलें आहे, व त्याला़च अनुसरून सर्व ठिकाणीं त्यांचें प्रतिपादन असतें. भागवतदर्शनाचें खंडन करतांनाही अधिगमनादिपूर्वक ईश्वराराधना, भक्ति, इत्यादि त्यांच्या मतांचा व्यावहारिक उपयोग आचार्यांनीं प्रांजळपणें कबूल केला आहे. इतकेंच नाहीं, तर जैनबौद्धप्रभृति वेदबाह्य मतांतीलही चांगला अंश ग्रहण करण्यास त्यांनीं मागेंपुढें पाहिलें नाहीं, ह्याची 'प्रच्छन्नबौद्ध' असें शंकाचार्यांना त्यांच्या शत्रूंनीं दिलेलें उपपदच चांगली साक्ष देते. मात्र अशा रीतीनें हंसवृत्तीचें अवलंबन करतांना, अनेक धर्मांतील तुकडे तुकडे वेंचून बनविलेल्या गोधडीवजा अर्वाचीन केशवचंद्री नवसंहितेप्रमाणें, किंवा आमच्या इकडील समाजिष्टांच्या अष्टादशधान्यात्मक प्रार्थनासंगीताप्रमाणें, त्यांनीं एकादा नवा धर्मग्रंथ रचला नाहीं, किंवा अपूर्व धर्मही उत्पन्न केला नाहीं. तर इतर धर्मांतून, पंथांतून, किंवा **संप्रदायांतून** जीं चांगलीं, शुद्ध व उदात्त मतें आढळतात, तीं सर्व वैदिकधर्मांतही आहेत; व शिवाय इतरांना माहित नाहींत असेही पुष्कळ सिद्धांत त्यांत आहेत; आणि ह्मणूनच इतर धर्मांपेक्षां वैदिकधर्माचें महत्व अधिक, हें दाखविण्याचा आचार्यांचा नेहमीं प्रयत्न असतो. इतकेंच नाहीं, तर हीं सर्वसाधारण मतें मानावयाचीं तीं दुसऱ्यांचीं उष्टीं ह्मणून घ्यावयाचीं नाहींत; तर तीं श्रुतिपरिगृहीत आहेत ह्मणून त्यांजवर विश्वास ठेवावयाचा असा जेथें तेथें त्यांचा जबर कटाक्ष दिसून येतो व एवढ्याचकरितां जेथें जेथें परपरिगृहीत सन्मतांचा उल्लेख करण्याचा प्रसंग येतो, त्या त्या ठिकाणीं लगेच श्रुतींतील आधार दाखविण्याचाही आचार्यांनीं परिपाठ ठेवला आहे. ह्या समन्वय प्रकाराचें अवलंबन केल्यामुळेंच हिंदुधर्माला

इतकें व्यापक व चिरस्थायी स्वरूप आलें, ही गोष्ट आमच्या आधुनिक धर्मसंस्थापनाचार्य बनू पाहणाऱ्यांनीं ध्यानांत ठेवली असती तर त्यांची हल्लींप्रमाणें विटंबना होण्याचा खचित प्रसंग आला नसता. हिंदुधर्माच्या नांवाखालीं गेल्या पांच सहाशें वर्षांत उत्पन्न झालेल्या शेंकडों पंथांत आणखी एक नवीन पंथाची भर घालण्याऐवजीं, पूर्वींच्यांतील मतभेद काढून टाकून सर्व हिंदूंचें धर्मसंबंधीं ऐक्य करण्याची खटपट करणें त्यांचें अगोदर कर्तव्य होतें. हिंदुधर्माची सुधारणा व्हावयाची असेल तर ती ह्याच रीतीनें होईल. ख्रिस्ती पाद्र्याप्रमाणें रविवारीं निराकार परमेश्वराची प्रार्थना केल्यानें किंवा बूट इस्टाकिण्या घालून आंग्लो–व्हर्न्याक्यूलर कीर्तन केल्यानें खचित होणार नाहीं.

तात्पर्य, अद्वैतवाद्यांचे विशिष्ट सिद्धांत तर सत्य व उत्तम आहेतच; पण त्यांची पूर्वपरंपरा न सोडितां इष्ट सुधारणा घडवून आणण्याची शैलीही आमच्या सुधारकांनींच काय, पण परधर्मीयांनीं देखील अनुकरण करण्यासारखी आहे. युरोपांत अनेक धर्मक्रांत्या, व तत्प्रीत्यर्थ शेंकडों लढाया व रक्तपात झाले; पण हिंदुस्थानांत तसा प्रकार कधींही घडला नाहीं, ह्याचें मुख्य कारण ही एक प्रकारची तडजोडीची रीतीच असली पाहिजे. आपल्या पूर्वजांना सरसकट मूर्ख ठरवून स्वतःच्या शहाणपणाचा टेंभा मिरविण्यापेक्षां चांगल्या पण नवीन भासणाऱ्या गोष्टी त्यांना माहित होत्या कीं नाहीं हें पाहणें अधिक श्रेयस्कर होय. “ नहि पूर्वजो मूढ आसीदित्यात्मनाऽऽपि मूढेन भवितव्यमित्यत्रकिंचिदस्ति प्रमाणम् ” ( बाप आजे मूर्ख होते ह्मणून आपणही मूर्ख रहावें ह्याला कांहीं प्रमाण नाहीं ) हें आचार्यांचें वाक्य यथार्थ आहे; पण त्यावरून आपला शहाणपणा स्थापित करावयाला पूर्वजांना शिव्याच देत सुटलें पाहिजे असें मात्र निघत नाहीं. इंग्रजी विद्येच्या प्रखर तेजानें डोळे दिपून गेल्यामुळें क्षण-

भर आपल्या पूर्वाचार्यांनीं लिहून ठेवलेल्या धर्मग्रंथांकडे कांहीं दिवस दुर्लक्ष झालें असेल; पण हिंदुधर्माचा मागील इतिहास पाहिला असतां कालांतरानें ही स्थिति जाऊन पुन्हा अद्वैत मताचाच चोहोंकडे ह्मणजे केवळ हिंदुस्थानांतच नव्हे तर सर्व जगभर प्रसार होईल, अशी आह्मांस पूर्ण उमेद आहे.

हिंदुधर्माचा आजपर्यंतचा इतिहास पाहिला तर ह्या अद्वैतमताचीच स्थल काल व्यक्तिभेदानें निरनिराळ्या प्रसंगीं झालेलीं रूपांतरें एकामागून एक आपणांस दृग्गोचर होतात. " धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे " हें भगवद्वचन अद्वैत सिद्धांतालाच अनुलक्षून आहे ह्यांत संदेह नाहीं; कारण गेल्या चार पांच हजार वर्षांत जेवढे मुख्य पंथ किंवा संप्रदाय धर्माचें पुनरुज्जीवन करण्याकरितां ह्मणून निरनिराळ्या वेळीं उत्पन्न झाले त्या सर्वांचे परम सिद्धांत एकसारखे ह्मणजे अद्वैत पर्यवसायी आहेत असेंच आढळून येतें. वैदिक ऋषींच्या काळापासून तों ज्ञानदेव, तुकाराम, रामदास, चैतन्यप्रभृति आर्वाचीन साधुपुरुषापर्यंत सर्वांना एका अर्थानें ब्रह्मवादी म्हणण्यास हरकत नाहीं. कारण सच्चिदानंदस्वरूपी ब्रह्माशीं जीवाचें ऐक्य स्थापन करणें हाच सर्वांच्या ग्रंथांचा निष्कर्ष निघतो. चार्वाकासारखे नास्तिक व तार्किकासारखे पुरुषरूप जगत्कर्ता ईश्वर प्रतिपादणारेही कांहीं पक्ष होऊन गेले, नाहीं असें नाहीं; पण त्यांच्या मतांचें साधारण जनसमूहावर फारसें तेज पडलेलें दिसत नाहीं. ही गोष्ट सप्रमाण सिद्ध करण्याला येथें अवकाश नाहीं, कारण हिंदुधर्माच्या इतिहासाचा अंगभूत असा तो स्वतंत्रच विषय आहे. प्रसंगानुसार त्याचें थोडें दिग्दर्शन मात्र येथें करतों. ऋग्वेदांतील 'नासदीय' सूक्त सुप्रसिद्ध आहे. आजच्या लेखावरील अवतरणांतर्गत वाक्य त्याच सूक्ताची सहावी ऋचा आहे. तिचें तात्पर्य, हें सर्व जगत् ज्या परब्रह्मापासून निर्माण झालें, त्याचें यथार्थ ज्ञान कोणालाही होऊं

शकत नाहीं असें आहे. ह्या व अशाच दुसऱ्या कित्येक ऋग्वेदस्थ सूक्तांवरून जगत्कर्त्याविषयीं वैदिक ऋषींची कल्पना किती उदात्त होती हें चांगलें दिसतें. यहुदी लोकांचा कोपिष्ट जोहोवा, ग्रीकांचा विलासी ज्यूपिटर, किंवा ख्रिस्ती लोकांचा विकारवश 'आकाशवासी पिता' इत्यादि इतर धर्मांतील ईश्वरविषयक कोत्या कल्पना कोणीकडे, व 'अधःस्विदासीदुपरिस्विदासीत्' असें अखिल चराचर विश्वव्यापी परब्रह्माचें वर्णन कोणीकडे! आज शेंकडों वर्षें युरोपांत झपाट्यानें ज्ञानवृद्धि होत असतांही जी गोष्ट तेथील मोठमोठ्या तत्त्ववेत्त्यांच्या लक्षांत अजून चांगली आली नाहीं, ती आमच्या प्राचीन ऋषींना कळून चुकली होती. पुढील आचार्यांनाही तिचा कधीं विसर पडला नाहीं. सर्व उपनिषद्ग्रंथांचें तर अद्वैत ब्रह्मांतच तात्पर्य आहे, व तदनंतर झालेल्या इतिहास पुराणादिकांतूनही जेथें जेथें प्रसंग येतो तेथें अद्वैत सिद्धांतांचेंच प्रतिपादन करण्यांत येतें. भारतांतील भीष्म, विदुर, श्रीकृष्ण इत्यादि महात्मे विशिष्ट देवतोपासक नसून ब्रह्मज्ञानीच म्हणविले जात. पुढें वैदिक कर्मकांडाचा लोकांना कंटाळा येऊन जैन, बौद्ध मताचा प्रादुर्भाव झाला; पण त्यांतही पूर्वींचा जीवब्रह्मैक्य सिद्धांत किंचित् निराळ्या रूपानें कायम राहिला. बौद्धांचें निर्वाण व उपनिषदांतील सत्संपत्ति किंवा मोक्ष ह्यांत फारसें अंतर नाहीं; व असलेंच तर दुसऱ्यापासून एका प्रकारचा स्पष्ट अर्थबोध होतो, तो पहिल्यापासून होत नाहीं इतकेंच आहे. बौद्धांचा उच्छेद झाल्यावर शांकरमताची स्थापना झाली ती तर बोलून चालून उपनिषदांच्या पायावर. पुढें रामानुज, वाल्लभ वगैरे अद्वैताचे दुसरे प्रकार उद्भवले; पण त्यांत व मुख्य शांकरमतांत फारसा विरोध नाहीं. जीवब्रह्माचा संबंध अंगांगिभावानें असो, कीं वृक्षशाखान्यायानें असो, कीं आभासात्मक असो; मुख्य मुद्दा जो त्यांचें तादात्म्य, तो सर्वांना कबूल आहे. येऊन जाऊन

राहिले द्वैतसांप्रदाय, व विशेषेंकरून अलीकडेच अतोनात बोकळलेला भक्तिमार्ग; पण त्यांमधील जीवेश्वरसंबंधाच्या कल्पना देखील बारीक दृष्टीनें अवलोकन केलें असतां ख्रिस्तीसारख्या केवळ भक्तीवर भिस्त ठेवणाऱ्या धर्मांपेक्षां फार श्रेष्ठ आहेत. हिंदु भक्तिमार्गांत देवभक्तांचा संबंध धनिचाकरासारखा किंवा शास्यशासित्यासारखा नसून पितापुत्रासारखा आढळतो. ह्मणजे ज्याप्रमाणें पितापुत्रांचें एक प्रकारें तादात्म्य असतें, व पुत्र हा पित्याचा गौणात्मा ह्मणविला जातो, तसेंच देवाचें भक्ताशीं ऐक्य आहे. “ये भजंति तु मां भक्त्या मयि ते तेषु चाप्यहम्” असें भगवंतांनीं स्पष्ट सांगितलें आहे. तुकाराम द्वैती होता कीं अद्वैती होता असा एक वाद कित्येक दिवसांपासून चाललेला आहे. कारण त्याचे दोन्ही प्रकारचे अभंग आढळतात; पण त्यांतील खरें बीज कोणाच्या लक्षांत येत नाहीं. वस्तुतः हिंदु धर्मांत द्वैत नाहींच; व जें थोडेंसें भासतें त्याला इतर धर्मांच्या मानानें अद्वैतच म्हटलें पाहिजे. अलीकडे ब्रह्मो प्रार्थनासमाजिष्टांनीं मात्र ख्रिस्ती पाद्र्यांचें अनुकरण करून हें अभूतपूर्व द्वैत हिंदुस्थानांत घुसडून देण्याचा प्रयत्न चालविला आहे; पण चमत्कार असा कीं, त्यांचे आद्यगुरु जे राजाराममोहनराय त्यांची उपनिषदावर पूर्ण श्रद्धा होती. असो; तात्पर्य हें कीं, अद्वैत मत हिंदुलोकांच्या अंतःकरणांत इतकें बिंबून गेलें आहे कीं, कशाही धर्मक्रांती व उलाढाली झाल्या तरी त्याचा जोर कमी व्हावयाचा नाहीं.

येणेंप्रमाणें ऐतिहासिक दृष्ट्या अद्वैतमताचें व्यापकत्व सिद्ध केलें. आतां मुख्य विषयाला हात घालण्यापूर्वी, आमच्यावर एक जबरदस्त आक्षेप येण्यासारखा आहे त्याचा थोडासा विचार केला पाहिजे. हा आक्षेप जो कोणी हिंदुधर्माचें मंडन किंवा स्तुति करील त्याजवर ख्रिस्ती पाद्र्यांकडून व त्यांचेंच शिष्यत्व पत्करलेल्या आमच्यांतील सुधारकांकडून वारंवार कर-

ण्यांत येतो; व त्यास समाधानकारक उत्तरही आजपर्यंत कोणाकडून मिळालेलें दिसत नाहीं. शिवाय तो कायम राहील तोंपर्यंत अद्वैतमताची महती व तद्वारा हिंदुधर्माचें श्रेष्ठत्व स्थापन करणें हा जो आमचा मुख्य उद्देश तो कधींही साधणार नाहीं. सबब त्याचा येथें विचार करणें जरूर आहे. तो आक्षेप हा कीं, हिंदुलोकांच्या तत्त्वज्ञानाचें व हिंदुधर्माचें जें तुह्मीं तादात्म्य कल्पिलें आहे तेंच मुळीं खोटें आहे. हिंदुधर्म ह्मणजे हिंदु ह्मणविणाऱ्या लोकांत हल्लीं प्रचलित असलेल्या आचारविचारांचा समूह; तेव्हां हिंदुतत्त्वग्रंथांत कितीही खोल ज्ञान भरलें असलें तरी ह्या लौकिक आचारविचारांचा मूर्खपणा यत्किंचित्‌ही कमी होत नाहीं. जीवब्रम्हैक्याविषयीं संस्कृतांत ग्रंथचे ग्रंथ लिहिले गेले असले तरी तेणेंकरून दगडाधोंड्याच्या मूर्ति पुजणें चांगलें ठरत नाहीं; किंवा संसार मिथ्या आहे ह्मणून त्या ग्रंथकारांनीं कितीही बडबड केली असली तरी कोंवळ्या पोरींचीं लग्नें करून त्यांना वैधव्यपंकांत लोटून दिल्याबद्दल ते कमी दोषास पात्र होतात असें नाहीं. तेव्हां असले वेडगळ आचार ज्या हिंदुधर्मांत सांगितले आहेत त्याचा जितका लवकर नाश होईल तितकें चांगलेंच. सकृद्दर्शनीं हा आक्षेप खरा वाटतो; पण आमच्यामतें तो पुढें आणणारे लोकांची कृति आपल्याच सावलीला भोंडपणाऱ्या वेडगळासारखी असमंजसपणाची आहे. कारण वर सांगितलेले प्रचार हाच हिंदुधर्म असें मानण्याला सदहू आक्षेपकांच्या डोक्यांतील कल्पनातरंगाखेरीज कांहीं आधार नाहीं. ते आचार चांगले किंवा वाईट आहेत हें पाहण्याचें हें स्थळ नव्हे; पण अगदीं वाईट व तुच्छ मानले तरी देखील त्यांच्या योगानें हिंदुधर्माच्या उत्तमत्वाला मुळींच बाध येत नाहीं. कारण त्या किंवा तसल्याच प्रकारच्या ज्या दुसऱ्या अनेक रूढी हिंदुस्थानच्या निरनिराळ्या भागांत चालू आहेत, त्या हिंदुधर्माचें प्रधानांग नाहींत. किंबहुना त्यांपैकीं पुष्कळांचा धर्माशीं

बिलकुल संबंध नाहीं; उलट कित्येक प्रसंगीं अत्यंत विरोधही आढळतो. ह्याला प्रमाण इतकेंच कीं, त्या रूढी सार्वत्रिक नाहींत. सोंवळेंओवळें, विवाहकाल, खाणेंपिणें, इत्यादिकांसंबंधानें हिंदुस्थानांत प्रांतभेदानें इतकें रूढिवैचित्र्य आढळतें कीं, त्यांपैकीं एकाच प्रकारची रूढि आवश्य मानणें ह्मणजे बाकीच्या प्रांतांतील सर्व लोकांचें हिंदुत्व काढून घेण्यासारखें आहे. अर्थात् ह्या सर्व सामाजिक व इतर प्रकारच्या ऐच्छिक रूढि देशाचार व कुलाचार ह्मणून गौण मानल्या पाहिजेत. ह्मणजे त्या एकदम टाकून द्याव्या असा अर्थ नाहीं; तर धर्मासारखें त्यांना अबाधितत्व व अचलत्व नाहीं इतकेंच. असल्या प्रकारच्या बऱ्यावाईट लोकरूढी प्रचलित नाहींत असा पृथ्वीवर एकही देश किंवा धर्म सांपडणें मुष्कील आहे. सुधारलेल्या ख्रिस्ती लोकांतही वेडगळ आचार कमी आहेत असें नाहीं. बायकांनीं कंबरा बारीक करणें, स्त्रीपुरुषांनीं ‘ बालच्या ’ मिषानें रात्रभर धांगडधिंगा घालणें, किंवा देवळांत प्रार्थनेचें ढोंग करून बायबलाच्या आडून एकमेकांकडे टेहाळणें, वगैरे उपहासास्पद प्रकार साहेबलोकांत नित्यशः दृष्टीस पडतात; ह्मणून जर ख्रिस्तीधर्मास उणेपणा येत नाहीं, तर आमच्या ज्ञातिदेशकुलभेदानें फिरणाऱ्या रूढींचाही हिंदुधर्माशीं काय संबंध येऊन पोंचतो ! मुख्य हिंदुधर्म प्राचीन काळापासून अविकृत चालत आला आहे, व पुढेंही तसाच कायम राहील; पण सदहू रूढि पन्नास वर्षेंही सारख्या टिकत नाहींत असें आजपर्यंतच्या इतिहासावरून अनुभवास आलें आहे. तात्पर्य त्रिकालाबाधित कूटस्थ नित्यब्रह्माला ज्याप्रमाणें क्षणिक उपाधींचा संपर्क होत नाहीं, त्याचप्रमाणें आमच्या पुरातन ऋषिप्रणित धर्मालाही देशकालपरत्वें फिरणाऱ्या अनित्य, ऐच्छिक व ह्मणून गौण आचारविचारांचा विटाळ होत नाहीं. अर्थात् असल्या रूढींच्या वाईटपणाबद्दल खुद्द हिंदुधर्माला शिव्या देणें जितकें मूर्खपणाचें आहे, तितकेंच

सद्धेतूनें त्यांत फेरफार करण्याचा कोणी प्रयत्न करूं लाग-
ल्यास धर्म बुडाला ह्मणून आक्रोश करणेंही अविचाराचें होय.
रूढीसारख्या भुसभुशीत पायावर हिंदुधर्माची इमारत उभार-
लेली असती तर ती कधींच ढासळून गेली असती; ती सर्वदां
सत्य, अविनाशी व शुद्ध अशा ब्रह्मतत्त्वावर बांधली असल्या-
मुळेंच इतके दिवस टिकली आहे ही गोष्ट हिंदुधर्माच्या निंद-
कांनीं व अभिमान्यांनीं दोघांनींही सदोदित लक्षांत बाळ-
गली पाहिजे.

प्रत्येक धर्माचीं तीन अंगें असतात, तशीं हिंदुधर्मातही आ-
हेत. तीं तीन अंगें तत्त्वज्ञान, कर्मकांड व पुराणें, हीं होत.
ह्यांना अनुक्रमें धर्माचें मस्तक, शरीर व पाय अथवा अन्य
तऱ्हेनें आत्मा, इंद्रियें व वस्त्राभरणादि बाह्योपचार, असें ह्मणतां
येईल. दोहोंतून कोणतेंही रूपक घेतलें तरी तत्त्वज्ञानाला प्रा-
धान्य द्यावें लागतें. मनुष्याचे सर्व व्यापार चालावयास इंद्रियें
पाहिजेत, व सौंदर्यादि अवांतर गुणांकरितां वस्त्रालंकारादि
बाह्योपकरणांचीही थोडीबहुत जरूर असते; तसें प्रत्येक धर्मांत
प्रबुद्ध अप्रबुद्ध असे अनेक प्रकारचे लोक असतात त्या सर्वांच्या
समाधानाकरितां कर्मकांड, पुराणें वगैरे गौण साधनांचीही अ-
पेक्षा असते. पण मस्तक किंवा आत्मा नसल्यास जसें जीवित
अशक्य होईल, तसेंच तत्त्वज्ञानावांचून धर्माचें अस्तित्वच सं-
भवणार नाहीं. पुराणांतील कथांनीं अज्ञजनांची श्रद्धा वाढते,
व कर्मकांडानें चित्ताची शुद्धि व ऐकाग्र्य होतें; पण खरी धर्म-
फलप्राप्ति तत्त्वज्ञानानेंच शक्य आहे. उषस्तिचाक्रायणानें देव-
ताज्ञानविरहित केवळ कर्मैं करणाऱ्या उद्गातृप्रभृति ऋत्विजांना
'मूर्धाते विपतिष्यति' असा जो शाप दिला त्यांतील तात्पर्य हेंच.
रोमन, यहुदी, खिस्ती, मुसलमानी वगैरे हिंदुधर्मव्यतिरिक्त ध-
र्मांतही ही अंगत्रयी आढळते; देशकालभेदानें तिचें प्रमाण व
स्वरूप बदलतें इतकेंच काय तें. तेव्हां हिंदुधर्माची इतर

धर्माशीं तुलना करणें असेल तर ह्या त्रयीपैकीं प्रत्येक अंगाची परस्पर तुलना केली पाहिजे. ख्रिस्ती पाद्र्यांची व आमच्यांतील अर्वाचीन सुधारक पंडितांची चूक होते ती येथेंच. ते हिंदुलोकांच्या कर्मकांडाची ख्रिस्ती तत्त्वज्ञानाशीं किंवा अर्वाचीन पाश्चात्य शास्त्रसिद्धांतांशीं तुलना करावयाला जातात व त्यामुळें अर्थातच त्यांना पहिलें तुच्छ वाटूं लागतें. वस्तुतः आमचें कर्मकांड इतर धर्मांतील कर्मकांडाशीं ताडून पाहिलें पाहिजे. असें केल्यास एकंदर हिंदुधर्माचेंच नाहीं, तर त्याच्या प्रत्येक अंगाचेंही श्रेष्ठत्व ध्यानांत येईल अशी आमची समजूत आहे. दररोज देवपूजा करणें किंवा सायंप्रातःसंध्या करणें कदाचित् वेडेपणा असेल; पण तो आठवडाभर ईश्वराला विसरून सातव्या दिवशीं चर्चाच्या छताकडे डोळे लावून बसण्याइतका पुष्कळ खचित नाहीं. तसेंच श्रीकृष्णाच्या बाललीला कदाचित् अनीतिप्रचुर असतील, पण ख्रिस्तमाता मेरीचें चार पोरें झालीं तरीं कौमार्य राहणें, किंवा निराकार देवाकडून तिला संतति होणें, किंवा आब्राहामचा पुतण्या लोट ह्याच्या दोघी मुलींनीं आपल्या बापाशीं तो निजला असतां व्यभिचार करणें, असला बाष्कळपणा हिंदुपुराणांत कोठेंही आढळावयाचा नाहीं एवढें खचित. आतां तत्त्वज्ञानासंबंधानें पाहूं गेलें तर आमच्या अद्वैतमताशीं तुलना करण्यासारखें ख्रिस्तीधर्मांत कांहीं एक नाहीं. कारण त्याची सर्व इमारत बायबलांतल्या व मध्ययुगांतील पाद्री भटांच्या डोक्यांतून निघालेल्या भाकडकथांवर बहुतेक रचलेली आहे. अर्थात् हिंदुअद्वैताची जर कोणाशीं तुलना करावयाची असेल तर ती ख्रिस्तीधर्माहून स्वतंत्रपणें वाढलेल्या प्राचीन व अर्वाचीन युरोपियन तत्त्वज्ञानाशींच केली पाहिजे; व ती योग्य रीतीनें केली असतां ह्या बाबतींत देखील अद्वैतमताचें श्रेष्ठत्व दिसून येईल. युरोपखंडांत धर्म आणि तत्त्वज्ञान ह्यांची तोडातोड झाल्यामुळें एक पोकळ व दुसरें अकिंचित्कर

झालें आहे, तसा प्रकार हिंदुधर्मासंबंधानें नाहीं असें मागील लेखांत सांगितलेंच आहे. ही एकच सामान्य गोष्ट आमच्या धर्माचें उत्तमत्व स्थापन करण्याला पुरे आहे; पण ती सध्यां बाजूला ठेवून विशिष्ट सिद्धांतांची तुलना केली तरी देखील अद्वैतमताचें श्रेष्ठत्व सिद्ध होतें असें आह्मी दाखविणार आहों.

---

## स्वप्नदृष्टांत.

### अध्याय चवथा.

The cloud-capp'd towers, the gorgeous palaces,
The solemn temples, the great globe itself,
Yea all which it inherit, shall dissolve
And, like this unsubstantial pageant faded,
Leave not a rack behind. We are such stuff
As dreams are made on, and our little life
Is rounded with a sleep.*

Shakespeare, *Tempest IV, 1.*

पाश्चात्य कविकुलगुरु **शेक्सपीयरच्या** वरील उक्तीचें व " स्वप्नमायास्वरूपेति सृष्टिरन्यैर्विकल्पिता " ह्या **गौडपादाचार्यांच्या** वचनाचें, किंवा "ध्यायतीव लेलायतीव स हि स्वप्नो भूत्वेमंलोकमतिक्रामाति " ह्या **याज्ञवल्क्यांनीं जनकाला** सांगि-

* उंच उंच गगनचुंबित सौधशिखरें, रमणीय राजवाडे, पवित्र देवालयें अथवा हें सर्व भूमंडळ, किंबहुना त्रैलोक्यांतील सर्व वस्तुसमुदाय विलयास जाईल, व ह्या पुढें दिसणाऱ्या देखाव्याप्रमाणें ( प्रास्पेरोनें निर्माण केलेल्या भूतसृष्टीप्रमाणें ) नष्ट होऊन यत्किंचितही अवशेष मागें राहणार नाहीं, आह्मी सर्व प्राणी स्वप्नांतल्या वस्तूप्रमाणें आहोंत; आमचें हें क्षणभंगुर आयुष्य केवळ निद्रेप्रमाणें होणार आहे.

तळेऱ्या आत्मस्वरूपवर्णनाचें किती विलक्षण साम्य आहे बरें! जी गोष्ट तत्त्वजिज्ञासूला केवळ तर्कशक्तीच्या साहाय्यानें कळून येण्यास पुष्कळ कालावधि लागतो, तीच अनेक वेळां **शेक्सपीयर**सारख्या महा कवींच्या ब्रह्मांडावगाही प्रतिभाशक्तीस तावडतोब अवगत होते असें एका विद्वान् ग्रंथकाराचें मत आहे, त्याची वरील अवतरणांतर्गत वाक्य चांगली साक्ष देतें. बाह्यसृष्टीचें जें स्वप्नसदृशत्व दोनशें वर्षांपूर्वी एका इंग्रजी नाटक्याचे डोक्यांत प्रतिबिंबित झालें, त्याची नुकती कोठें **शोपेनहोर**प्रभृति जर्मन तत्त्वज्ञान्यांस थोडीबहुत कल्पना होऊं लागली आहे, व तीही अजून पूर्ण नाहीं. **पार्मिनाईडीस**-सारखे ग्रीक व **स्पिनोझा फिक्टी**सारखे जगाला मिथ्या समजणारे अर्वाचीन तत्त्ववेत्ते १९ व्या शतकापूर्वी कांहीं होऊन गेले खरे; पण त्या सर्वांची स्थिति काळोखांत रस्ता शोधणाऱ्या वाटसराप्रमाणें होती. दिव्याशिवाय अंधेरांत किंवा मार्गदर्शकावांचून दाट जंगलांत मार्ग सांपडणें जसें दुर्घट आहे, तद्वतच धर्मश्रद्धेची मदत असल्याखेरीज केवळ तर्कशक्ति तत्त्वशोधनाच्या कामीं पंगु होते ही गोष्ट विचाऱ्यांच्या लक्षांत आली नाहीं. "अचिन्त्याः खलु ये भावा न तांस्तर्केण योजयेत्" ह्या पौराणिक वचनांतील खरें तात्पर्य तरी हेंच असलें पाहिजे. दुर्दैवानें ख्रिस्ती धर्मासारख्या असन्मूलक धर्माचें युरोपांत फार दिवसांपासून प्राबल्य माजल्यामुळें शुद्ध धर्माच्या योगानें तत्त्वविचारांना जें उत्तम प्रकारचें वळण लागतें तें तर ख्रिस्ती धर्मानें लागलें नाहींच; पण उलट पुष्कळ वेळां ह्या तत्त्वविचारांचा भलत्याच दिशेकडे ओघ वाहवण्यास तो धर्म कारण झाला. ख्रिस्ती धर्मापासून अर्वाचीन युरोपियन सुधारणेला अन्य तऱ्हेनें पुष्कळ मदत झाली खरी; परंतु तत्त्वशोधनाच्या कामीं त्यापासून प्रतिबंधच होत गेला. **मालिब्रांची, पास्कल, क्यांट**सारखे जे धार्मिक होते त्यांना ख्रिस्ती धर्माची विशिष्ट

मतें संभाळण्याकरितां आपली विचारशक्ति पुष्कळदां आंखडून धरावी लागली, व **स्पिनोझा, मिल्ल, हक्सले**सारखे नास्तिक होते त्यांचें मुख्य लक्ष तीं मतें खोडून काढण्याकडे वेधल्यामुळें ते भलत्याच दिशेला गेले, व तत्त्वशोधनाचें प्रधान कार्य मागें पडलें. **स्पिनोझा व मालिब्रांची** दोघेही **डेकार्ट**चे अनुयायी; पण दोघेही उलट दिशेला गेले, व शेवटीं सत्य एकालाही सांपडलें नाहीं, ही गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. तसेंच आपल्या तत्त्वविचारांची व विशिष्ट ख्रिस्ती मतांची एकवाक्यता करण्याकरितां **हेगेल**ची जी तारांबळ उडून गेली आहे ती पाहून तर फारच मौज वाटेल. तात्पर्य दोन्ही प्रकारच्या जिज्ञासूंना ख्रिस्तीधर्म मार्गदर्शक न होतां उलटा विप्रलंभक झाला असें अर्वाचीन युरोपियन तत्त्वज्ञानाचा इतिहास अवलोकन केला असतां दिसून येईल.

आमच्या सुदैवानें भरतखंडांत अशी स्थिति नव्हती ही गोष्ट जें तत्त्व **शेक्सपियर**च्या कल्पनाशक्तीस मात्र गम्य झालें व जें अलीकडील युरोपियन पंडितांना नुकतेंच कोठें उमजूं लागलें आहे, तें शेंकडों वर्षांपूर्वी **गौडपादाचार्या**दिकांनीं सप्रमाण सिद्ध केलें आहे ह्यावरून चांगली प्रत्ययास येते. युरोपियनांपासून आह्मांला पुष्कळ गोष्टी शिकण्यासारख्या आहेत हें कित्येक आधुनिक त्रिखंडकीर्ति पंडितांचें ह्मणणें अंशतः खरें असेल; पण कांहीं गोष्टी त्यांना शिकविण्यासारख्याही आमच्याजवळ आहेत हें आपण विसरतां कामा नये. व्यापाराप्रमाणें विद्येच्या कामींही अदलाबदल पाहिजे. तेव्हां इंग्रजलोकांच्या राजकीय संस्था आह्मी घेत आहों, त्यांच्या मोबदला आपलीं उदात्त धर्ममतें त्यांना देणें आमचें कर्तव्य आहे. **शोपेनहोर**चे मायाविषयक सिद्धांत बनण्यास पुष्कळ अंशीं फ्रेंच भाषेंत झालेलीं उपनिषदांचीं अर्धवट भाषांतरेंच कारण झालीं असें **मोक्षमूल्लरभट्टां**नीं एके ठिकाणीं ह्मटलें आहे. मग त्याच उपनिषदांचें समग्र

व यथार्थ ज्ञान झाल्यास आमच्यांतील प्राचीन **याज्ञवल्क्यजनकादि** महात्म्यांप्रमाणें अर्वाचीन युरोपस्थ पंडितांचीही "भिद्यते हृदयग्रंथिश्छिद्यन्ते सर्वसंशयाः" अशी स्थिति होईल असें मानण्यास काय प्रत्यवाय आहे ? **प्रो० डय्यूसन**सारखे विद्वान ही गोष्ट कबूल करूं लागले आहेत, व थिआसोफिकल मंडळीनें ती थोडीबहुत प्रत्ययासही आणून दाखविली आहे. पण हें काम आमच्या हातून होण्यास आमची आह्मांलाच ओळख पाहिजे ती कोठें आहे ? आह्मीं हातचें सोनें टाकून दुसऱ्याचें खापर घेण्यास धांवणार !

असो; ही अनास्था दूर होऊन अद्वैतमताचा जगभर प्रसार होण्यास मुख्यत्वें दोन पक्षांकडून अडथळा येण्याचा संभव आहे. हे दोन्ही पक्ष एकमेकांचे अत्यंत विरोधी असून अंशतः खरे व अंशतः खोटे आहेत; तरी पण प्रत्येक आपणच सर्व शहाणपणा बळकावून दुसऱ्याला अगदीं तुच्छ मानीत असतो. एक पक्ष ख्रिस्तानुयायांप्रमाणें पुरुषरूप ईश्वराची भक्ति करणारा, व दुसरा भौतिकशास्त्रांतच मानवी ज्ञानाची परमावधि मानणाऱ्या **हक्सले स्पेन्सर**प्रभृति नास्तिकांचा होय. ह्या दोन पक्षांच्या लठ्ठालठ्ठींत गुंग झाल्यामुळेंच युरोपांत खऱ्या ब्रह्मज्ञानाचा आजपर्यंत प्रवेश झाला नाहीं; व इंग्रजी विद्येच्या संसर्गानें आमच्याकडेही तसले पक्ष उत्पन्न होऊन तसेंच द्वंद्व सुरू होतें कीं काय अशी भीति वाटूं लागली आहे. ती दूर करण्याला एकच मार्ग आहे. तो हा कीं, दोन्ही पक्षांतील व्यंगें लोकांना वेळींच दाखवून दोहों पक्षांतील उत्तम अंश ग्रहण करणाऱ्या व त्याज्य अंश टाकून देणाऱ्या अद्वैतमतावरील हिंदुलोकांची श्रद्धा पुनः पूर्ववत कायम करणें हा होय. आपआपल्या मर्यादेच्या आंत ह्या दोन्ही मतवाद्यांचें ह्मणणें बरोबर असतें, पण त्या मर्यादेचें अतिक्रमण करून सर्वज्ञतेचा डौल घालण्याकडे ह्या दोन्ही पक्षांतील पुढाऱ्यांची वारंवार प्रवृत्ति होत असल्यामुळें त्यांच्या

तत्त्वशोधनाचें नेहमीं अहमहमिकेंत पर्यवसान होतें. सबब ह्या दोन्ही पक्षांच्या चुका दाखवून चांगल्या अंशापुरती त्यांची एकवाक्यता करणें वेदांत्याचें काम आहे, व तें त्यानें अधिकारभेदानें सगुणविद्या आणि निर्गुणविद्या असे दोन मार्ग कल्पून उत्तम प्रकारें केलें आहे. ज्यांना निर्गुण ब्रह्माचें आकलन करण्याची योग्यता आली असेल त्यांनींच निर्गुणाकडे वळावें, इतरांकरितां सगुणोपासनेचा सोपा राजरोस मार्ग आहेच; असा विभाग केल्यानें धर्म आणि भौतिकशास्त्रें, भक्ति आणि ज्ञान ह्यांजमधील विरोधाचा युरोपखंडांत हल्लीं जो इतका बाऊ झाला आहे तो अजिबात नाहींसा होतो. पुनः ह्या सगुण व निर्गुण विद्या भिन्न आहेत तरी परस्पर विरुद्ध नाहींत; तर पहिली दुसरीला साधनभूत आहे. भक्तिमार्गाची थोरवी गाणाऱ्या धार्मिकांचें ह्मणणें तरी इतकेंच कीं, साधारण जनसमूहाची आत्मिक उन्नति व नीतिमत्ता वाढण्यास सगुण ईश्वराची उपासना जरूर आहे. वेदान्ति ह्मणतो कबूल; पण येणेंप्रमाणें आत्मिकउन्नति अथवा चित्तशुद्धि झाल्यानंतर ह्या उपासनेचा काय उपयोग ? अज्ञानी लोकांकरितां भक्तिमार्ग पाहिजे असेल; पण त्यावरून त्या लोकांना सदोदित अज्ञानी ठेवावें, आणि मग त्यांच्या मागें भक्तीचें शुक्लकाष्टही लावून ठेवावें असें निघत नाहीं. उलट होईल तितकें लवकर त्यांचें अज्ञान दूर करणें व त्याबरोबर सगुणोपासनारूप कर्मकांडाचीही कटकट चुकविणें हा अधिक श्रेयस्कर मार्ग नाहीं काय ? ईश्वराच्या पुत्रावर विश्वास ठेवा ह्मणजे कधीं तरी तुमचें तारण होईल असें ख्रिस्तीधर्म सांगतो; व 'आत्मावारे द्रष्टव्यः' ह्मणजे आत्मस्वरूपाची ओळख करून घ्या असें हिंदुधर्म सांगतो. एकजण वाट चुकलेल्या आंधळ्याला बैलाचें शेंपूट धरून गांवांत जाण्यास सांगतो, व त्यामुळें तो आंधळा खड्ड्यांत पडतो; दुसरा ह्मणतो, बाबारे तूं आंधळा आहेस असा तुला

श्रम मात्र झाला आहे; तर डोळे उघड आणि आपल्या पायानें गांवांत जा. ह्यांपैकीं हितकर उपदेश कोणता हें निराळें सांगावयास नको.

सगुणोपासक धार्मिक इतक्यावरच थांबतील तर एक वेळ चालेल; पण असल्या कल्पित पौरुषईश्वराचें पारमार्थिक अस्तित्व व जगत्कर्तृत्व प्रतिपादण्यापर्यंतही बहुधा त्यांची मजल येते; तेणेंकरून तर त्यांचीं मतें चुकलेलींच केवळ नव्हे, तर धडधडीत अनीतिकारक होतात. आकाशांत एक बाप कल्पिला कीं मग त्याचा एक मुलगा मानावा लागतो. नंतर रोमच्या पोप महाराजांसारखा किंवा सर्व ख्रिस्ती देवळांत रविवारीं व्यासपीठावर उभा राहून पाठ केलेलें पुराण सांगणाऱ्या उपदेशकासारखा त्या ईश्वरापाशीं रदबदली करण्याला एक गुमास्ताही नेमावा लागतो. मग तो करील ती पूर्वदिशा आणि तो ह्मणेल तें वेदवाक्य. **जान स्टुअर्ट मिल्लनें** आत्मचरित्रांत ह्मटल्याप्रमाणें ही शुद्ध गुलामगिरी नव्हे काय ? मनुष्याचें गुलाम होणें एक वेळ पत्करेल; पण आपल्याच कल्पनाशक्तीनें उत्पन्न केलेल्या असल्या काल्पनिक आकाशस्थ पित्याची किंवा त्याच्या मुलाची गुलामगिरी अधिक वाईट. ज्या ख्रिस्तीधर्मांत असल्या मेषमात्र वृत्तीचा उपदेश केला आहे, त्यांतील लोकांना मेंढराची उपमा देण्यांत येते ती अगदीं सार्थ आहे असें कोण ह्मणणार नाहीं ? ह्याशिवाय निराकार देवाची प्रार्थना करण्याचा अलीकडे नवीनच एक गंगाजम्नी प्रकार निघाला आहे. पण निवळ परानुकरणापलीकडे ह्या समाजिष्ट पंथांत कांहीं नसल्यामुळें त्याला विशेष महत्व देण्याचें प्रयोजन दिसत नाहीं. वस्तुतः निराकाराची भक्तिच संभवत नाहीं. कारण निर्गुण निराकार ईश्वराची मनाला कल्पनाच होण्याचा संभव नाहीं. तेव्हां उपास्याचें अंतःकरणांत कोणत्या तरी प्रकारचें प्रतिबिंब उतरल्याशिवाय उपासना कोणाची करावयाची ? समाज-

मंदिरांतील छताला लटकलेल्या पंख्याची किंवा झुंबराची असल्यास न कळे; पण मग त्यापेक्षां आमचा पुरातन मातीचा गणपति बरा.

उलटपक्षीं भौतिकशास्त्रावर भिस्त ठेवून सर्व धर्मांला थोतांड मानणाऱ्या नास्तिकाला वेदांती ह्मणतो, बाबारे, तूं कितीही आपल्या ज्ञानाची घमेंडी मारलीस, तरी त्याला मर्यादा आहे. सरड्याची धांव कुंपणापर्यंत; तशी बाह्येंद्रियांच्या व परिच्छिन्न बुद्धीच्या साधनानें निर्माण केलेल्या भौतिकशास्त्रांची मजल परिच्छिन्न वस्तूपर्यंतच. अपरिच्छिन्न व निर्गुण जगत्कारणाचें ज्ञान त्यांना अगम्य आहे. एकंदर भौतिकशास्त्रांची इमारत कांहीं सिद्धवत् मानलेल्या मूलतत्वांवर रचलेली आहे. त्या मूलतत्वांपाशीं त्यांची गति कुंठित होते. पदार्थविज्ञानांतील गुरुत्वाकर्षण घ्या, रसायनशास्त्रांतील परमाणूचें व शक्तीचें अविनाशित्व घ्या, किंवा प्राणिशास्त्रांतील उत्क्रांतिमत घ्या, त्याची त्या त्या शास्त्रानें उपपत्ति होत नाहीं; व ह्मणून तें गृहीतच घ्यावें लागतें. ह्या नास्तिकमतवाद्यांची प्रत्यक्षानुभवावर मोठी भिस्त असते व अनुभवानें सिद्ध न होणारी वस्तु खोटी मानण्याकडे त्यांचा फार कल दिसून येतो; पण शक्तीचें अविनाशित्व त्यांना कोणत्या प्रकारच्या अनुभवानें दृग्गोचर झालें होतें, व नाहीं ह्मणून तेंही खोटें मानल्यास एकंदर रसायन, उष्णता, विद्युत् वगैरे भौतिकशास्त्रांची काय वाट होणार! '**हक्सले**'नें '**प्रोटोप्लाझम**' ऊर्फ आद्य जीवपरिमाणु कल्पिला; पण तो कधीं कोणीं पाहिला आहे काय? तात्पर्य, अनुभवानें सिद्ध होणाऱ्या वस्तूपर्यंतच भौतिकशास्त्रांची मर्यादा आहे. ह्या रेषेपलीकडील प्रांत तत्त्वज्ञानाचा आहे. भौतिकशास्त्रांच्या दृष्टीनें त्याला **हर्बर्ट स्पेन्सर**च्या मताप्रमाणें Unknown ह्मणजे 'अज्ञात' ह्मणण्यास हरकत नाहीं; परंतु त्यालाच Unknowable ह्मणजे 'अज्ञेय' असेंही जें स्पेन्सरनें ह्मटलें आहे, तें

मात्र अतिप्रसंगीं व असंबद्ध आहे. कारण आद्यपरमाणूपलीकडील वस्तूविषयीं आह्मांला कांहीं माहीत नाहीं हें स्पेन्सरप्रभृतींचें ह्मणणें जर खरें असेल, तर त्या 'अज्ञेय' आहेत हें तरी कसें कळलें ? वस्तुतः, भौतिकशास्त्रांचा तो विषयच नसल्यामुळें त्यांनीं मौन धरलें पाहिजे. बेळगांवाहून मुंबईस जाणाराला सदर्न मराठा रेल्वेची छोटी गाडी पुण्यापर्यंत आणून सोडते, व पुढें जी. आय्. पी. च्या मोठ्या गाडीनें गेलें पाहिजे. तद्वतच Force ह्मणजे शक्ति, व Matter ह्मणजे परमाणु, ह्या द्वयींपर्यंत भौतिकशास्त्रें आपणांस पोंचवितात; पण त्यापलिकडे जाऊन त्या दोहोंचेंही अभिन्नत्व स्थापन करणें हें अद्वैतमतासारख्या तत्त्वज्ञानाचेंच काम आहे. प्रख्यात फ्रेंच तत्त्ववेत्ता **डेकार्ट** ह्यानें ह्मटलें आहे कीं, ज्ञानरूपी वृक्षाचें तत्त्वज्ञान हें मूळ, पदार्थविज्ञानशास्त्र खोड व इतर भौतिकशास्त्रें शाखा होत. अर्थात् वृक्षाचें मूळ दिसत नाहीं, ह्मणून तें मुदलींच नाहीं ह्मणणें जितकें वेडेपणाचें होईल तितकेंच तत्त्वज्ञानानें सिद्ध होणाऱ्या गोष्टींचें अस्तित्व नाकारणें मूर्खपणाचें आहे. तात्पर्य, अर्वाचीन भौतिकशास्त्रें व वेदान्त ह्यांत बिलकुल विरोध नाहीं. प्रत्येक राजा आपल्या राज्यांत मुख्य असतो, त्याप्रमाणें वेदांत व भौतिकशास्त्रें आपआपल्या विषयांत प्रधान आहेत. अनुभवगोचर सृष्टीसंबंधानें अर्वाचीन भौतिकशास्त्रांशीं विसंगत दिसणाऱ्या गोष्टी वेदांतग्रंथांत सांगितल्या असल्यास जशा त्या टाकून देण्यास हरकत नाहीं, त्याचप्रमाणें इंद्रियातीत वस्तूसंबंधानें त्याच वेदांतग्रंथांनीं सिद्ध केलेलें अद्वितीय ब्रह्म खरें मानलें पाहिजे. पहिल्या गोष्टी गौण आहेत, दुसरी प्रधान आहे; व जोंपर्यंत प्रधान शाबूत आहे, तोंपर्यंत गौणांचा त्याग करावयास आमच्या आचार्यांची बिलकुल मनाई नाहीं. उलट असें करण्यास ते स्पष्ट उपदेश करतात. हें दृश्य अनुभवाचा व इंद्रियागोचर अद्वैताचा विरोध काढून टाकण्याकरितां त्यांनीं

जी चमत्कारिक कृप्ति काढली आहे तिजवरून चांगलें ध्यानांत येतें.

ही कृप्ति वरील सगुण व निर्गुण उपासनांच्या भेदासारखीच आहे. त्यांनीं सत्व दोन प्रकारचें मानलें; पारमार्थिक व प्रातिभासिक. पहिलें त्रिकालाबाधित व ह्मणून खरें; आणि दुसरें अविद्यामूलक व ह्मणून कधीं तरी नाश पावणारें. पारमार्थिक सत्त्व निर्गुण ब्रह्माचेच ठायीं आहे, कारण वस्तुतः ब्रह्माव्यतिरिक्त वस्तु जगांत मुळींच नाहीं. ह्मणून इतर वस्तु अगदीं मिथ्या किंवा अभावरूप आहेत असें समजावयाचें नाहीं. एक प्रकारचें व्यावहारिक सत्व त्यांचेही ठिकाणीं आहेच. वेदान्तमतांत सर्व जगत् मायामूलक ह्मणजे मिथ्या सांगितलें आहे हें एका अर्थी खरें आहे; परंतु साधारण लोकांची त्यासंबंधानें जी समजूत झाली आहे ती मात्र खरी नाहीं. 'माया' व 'मिथ्या' शब्दांचा अर्थ अभावात्मक किंवा खोटें असा करावयाचा नाहीं, तर परब्रह्माच्या त्रिकालाबाधित पारमार्थिकत्वाच्या तुलनेनें न्यूनकालीन ह्मणजे विनाशी अस्तित्व इतकाच करावयाचा. "गजोऽपि मिथ्या पलायनमपि मिथ्या" ही कोटी लोकांत वेदांताची थट्टा करावयाला ठीक आहे. पण वेदांत्यांचें खरें मत ती दाखवीत नाहीं. चित्सुखाचार्यांनीं आपल्या तत्त्वप्रदीपिका नामक ग्रंथांत मायेचें 'भावलक्षणा' असें स्पष्ट लक्षण केलें आहे. मिथ्या शब्दाचेही 'अपन्हव वचन' व 'अनिर्वचनीयता वचन' असे दोन अर्थ करून, संसारासंबंधानें त्यांतील दुसरा अर्थच घ्यावयाचा असा ग्रंथकारांनीं नियम केला आहे. मायास्वरूपासंबंधानें मुख्य पांच मतें प्राचीनकाळीं प्रचलित होतीं, व त्यांना 'ख्याति' अशी संज्ञा आहे. आत्मख्याति, असत्ख्याति, अख्याति, अन्यथाख्याति, आणि अनिर्वचनख्याति; ह्या पंचख्यातींपैकीं बाह्यवस्तूंचें अभावत्व

प्रतिपादणारी आत्मख्याति बौद्धपरिगृहीत होती; वेदान्त्यांना अनिर्वचनख्याति हेंच मत पसंत होतें. ह्मणजे जगत् शुक्तिरजत इत्यादि आभास कसे उद्भवतात हें सांगतां यावयाचें नाहीं असा त्यांचा सिद्धांत होता. तात्पर्य, संसार मायामूलक किंवा मिथ्या ह्मणतात त्याचा अर्थ तो विनाशी आहे, अत्यंताभावरूप नाहीं इतकाच घ्यावयाचा. त्याचें उत्तम प्रमाण वस्तुमात्राचें अभावरूपत्व मानणाऱ्या विज्ञानवादी बौद्धांचें 'अनुस्मृतेश्च' (ब्रह्म० २. २. २५) ह्या सूत्रावरील भाष्यांत खंडन करून अंतर्बाह्यसृष्टीचें सत्यत्व **शंकराचार्यां**नीं स्थापित केलें आहे तेथें सांपडेल. सर्व विषयसृष्टीला शून्य मानणाऱ्या '**स्पिनोझा**' '**फिक्टी**' प्रभृति युरोपियन तत्त्वज्ञान्यांप्रमाणें भरतखंडांतही केवळ अभाववादी बौद्ध होऊन गेले. पण वेदांती त्यांच्याहून अगदीं भिन्न होते. ह्या बाबतींत **शंकराचार्यांचें** '**स्पिनोझा**' पेक्षां **प्लेटो व क्यांट** ह्यांच्याशीं अधिक साम्य आहे. **प्लेटो**ची Idea (कल्पना) व **शंकराचार्यां**ची माया ह्या जवळ जवळ सारख्याच आहेत. बाह्यसृष्टीला **प्लेटो** कल्पनामूलक मानतो त्याचा अर्थ इतकाच कीं, दृश्यवस्तूंचे जे धर्म आपणाला दिसतात ते सर्व आपल्या कल्पनांनीं अध्यारोपित केले आहेत. बसलेला देवदत्त व उभा राहिलेला देवदत्त वस्तुतः पुरुष एकच; पण त्याच्या हातापायांची रचना निराळी दिसल्यानें आपण भिन्न मानतों. वस्तुतः ही रचना देवदत्ताच्या अवयवांहून निराळा पदार्थ नाहीं. त्याचप्रमाणें श्वेतघटाचा श्वेतगुण कल्पित. अम्मळ पुढें गेलें ह्मणजे घटत्वही कल्पितच. घट ह्मणजे काय? असंख्य मृत्परमाणूंची एका विशिष्ट प्रकारची रचना. ही रचना परमाणूंहून वेगळी करतां यावयाची नाहीं. अर्थात् त्या परमाणुसमूहावर आपल्या कल्पनेनेंच ती आरोपित केलेली असली पाहिजे. वेदांत्यांचें ह्मणणें अक्षरशः हेंच आहे. 'वाचारंभणं विकारोनामधेयं मृत्तिकेत्येव सत्यम्'

( छांदो. ६, १, ४ ) ह्या वाक्यांत घटासारख्या सर्व विकारभूत वस्तु केवळ नाममात्र आहेत, उपादानकारणमृत्तिका हाच खरा पदार्थ आहे असें ह्मटलें आहे; त्याचा अर्थ हाच होय. वरील वाक्यांत विकारमात्राला लावलेलें ' वाचारंभण ' पद व प्लेटोचें Ideal ह्या दोहोंचा अर्थ अक्षरशः एक आहे.

तात्पर्य, सर्व जगताला मिथ्या ह्मणजे खोटें मानण्याबद्दल शंकराचार्यांवर जे अनेक पक्षांकडून आरोप केले गेले आहेत, व अजूनही क्वचित् केले जातात, ते निव्वळ अज्ञानमूलक आहेत. बाह्यसृष्टीला शशशृंगाची किंवा दुसऱ्या एखाद्या मुळींच नसणाऱ्या पदार्थाची उपमा न देतां स्वप्नाची उपमा देण्यांत येते ती तर फारच खुबीदार आहे स्वप्नालाही जागृदवस्था येईं-पर्यंत एक प्रकारचें सत्यत्व असतेंच, पण तें क्षणभंगुर असतें. तसाच संसार होय. जागृदवस्थेनें स्वप्नाचा नाश होतो तसाच मोक्षानें संसाराचाही होतो. पण जोंपर्यंत तो नाश झाला नाहीं तोंपर्यंत त्याचें सत्यत्व कदापि नाकबूल करतां यावयाचें नाहीं. म्हणजे जोंपर्यंत मनुष्य संसारांत आहे, तोंपर्यंत त्याला सर्व भेदमूलक लोकव्यवहार खरा धरूनच चाललें पाहिजे. अर्थात लौकिकसत्व कायम आहे तोंपर्यंत आपल्या बाह्येंद्रियांना व परिच्छिन्न बुद्धीला विषयभूत होणारे भौतिकशास्त्रांचे सिद्धांत खरेच आहेत. Matter आणि Force ह्यांजमध्यें भेदबुद्धि आहे तोंपर्यंतच ह्या भौतिकशास्त्रांची स्वारस्यता. पलीकडे तो भेद मिथ्या, तशीं तीं शास्त्रेंही गतार्थच समजलीं पाहिजेत. सारांश, अद्वैतसिद्धांताचा व भौतिकशास्त्रांचा विरोध तर नाहीं-च; पण उलट अत्यंत उपकार्योपकारक भाव आहे. जों जों त्यांची वृद्धि होईल तों तों अद्वैताला बळकटीच येईल. पूर्वी असंख्य पदार्थ मानीत त्या ऐवजीं रसायनवेत्त्यांनीं ६३ च मूलतत्वें निश्चित केलीं, व त्यांतीलही एक एक गळत आहे. पदार्थविज्ञानशास्त्र धर्षण उष्णता विद्युत् इत्यादि भिन्न भासणाऱ्या शक्तींचें एकीकरण करण्याच्या खटपटींत आहे. शेवटीं सर्व वैचित्र्य जाऊन Matter (परमाणु) आणि Force ( शक्ति) हे दोनच पदार्थ उरतात. येणेंप्रमाणें अनेकत्वाची द्वैता-पर्यंत तर मजल सध्या येऊन पोंचली आहे. तेव्हां जसजसा

मानवीबुद्धीचा विकास होत जाईल, तसें हें द्वैतही नष्ट होऊन पूर्ण अद्वैत स्थापन होईल असें मानण्यास काय प्रत्यवाय आहे? तत्त्वज्ञानानें तें आतांच सिद्ध केलें आहे; कांहीं दिवसांनीं भौतिकशास्त्रवादीही तें कबूल करतील.

असो; अद्वैतमताचीं प्रचंड विरोधी भासणारीं जीं भौतिकशास्त्रें त्यांचा विरोधपरिहार आज केला; पुढील खेपेस युरोपियन तत्त्वज्ञानाशीं त्याची तुलना करूं.

---

# प्राच्य व पाश्चात्य तत्त्वज्ञानांची तुलना.

## अध्याय ५ वा.

Who dares to name Him ?
Who to say of Him, I believe ?
Who is there ever
With a soul to dare,
To utter, I believe Him not ?
The All-encompasser, the All-upholder,
Enfolds, sustains He not
Thee, me, Himself ?*

*Goethe, Faust.*

ज्याचें स्वरूप वर्णन करतांना महाकवि गेटीच्या तोंडून वरील प्रकारचे उद्गार निघाले व ज्याचें वर्षानुवर्ष चिंतन

---

* त्या सृष्टिकर्त्या ईश्वराचें नामरूप वर्णन करण्यास कोण समर्थ आहे ? तसेंच त्याजवर माझी पूर्ण श्रद्धा आहे असें कोण म्हणूं शकेल ? अथवा त्याच्यावर माझा मुळींच विश्वास नाहीं असें म्हणण्याचें धाडस करणारा तरी कोण प्राणी पृथ्वीवर सांपडेल ? तो विश्वव्यापी व विश्वाधार परमेश्वर तुला, मला, आणि आपणा स्वतःलाही व्यापून सर्वांचें नियमन करीत नाहीं काय ?

गेटी, फास्ट.

करूनही याज्ञवल्क्यासारख्या महर्षींना अखेरीस 'अथात आदेशो नेति नेति ' ' स एष नेति नेत्यात्मा ' इत्यादि स्वाज्ञानबोधक उद्गार काढावे लागले, त्या सकल चराचरव्यापि अद्वितीय परब्रह्माची आमच्यासारख्या क्षुद्र जंतूंनीं वर्तमानपत्राच्या तुटपुंज्या जागेंत मीमांसा करूं पहाणें ह्मणजे टिटवीनें आकाश तोलून धरण्यासारखेंच आहे. तेव्हां असलें धाडसाचें काम पत्करण्याऐवजीं प्रस्तुत मीमांसेला उपक्रम करण्यांत आमचा मुख्य हेतु संकुचित व स्वल्प होता, हें वाचकांस कळविलें पाहिजे. आमचें काम फक्त मार्गदर्शकाचें आहे; परंतु त्या मार्गांत क्षणोक्षणीं येणाऱ्या अडचणी दूर करून ' तद्विष्णोः परमं पदं ' ह्या काठक श्रुतीनें बोधित केलेल्या परमपदाप्रत पोंचविणारा अपरोक्षज्ञानी वाटाड्याच पाहिला पाहिजे, अर्थात् वेदांतमतांचें सविस्तर ज्ञान करून घेण्याची ज्याला इच्छा असेल, त्याला सध्यां तरी उपनिषदें ब्रह्मसूत्रें व त्यावरील शंकराचार्यांचे व तच्छिष्यांचे ग्रंथ वाचण्याखेरीज गत्यंतर नाहीं. परंतु त्या मूलग्रंथांचें अध्ययन तर एकींचकडे; पण मुकुंदराज, ज्ञानेश्वर, वामन, रामदास वगैरे अलीकडील साधु कवींनीं प्राकृत ग्रंथांत वेदांताचें सार आणून ठेवलें आहे तिकडेही लोकांचें लक्ष जात नाहीं, ही मोठ्या खेदाची गोष्ट आहे. वस्तुतः हे प्राकृत ग्रंथ बहुतेक सिद्धांतरूपी असल्यामुळें हल्लींच्या तर्कशास्त्रप्रवीण व नास्तिकपक्षाभिनिविष्ट पिढीचें त्यांजपासून फारसें समाधान होण्याचा संभव नाहीं. तेव्हां एक तर मूळ आचार्यांच्या ग्रंथांचेंच अध्ययन सर्वत्र सुरू झालें पाहिजे, किंवा त्या नमुन्यावर व प्रस्तुत कालाला अनुरूप असें अद्वैतप्रतिपादक ग्रंथ प्राकृतांत झाले पाहिजेत. एरव्हीं परकी विद्येच्या संसर्गानें वाढत जाणारी अश्रद्धा कमी करण्याला दुसरी तोड नाहीं. पुरातन हिंदुधर्माचा उद्धार करावयाचा असेल तर तो ग्रामण्यांनीं किंवा प्राय-

श्चित्तांनीं होणार नाहीं. ज्या अज्ञानामुळें किंवा अल्पज्ञानामुळें आधुनिक लोकांकडून ( व त्यांत जुन्या, नव्या, सुधारक व दुर्धारक सर्वांचा समावेश होतो ) हिंदुधर्माची पायमल्ली होत आहे तें अज्ञान दूर करण्याला ज्ञानांजनच पाहिजे. तें कसें प्राप्त करून घ्यावें व हल्लींच्या सुधारणावादींची दिशा चुकत आहे ती कशी नीट करतां येईल, हें दाखविण्याकरितांच आह्मीं हा विषय हातीं घेतला. **विक्लिफ, लूथर, नॉक्स, वेस्ले** इत्यादिकांनीं युरोपांत जी धर्मसुधारणा केली ती परकी धर्माचें अनुकरण करून किंवा दुसऱ्याचे उष्टे आचारविचार स्वदेशबांधवांच्या डोक्यावर लादून केली नाहीं. तर हजार बाराशें वर्षांपासून जें ख्रिस्ती पवित्र शास्त्र जनसमूहाला अज्ञातप्राय झालें होतें त्याची सर्वांना ओळख करून देऊनच केली. त्याचप्रमाणें **श्रीशंकराचार्यां**नीं बौद्धमतांचा उच्छेद केला तो श्रुतिस्मृतींचा जीर्णोद्धार करूनच; केशवमहर्षीच्या नवसंहितेप्रमाणें अपूर्व धर्मग्रंथ रचून नव्हे. वस्तुतः आमची आम्हांला ओळख विसरली आहे ती करून देणें हीच प्रस्तुत काळीं खरी सुधारणा आहे. ह्या दिशेकडे लोकांचें लक्ष लागावें असा आमचा मुख्य उद्देश असल्यामुळें आह्मी वेदांतमतांचें सविस्तर निरुपण करण्याच्या भानगडींत न पडतां त्यांजविषयीं लोकांची जिज्ञासा प्रज्ज्वलित करणें, व त्यांच्याविरुद्ध निरनिराळ्या पक्षांकडून येणाऱ्या आक्षेपांचें निराकरण करणें येवढींच कामें पत्करलीं आहेत त्यांपैकीं मुख्य मुख्य आक्षेपांचा गेल्या एक दोन लेखांत विचार केला, व प्रसंगोपात् कित्येक वेदांतसिद्धांताचाही उल्लेख करण्यांत आला आहे. शिवाय हें आमचें सामान्य विवेचन चांगलें समजावें ह्मणून अगोदर प्रो० **ड्यूसन** साहेबांच्या उत्कृष्ट व्याख्यानाचा सारांश दिला होता, त्यावरून एकंदर अद्वैतमताची साधारण कल्पना वाचकांस आली असेलच. तेव्हां त्याच गोष्टींची येथें द्विरुक्ति न करितां, त्यां-

पैकीं प्रधान ह्मणजे मूलभूत सिद्धांत कोणते व गौण ह्मणजे कालांतरानें व अधिकारीभेदानें फिरूं शकणारे कोणते ह्याचें थोडेंसें दिग्दर्शन करून आजचा मुख्य विषय जो अद्वैताची व युरोपियन तत्त्वज्ञानाची तुलना तिकडे वळूं.

हा गौण प्रधानभेद करण्याची एक रीति मागील खेपेस सांगितलीच आहे. निर्गुण ब्रह्मासंबंधाचे सिद्धांत तद्विषयीभूत निर्गुण ब्रह्माप्रमाणेंच सर्वदां प्रधान व सत्य असले पाहिजेत; पण सगुण ब्रह्मासंबंधानें तशी स्थिति नाहीं. सगुण ईश्वराच्या कल्पना निरनिराळ्या देशांत, काळांत व लोकांत निरनिराळ्या प्रकारच्या आढळतात. इतकेंच नाहीं, तर एकाच देशांत व एकाच काळींही ह्या ईश्वरस्वरूपासंबंधानें पुष्कळ मतवैचित्र्य दिसून येतें. आतां ह्या सगुण कल्पनांचेंही निर्गुणाशीं त्यांची तुलना करून तारतम्य ठरवितां येईल. जितकें सगुण कल्पनेचें निर्गुण ब्रह्माशीं अधिक साम्य असेल तितका तो धर्म चांगला व वरच्या पायरीचा समजला पाहिजे. उदाहरणार्थ, अफ्रिकन रानटी लोकांतील झाडपाल्याचा मंबोजंबो, रोमन लोकांचा जुपिटर, खिस्ती लोकांचा कामक्रोधाविष्ट पिता, व हिंदुधर्मांतील विराटस्वरूप हिरण्यगर्भ, ह्यांपैकीं पुढची पुढची कल्पना मागच्यापेक्षां अधिक उदात्त आहे हें कोणीही कबूल करील. अर्थात् ह्या दृष्टीनेंही हिंदुधर्म सर्वांत श्रेष्ट ठरतो. पण तो स्वतंत्र विषय असल्यामुळें आम्हांला सध्यां त्याच्याशीं कर्तव्य नाहीं. कोणत्याही ईश्वरस्वरूपाची भक्ति करा, त्या स्वरूपाप्रमाणें त्या भक्तीची योग्यता व फळ हें हिंदुधर्माचें मुख्य तत्त्व आहे, व तें "ये यथा मां प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहम्" ह्या भगवद्वचनांत व्यक्त करून दाखविलें आहे. आपल्याला अद्वैताशीं काम आहे तेव्हां हा द्वैताचा किंबहुना नानाविधत्वाचा प्रांत अजीबात खालीं टाकून वर उच्च प्रदेशांत जावें, व मुख्य परब्रम्हविषयक सिद्धांतांचाच विचार करावा हें उत्तम.

हे मुख्य सिद्धांत पांच सांगतां येतील. ( १ ) ब्रह्म अद्वितीय असून सृष्टीचें उपादान व निमित्त कारण आहे. ( २ ) ही जगदुत्पत्ति मायामूलक व मिथ्या आहे. ( ३ ) जीवब्रह्माचें पूर्ण तादात्म्य आहे व भेद अविद्यामूलक आहे. ( ४ ) हा भेद उपस्थित करणारा जन्ममरणपरंपरारूप संसार प्राणिकर्मांनें उत्पन्न झाला आहे व त्या कर्मांचे नाशानेंच फक्त नष्ट होईल ( ५ ) सदहू कर्मनाश होऊन मोक्षप्राप्ति होणें फक्त ज्ञानानेंच साध्य आहे. ह्या पांच सिद्धांतांपैकीं बहुतेकांसंबंधानें लोकांत पुष्कळ अज्ञान व गैरसमज आहे हें मागील खेपेस माया व मिथ्या शब्दांविषयीं विवेचन केलें त्यावरून लक्षांत येईलच; तथापि ह्या सर्व गैरसमजांचें सविस्तर विवरण किंवा साधकबाधक विचार करण्यास येथें सवड नाहीं. वरील सिद्धांतांपैकीं पहिले दोन बाह्यसृष्टिविषयक आहेत, व दुसरे दोन आत्म्यासंबंधाचे आहेत, आणि पांचवा आत्मब्रह्माचें तादात्म्य घडवून आणणारा आहे. म्हणजे पहिली जोडी विषयप्रतिपादक, दुसरी विषयिप्रतिपादक व शेवटचा विषयविषयींचा अभेददर्शक होय. आतां अद्वैताची पाश्चात्य तत्त्वज्ञानाशीं तुलना करावयाची म्हणजे हे सर्व प्रकार दुसऱ्यांत कसे निर्दिष्ट केले आहेत हें पहाणें होय. पूर्णपणें ही तुलना करणें बरेंच कठीण व अवकाशाचें काम आहे. तसें करण्याला भरतखंडांत उत्पन्न झालेल्या वेदांतादि विविधमतांचें स्पष्ट विवरण केलें पाहिजे इतकेंच नाहीं, तर युरोपांतील प्राचीन, अर्वाचीन एकंदर तत्त्वज्ञानाचा इतिहासही दिला पाहिजे. **थेल्सपासून हार्टमनस्पेन्सरपर्यंत** मुख्य मुख्य तत्त्वविवेचकांचे सिद्धांत सांगितले पाहिजेत; व जागजागीं त्यांचा परस्परकार्यकारणभाव, साधर्म्यविरोध, व सत्यासत्यत्व दाखविलीं पाहिजेत. पण इतकें करण्याची आह्मांस सवड नाहीं, व जरूरही नाहीं. कारण अद्वैतमताचें श्रेष्ठत्व स्थापन करणें हा जो आमचा मुख्य उद्देश तो एकंदर

पाश्चात्य तत्त्वज्ञानाचें विहंगमदृष्टीनें अवलोकन केल्यानें किंवा स्थालिपुलाकन्यायानें त्यांतील वेंचक सिद्धांत सांगितल्यानेंही साधनार आहे.

प्रथमतः हिंदुधर्माचें व युरोपियन तत्त्वज्ञानाचें एक फार महत्वाचें सादृश्य आहे त्याचा उल्लेख केला पाहिजे. अतिप्राचीन वैदिककालापासून तो अलीकडील देशी भगवद्भक्तांपर्यंत तमाम हिंदुधर्मपंथांचें व मतसांप्रदायांचें पर्यवसान अद्वैतांत होतें, असें आह्मीं पूर्वीं दाखविलेंच आहे. तसेंच पाश्चात्य भौतिकशास्त्रांचा कल देखील उत्तरोत्तर अद्वैतस्थापनेकडेच आहे, असेंही गेल्या खेपेस सांगितलें. युरोपियन तत्त्वज्ञानाचा इतिहास पाहिला तर त्याला हें विधान अधिक अक्षरशः लागूं पडतें. द्वैताद्वैताच्या तंट्याचा मूळ प्रारंभ **प्लेटो** आणि **अरिस्टाटल** ह्या गुरुशिष्याच्या जोडीपासून झाला. **अरिस्टाटल** द्वैती, जगत्सत्यत्ववादी, व तर्काचें अवडंबर माजविणारा; व **प्लेटो** त्याच्या उलट सृष्टीचें काल्पनिकत्व, जन्मांतर, कर्म वगैरेवर विश्वास ठेवणारा होता. आमच्या इकडील मीमांसक कुमारिलप्रभाकराप्रमाणें वरील गुरुशिष्यांतही व त्यांच्या अनुयायांत विरोध उत्पन्न होऊन कडाक्याचा वाद चालू होता. प्रथम बरेच दिवस **प्लेटो**च्या मताची सरशी होती, व 'निओप्लेटोनिस्ट' सारखे पूर्ण अद्वैतीपंथ प्रादुर्भूत झाले. पण पुढें खिस्तीधर्माचा जसजसा प्रसार होत चालला तसें द्वैतही माजत चाललें. **अरिस्टाटल**चे ग्रंथ वेदवाक्य होऊन बसले. 'नामिनालिस्ट,' 'रिआलिस्ट,' 'कन्सेप्शनिस्ट' वगैरे मतांचा झगडा सुरू झाला. शेवटीं ह्या शुष्क वाग्जालाचा लोकांना वीट येऊन एकंदर तत्त्वज्ञानाचा उपहास होऊं लागला. अशा वेळीं इंग्लंड व फ्रान्स येथें दोन पुरुष उत्पन्न होऊन त्यांनीं अनुक्रमें अर्वाचीन भौतिकशास्त्रांचा तत्त्वज्ञानाचा पाया घातला. **फ्रान्सिस बेकन**ला जसें

भौतिकशास्त्राचा जनक ह्मणतात, तसेंच डेकार्टला अर्वाचीन युरोपियन तत्त्वज्ञानाचा आद्य गुरु मानलें पाहिजे. पुढील हरएक ग्रंथकारांनीं डेकार्टचें शिष्यत्व कबूल केलें आहे, व त्यांच्या सर्व तत्त्वविचारांना डेकार्टच्या चमत्कारिक सिद्धांतांनीं वळण लावलेलें दिसतें. आरिस्टाटलप्रमाणें डेकार्टही द्वैतीच होता. तथापि प्लेटोचें Innate Ideas ह्मणजे 'स्वयंभू कल्पना' चें मत त्यानें घेतलें, आणि त्यामुळें हें मत पुढें एकाद्या प्रत्यक्ष प्रमाणाप्रमाणें निर्विवाद होऊन बसलें. पण प्लेटोचें एवढें एक मत कबूल केल्यानें पुढें इतर अद्वैतप्रतिपादक सिद्धांतांचा प्रवेश होण्यास फारच सुलभ होईल, हें डेकार्टच्या लक्षांत आलें नाहीं. जगत्कर्त्या ईश्वराचें अस्तित्व डेकार्टनें ईश्वरविषयक उपजत ज्ञान मानूनच सिद्ध केलें. तसेंच प्रत्येक जीवात्म्याचें सत्यत्व स्थापन करणारा *Cogito, ergo, sum* ह्मणजे 'मी विचार करतों सबब मी आहें' हा त्याचा सुप्रसिद्ध परिष्कार स्वयंभू कल्पनांच्याच आधारावर रचला होता. वरील परिष्कारानें विचार करणारा मी आत्मा ह्याचें अस्तित्व सिद्ध होईल खरें; पण तो आत्मा आणि तत्कार्यविचार हीं दोन्ही एकच कीं भिन्न आहेत हा प्रश्न पुनः उद्भवतोच. वस्तुतः तें अनुमानच बरोबर नाहीं; कारण त्याला दृष्टांत नसल्यामुळें तें हेत्वाभासकोटींत घालावें लागेल. डेकार्टचेंही ह्मणणें तें अनुमान नाहीं, तर भूमितीच्या प्रत्यक्ष प्रमाणासारखी ती एक स्वयंभू कल्पना आहे. अर्थात् आत्म्याचें विचार करणें व विद्यमान असणें ह्या दोन्ही क्रिया एकच व ज्यावेळीं पहिली क्रिया थांबेल त्यावेळीं दुसरीही थांबलीच पाहिजे; सबब जितक्या विचारक्रिया भिन्न तितके आत्मेही भिन्न असें जीवात्म्यांचें नानात्व स्थापन होतें. पण ह्या तर्कप्रपंचांत एक ढोबळ चूक झाली. कारण डेकार्टच्या ह्या मताप्रमाणें झोंपेंत ज्यावेळेस सर्व विचारक्रिया थांबत

त्यावेळेस आत्माही नष्ट होतो असें मानावें लागेल. हा आक्षेप टाळण्याकरितां आत्मा आणि तत्कार्यविचार हीं भिन्न आहेत असें पुढील तत्त्वज्ञान्यांना कबूल करावें लागलें. येणें-प्रमाणें बुद्धीचें व जीवात्म्याचें एकदां पृथक्करण झाल्यावर त्याचें व्यापकत्व किंवा एकाद्या सर्वव्यापि आत्मतत्त्वाचें अंशित्व स्थापन करण्याचा रस्ता खुला झाला. एवढ्यानेंच द्वैताचा पुरा मोड झाला नाहीं हें खरें; तथापि **डेकार्ट**च्या मागून झालेले **स्पिनोझा, मालिब्रांची, ह्यूम, बर्कले, सर विल्यम हामिल्टन, क्यांट, फिक्टी, शेलिंग, हेगेल, शोपेनहोर, हार्टमन, स्पेन्सर** ह्या सर्व तत्त्वज्ञान्यांचें मुख्य लक्ष द्वैताकडून निघून, सदर्हू जगदाधारभूत व्यापक अद्वितीय आत्मतत्त्वाचें स्वरूप कायम करण्याकडेच लागलें हा लहानसहान परिणाम नाहीं. त्यावरून ह्या अद्वैताच्या सत्यत्वाविषयीं तरी इतःपर कोणाला शंका उरली नाहीं, असें स्पष्ट दिसून येतें. त्याच्या विशिष्ट स्वरूपाविषयीं मात्र कायतो मतभेद राहिला. निरनिराळ्या ग्रंथकारांनीं ह्या अद्वैततत्त्वाला निरनिराळीं नांवें दिलीं. **स्पिनोझा** त्याला Universal Substance ( सर्वव्यापक द्रव्य ) ह्मणतो; **क्यांट** Unconditioned ( अपरिच्छिन्न ) म्हणतो; **शेलिंग व फिक्टी** Absolute Being किंवा Idea ( अविकृत आत्मा अथवा कल्पना ) म्हणतात; **हेगेल** Universal and Pure Being ( नित्य व शुद्ध आत्मा ) ह्मणतो; **शोपेनहोर** Universal Will ( व्यापक इच्छा ) ह्मणतो; आणि **हार्टमन** Unconscious ( अव्याकृत ) असें नांव देतो. अखेरीस **हर्बर्ट स्पेन्सर** त्या ब्रह्मतत्त्वाला Unknown and Unknowable ( अज्ञात व अज्ञेय ) ठरवून निराश होतो. तसेंच नामभेदाप्रमाणें आत्म्याचा गुणकर्मभेद व इतर आनुषंगिक मतभेदही कमीजास्ती अंशानें ह्या निरनिराळ्या ग्रंथकारांमध्यें आढळतो. पण त्याशीं आपणाला

सध्यां कर्तव्य नाहीं. ते सर्व ग्रंथकार कमीअधिक अंशानें अद्वैतमतवादी आहेत, व ह्या सर्व तत्त्वविचारांचा प्रवाह उत्तरोत्तर शांकर अद्वैताकडेच झुकत आहे, ह्या दोन मुख्य मुद्याच्या गोष्टी आहेत; व त्या अलीकडील पाश्चात्य तत्त्वविचाराचें सूक्ष्म अवलोकन केलें असतां निर्विवाद सिद्ध होतात. हेगेल-नें लिहिलेल्या तत्त्वज्ञानाच्या इतिहासांत त्या उत्तम रीतीनें सिद्ध करून दाखविल्या आहेत. तेव्हां त्यासंबंधानें येथें पाल्हाळ करण्याऐवजीं प्रत्येक आंग्लभाषाकोविदानें तो ग्रंथ अवश्य वाचावा अशी आह्मी शिफारस करतों. अगदीं अलीकडील हार्टमनच्या अव्यक्त मताचें तर वेदांतसिद्धांतांशीं अतिशयच साम्य दिसून येतें. आणखी एक प्रमाण आहे. ह्या निरनिराळ्या तत्त्वज्ञान्यांच्या मतांत फारसा नवीनपणा नसून त्यांच्यासारखींच मतें आमचेकडेही एके वेळीं प्रचलित होतीं. डेकार्टचें व सांख्याचार्य कपिलाचें अनेक बाबतींत निकट साम्य आहे. डेकार्टची matter आणि mind व सांख्यांची प्रकृति पुरुष हीं एकच. डेकार्टचा Cogito ergo sum हा परिष्कार व सांख्यांचा 'घटज्ञानवान् अहम' हा अध्यवसायरूपी अहंकार समानच मानले पाहिजेत. डेकार्टच्या सिद्धांतांनीं पुढें शोपेनहोरच्या अद्वैताला जसा रस्ता सुगम केला; तशीच इकडे सांख्यप्रक्रियेवर वेदांताची इमारत रचली गेली. डेकार्ट जसा सांख्य, त्याचप्रमाणें स्पिनोझाला सर्वास्तित्ववादी व फिक्टीला विज्ञानवादी बौद्ध ह्मणण्यास हरकत नाहीं. वैशेषिकमताचा प्रतिष्ठापक कणाद आणि Transcendental Reason शोधून काढणारा क्यांट ह्यांचेंही बरेंच साम्य आहे. 'सप्तभंगीनया'च्या साहाय्यानें अनुभवमात्राची अनिश्चितता सिद्ध करणाऱ्या जैनांना Relativity of Knowledge ह्मणजे ज्ञानाचें परिच्छिन्नत्व व सापेक्षत्व प्रतिपादणारे ह्यामिल्टन-प्रभृति पाश्चात्य तत्त्वज्ञानी बरेच जवळ जवळ आहेत. तेव्हां

हिंदुस्थानांत जर पूर्वी अनेक वेळां सांख्य बौद्ध व वशेषिक मतें खंडित होऊन पूर्ण अद्वैत स्थापन झालें, तर युरोपांतही तत्स्थानापन्न झालेलें हार्टमनचें तत्त्वज्ञान कांहीं काळानें तरी सर्वसंमत होईल असें मानण्यास काय प्रत्यवाय आहे ?

तात्पर्य इतिहासाची केव्हां केव्हां पुनरावृत्ति होते अशी एक म्हण आहे, तिचा ह्या बाबतींत चांगला अनुभव येतो. हिंदुस्थानांत ज्याप्रमाणें अनेक मतें विमतें कांहीं दिवस झगडा करून हतवीर्य झाल्यावर, शेवटीं लोकांच्या संशयग्रस्त चित्तवृत्तींना अद्वैतानन्दांत शांति व स्थैर्य प्राप्त झालें, त्याचप्रमाणें युरोपांतही कांहीं काळानें चोहोंकडे अद्वैतसाम्राज्य सुरू होईल असें मानण्यास बिलकुल हरकत नाहीं. पण हें घडून येण्यापूर्वी युरोपिअन तत्त्वविचारांतील व्यंगें काढून टाकून त्यांना चांगलें वळण लावलें पाहिजे. पाश्चात्यलोकांना हीं आपलीं व्यंगें दिसूं लागण्यास वेदांतग्रंथांची त्यांना चांगली ओळख झाली पाहिजे. ज्याप्रमाणें संस्कृत भाषेची माहिती झाल्यामुळें भाषोत्पत्तीसंबंधानें युरोपियन लोकांच्या समजुती पुष्कळ बदलल्या व बेबलच्या मनोऱ्यासारख्या वेडगळ कल्पना पार नाहींशा झाल्या; त्याचप्रमाणें हिंदु अद्वैतमताच्या ज्ञानानें त्यांच्या धर्मसमजुतीही हटकून सुधारतील. तेव्हां त्यांपैकीं मुख्य दोन तीन व्यंगांचें येथें दिग्दर्शन करणें अप्रासंगिक होणार नाहीं.

# अद्वैतमताचें वैशिष्ट्य.

## अध्याय ६ वा.

The soul that rises with us, our life's star,
Hath had elsewhere its setting,
And cometh from afar :
Not in entire forgetfulness,
Not in utter nakedness,
But trailing clouds of glory do we come
From God who is our home :*

Wordsworth : *Ode to Immortality.*

मागील अध्यायांत हिंदु व युरोपियन तत्त्वज्ञानांचें कित्येक बाबतींत कसें विलक्षण साम्य आढळतें त्याचें दिग्दर्शन केलें. त्यावरून अद्वैतसिद्धांतांच्या सत्यत्वाबद्दल कोणाचीही खात्री होणार आहे. तथापि ते सिद्धांत युरोपियन तत्त्वविचारांशीं जुळतात म्हणून खरे, असें म्हणण्याचा मात्र आमचा भावार्थ नाहीं. परस्परांविषयीं माहिती नसतां एकाच प्रकारच्या कल्पना भिन्न देशांतल्या व भिन्न काळच्या विद्वान् पंडितांच्या डोक्यांत आल्या तर त्या खऱ्या असण्याचा पुष्कळ संभव असतो हें एक,

---

* आमच्या जन्माबरोबर उदय पावणारा व एकंदर जीवयात्रेला प्रकाशित करणारा आत्मरूपी तेजोराशि पूर्वी दुसरीकडे अस्तंगत होऊन या देहांत आला आहे. तथापि पूर्वस्थितीचा त्याला पूर्ण विसर पडला किंवा पूर्वीचे सर्व वासनासंस्कार भवून गेले असें मुळींच होत नाहीं; तर जन्मांतर्गत वासनापटलासहवर्तमान आपण नवीन देहांत जन्म घेतों.

वर्डस्वर्थ, आत्मामरत्व स्तोत्र.

व युरोपियन तत्त्वविचारांचा उत्तरोत्तर अद्वैतसिद्धांताकडेच कल दिसतो हें दुसरें; ह्या दोन कारणांवरून असाच क्रम पुढें चालल्यास थोड्याच दिवसांनीं अद्वैतमत युरोपांत सर्वसंमत होणार हें दाखविण्याचा आमचा उद्देश होता. शिवाय ख्रिस्तीधर्मासारख्या मनुष्यबुद्धीला मोह पाडणाऱ्या अनेक गोष्टींचें युरोपखंडांत प्राबल्य असतांही त्रिकालाबाधित ब्रह्मसत्वाचा थोडथोडा तरी प्रकाश त्यांच्या अंतःकरणांत पडूं लागला आहे हें विशेष ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. परंतु मागें सांगितलेल्या सादृश्यापेक्षांही वैधर्म्यानें युरोपियन विचारांचा कोतेपणा अधिक स्पष्ट होतो; सबब त्या बाजूकडे आतां वळूं.

हिंदु व युरोपियन तत्त्वज्ञानांच्या प्रगमनेतिहासांत जरी पुष्कळ साम्य आढळतें तरी वेदांतमतांत जे कित्येक महत्वाचे विशेष आहेत, त्यांमुळें दोहोंच्या तुलनेंत अद्वैतसिद्धांतालाच वर्चस्व द्यावें लागतें. युरोपियन तत्त्वज्ञानाचें लक्षपूर्वक अवलोकन करणारांना पहिल्या प्रथम एक मोठा भेद तावडतोब दिसून येतो. तो हा कीं, **पायथागोरास**पासून आजपर्यंत जेवढे ह्मणून तत्त्वज्ञानी युरोपखंडांत होऊन गेले किंवा हल्लीं हयात आहेत, त्यांच्या ग्रंथांत मोक्षाची कल्पना बिलकुल सांपडत नाहीं; अथवा असलीच तर फार अपूर्ण, कोती व वेडगळ अशी आढळते. मोक्षप्राप्ति करून देणें हें वस्तुतः धर्माचें काम; पण युरोपांत धर्माची व तत्त्वज्ञानाची ताडातोड झाल्यामुळें, अर्थातूच ते तत्त्वग्रंथकार मोक्षस्वरूप निश्चित करण्याविषयीं ख्रिस्तीधर्मावर हवाला देऊन आपण स्वतः त्यासंबंधानें अगदीं उदासीन राहिले. त्यामुळें एकीकडे ख्रिस्तीधर्मांतल्यासारख्या वेडगळ कल्पना, विचाराची कसोटी न लागल्यामुळें जशाच्या तशाच लोकांच्या मनांत खिळून राहिल्या; व दुसरीकडे तत्त्वविचारांपासून अंतीं कांहीं फलप्राप्ति सांगितली नसल्यामुळें त्यांचीही लोकांना फारशी जरूर वाटत नाहींशी

झाली. युरोपखंडांतील जनसमूहामध्यें तात्विक विचारांविषयीं जी अतिशय अनास्था किंबहुना तिरस्कार दिसून येतो त्याला कारण तसल्या विचारांपासून फलनिष्पत्ति कांहीं एक नसल्यामुळें त्यांत वेळ घालविणें ह्मणजे आयुष्य फुकट दवडण्यासारखें आहे, अशी सार्वत्रिक झालेली समजूतच असली पाहिजे. तत्त्वज्ञानाचा काथ्याकूट ह्मणजे शिळोप्याच्या वेळचे कल्पनातरंग किंवा रिकामपणची करमणूक असें लोकांना दिसून आल्यामुळेंच वरील समजूत उत्पन्न झाली असावी ह्यांत संदेह नाहीं. समजा **डेकार्ट क्यांट** प्रभृतींचे सर्व ग्रंथ पालथे घातले, हेगेलचें ' लॉजिक ' करतलामलकवत् झालें, व स्पेन्सरच्या ' सिन्थेटिक फिलॉसफी ' चीं पारायणें केलीं; तरी त्यापासून फायदा काय, असा कोणीं प्रश्न केल्यास काय उत्तर देतां येईल ! थोडीबहुत कुशाग्रबुद्धि होईल, व एकादा तात्त्विकग्रंथ लिहिण्याचें सामर्थ्य येईल इतकेंच; पण एवढ्यानें जीविताचें सार्थक्य झालें काय ! आपली गति पुढें काय होईल हा जो प्रत्येकाच्या हृदयांत सदा जागरुक प्रश्न असतो त्याला युरोपियन तत्त्वज्ञान बिलकुल उत्तर देऊं शकत नाहीं. तेव्हां **न्यूमन म्यानिंग**प्रभृति परिणतबुद्धि पण श्रद्धालु व्यक्तींसही ह्या घटपटादि खटपटीचा अखेरीस पुरा वीट येऊन पोपमहाराजांच्या कळपांतच पुनः आश्रय करणें बरें वाटावें ह्यांत नवल तें काय ! पण आमच्या वेदांताची रीति वरच्याहून अगदीं भिन्न आहे. त्या शास्त्राला आरंभ करण्यापूर्वी ' मोक्षार्थमिदं शास्त्रम् ' ' निःश्रेयसप्रयोजना वेदान्तवाक्यमीमांसा ' इत्यादि प्रतिज्ञा केलेल्या असतात; इतकेंच नाहीं, तर वेदांताचें अध्ययन करण्याचा अधिकार येण्यास ज्या साधनचतुष्टयाची अवश्यकता मानली आहे त्यांत मुमुक्षुत्व ह्मणजे मोक्षाची इच्छा असणें हें प्रधान मानलें आहे. अर्थात् ज्याला सद्गतीची इच्छा होईल त्याला ब्रह्मज्ञान प्राप्त करून घेण्याची उत्कट इच्छा होणारच. युरोपांत तत्त्व-

ज्ञानाचा लोकांना कंटाळा येतो, कारण तें निष्प्रयोजन आहे. उलट हिंदुस्थानांत आबालपंडितांचा तिकडे ओढा दिसून येतो, कारण ह्या मानवदेहाचें खरें सार्थक्य त्याजपासूनच व्हावयाचें, असें त्यांना पक्कें माहीत असतें. मारूनमुटकून रविवारीं ख्रिस्ती-चर्चांत जमविलेले लोक तेथें झोंप घेतात, नाहीं तर एकमेकां-ची कुचेष्टा करीत बसतात; पण आमचे इकडे लोकांच्या झुं-डींच्या झुंडी वेदांतश्रवणांत तल्लीन झालेल्या आढळतात; ह्यां-तलें खरें इंगित काय असेल बरें ? उद्दिष्ट स्थलाची योजना न करतां बाहेर निघणारा वाटसरू जसा रस्ता फुटेल तिकडे भक-तो, त्याचप्रमाणें युरोपियन तत्त्वविचारांची प्रयोजनाकडे दुर्लक्ष केल्यानें ताळ ना तंत्र अशी स्थिति झाली आहे. पाहिजे त्यानें वाटेल तीं मतें प्रतिपादावींत, व सर्व जगाला मूर्ख ह्मणावें; परंतु हरएक तत्त्वविचारांची कसोटी जी त्यांचें मोक्षप्रापकत्व त्याची एकालाही कल्पना नाहीं. ही झोटिंगपादशाही नाहींशी कर-ण्याला एकच उपाय आहे. तो धर्म आणि तत्त्वज्ञान ह्यांची सांगड घालून देणें हा होय. श्रद्धा आणि विचार ह्यांच्या संग-मापासून प्रादुर्भूत होणारी जी मोक्षरूपी दिव्यसंतति तिची कोणाच्यानेंही बरोबरी करवणार नाहीं.

पण हिंदुअद्वैताकडे श्रेष्टत्व येण्यास ह्यापेक्षांही अधिक सबळ कारणें आहेत. कोणा तरी जगत्कर्त्या ईश्वराचें अस्तित्व आप-ल्याला स्वयंभू कल्पनेनेंच कळतें, हा वर सांगितलेला **डेकार्टचा** सिद्धांत आतां युरोपांत बहुतेकांस पसंत झाल्यासारखा झाला आहे. वेदांत्यांच्या आत्मसाक्षात्काराचेंच हें एक रूपांतर आहे ह्मटलें तरी चालेल. परंतु ह्या स्वयंभू कल्पना ( Innate Ideas) सर्वांच्याच अंतःकरणांत एकसारख्या उद्भवत नाहींत; त्यामुळें पुरुषमतिवैरूप्य जसें जगांत अनंत आहे, तशा ईश्वरस्वरूपविष-यक कल्पनाही निरनिराळ्या आढळतात. श्रद्धाळूंचा भक्तीकडे ओढा असल्यानें त्यांना ईश्वर सगुणरूपानें भासतो; तत्त्व-

ज्ञान्यांना तो निराकार अद्वैतरूपानें भासतो, व भौतिकशास्त्रवाद्यांना तो त्रिकालाबाध्य सृष्टिनियमांच्या रूपानें दृश्य होतो. वस्तुतः ह्या सर्व कल्पना एकाच ईश्वरस्वरूपाच्या तीन निरनिराळ्या बाजू आहेत. पण ही गोष्ट आमच्या अद्वैतवाद्यांना जशी कळून चुकली आहे तशी युरोपियन तत्त्वज्ञान्यांच्या अजून ध्यानांत येत नाहीं. वरील प्रकारच्या सर्व कल्पनांचे मुख्य तीन वर्ग करतां येतील व त्यांना श्रद्धामूलक किंवा विकारमय ( Emotional ), बौद्ध ( Intellectual ), आणि नैतिक ( Moral ), अशीं नांवें देतां येतील. पहिल्या प्रकारची कल्पना बहुधा प्रेमळ, धार्मिक व कोमल अंतःकरणाच्या लोकांत आढळते. दया, शांति, क्षमाशीलत्व, इत्यादि गुण ईश्वराच्याठायीं आरोपित करून त्याची सप्रेम भक्ति करणें व अनन्यभावानें करुणा भाकणें हीं ह्या कल्पनेचीं बाह्य कार्यें होत. ख्रिस्त्यांचा ईश्वरपुत्र व आमचा कृष्णावतार हीं ह्या कल्पनेचीं चांगलीं उदाहरणें आहेत. दया, माया, सौहार्द इत्यादि मनुष्याच्या नैसर्गिक उदात्त मनोवृत्तींना संतोषकारक अशी ही सगुणकल्पना असल्यामुळें सांधारण जनसमूहाचा तिकडेच विशेष ओढा असतो. दुसरा प्रकार बौद्धकल्पनांचा; कारण केवळ बुद्धीपासूनच त्यांचा उगम होतो. तर्कबलानें जें ईश्वरस्वरूप कायम ठरेल तेंच खरें, मग तें मनोवृत्तींना इष्ट वाटो वा न वाटो, अशी ह्या दुसऱ्या लोकांची समजूत असते. जगत्कर्ता ईश्वर निर्गुण, निराकार, अपरिच्छिन्न असल्यामुळें दयालुत्वादि गुण कितीही चांगले असले तरी ते त्याच्या ठिकाणीं मानतां येत नाहींत. सर्व प्रकारच्या युरोपिअन तत्त्वविचारांचा व शास्त्रांचा ह्या दुसऱ्या वर्गांत अंतर्भाव होतो. तिसरा वर्ग नैतिक कल्पनांचा; ह्मणजे सर्व जगत् ज्या नैतिक व सृष्टिविषयक नियमांनीं बांधलें गेलें आहे, व सर्व सृष्टिव्यवहार ज्या नियमांना अनुसरून चालतात, त्या त्रिकालाबाधित नियमांहून जगत्कर्ता ईश्वर

निराळा नाहीं असें मानणारांचा. कायदा ऊर्फ नियम ही अनुल्लंघनीय वस्तु आहे, व तिचें अतिक्रमण झालें कीं हटकून शासन व्हावयाचेंच, ही समजूत या कल्पनेचें फळ होय. बेंथमचा Moral Law (नीतिनियम) व काव्यप्रकाशकारांनीं ब्रह्मसृष्टीला कारण मानलेले 'नियतिकृत नियमं' हे दोन्ही ह्याच वर्गांतील होत. स्वातंत्र्यदेवता, न्यायदेवता, मनोदेवता इत्यादि सर्व अर्वाचीन लाक्षणिक देवता ह्या जगदाधारभूत अनुल्लंघ्य नियमविषयक कल्पनेचेच पर्याय आहेत. ह्या तिन्ही प्रकारच्या कल्पना एकाच ईश्वरस्वरूपाच्या तीन निरनिराळ्या बाजू असल्यामुळें त्या सर्व अंशतः खऱ्या आहेत. व ह्मणून त्यांचें सम्मेलन हेंच ईश्वराचें पूर्ण स्वरूप होय. तेव्हां त्यांपैकीं अमुकच एक खरी व बाकीच्या खोट्या असा दुराग्रह धरणें ह्मणजे आपला एकतर्फीपणा व कोति बुद्धि व्यक्त करणें होय. युरोपांत हीच चूक आज शेंकडों वर्षांपासून चालत आली आहे, व त्याला कारण ख्रिस्तीसारख्या अपरिपक्क धर्माचा तेथें प्रसार होय. धार्मिक लोकांना पहिली कल्पना उत्तम वाटते, तर तत्त्वज्ञानी दुसरीला चिकटून बसणार, आणि भौतिक व नैतिकशास्त्रांचे अभिमानी तिसरीवर जोर देणार; व तिघेही एकमेकाला शिव्या देणार, अशी तेथें स्थिति झाली आहे. ह्या तिन्ही कल्पनांचा भिन्न भिन्न काळीं व स्थळीं युरोपांत प्रादुर्भाव झाला, हें एक त्या आजपर्यंत पृथक् राहण्याचें कारण असेल. दुसऱ्या बौद्ध कल्पनेचा उगम ग्रीकतत्त्वज्ञानापासून झाला, तिसरी रोमन कायद्यानें प्रचारांत आणली, व पहिलीचें ख्रिस्तीधर्मानें स्तोम माजविलें; तथापि ह्या तीन कारणांच्या मेळनानें प्रादुर्भूत झालेल्या अर्वाचीन युरोपियन सुधारणारूपी त्रिवेणीसंगमांत ह्या ईश्वरविषयक कल्पनात्रयाचेंही मेळन झालें नाहीं हा मोठा चमत्कार आहे. ह्यावरूनच धर्मसंबंधानें युरोपखंड अजून पुष्कळ मागें आहे असें ठरतें; व तितक्याच अंशानें

ह्या तिन्ही कल्पनांचें एकीकरण करणाऱ्या आमच्या अद्वैत-मताचें श्रेष्टत्वही सिद्ध होतें. भरतखंडांतही एका काळीं ह्या तिन्ही कल्पना स्वतंत्र रीतीनें व निरनिराळ्या उत्पन्न झाल्या होत्या. "त्रयो धर्मस्कन्धा यज्ञोऽध्ययनं दानमिति प्रथमस्तप एव द्वितीयो ब्रह्मचार्याचार्यकुलवासी तृतीयः" ( छांदो. २, २३, १ ), ह्या छांदोग्य वाक्यांत सांगितलेले तीन धर्मांचे स्कंध ऊर्फ विभाग वरील तीन कल्पनांशीं अक्षरशः नाहीं तरी पुष्कळ जुळतात असें सिद्ध करतां येईल. 'धर्म' शब्दाचा वर सांगितलेल्या तिन्ही अर्थांनीं उपनिषदांत निरनिराळ्या ठिकाणीं उपयोग केलेला आढळतो. यज्ञाध्ययनदानांत श्रद्धापूर्वक केलेल्या उपासनादि कर्मांचा अंतर्भाव होतो, तपशब्दानें परब्रह्माचें मनन व निदिध्यास येतात, व ब्रह्मचार्याश्रमांत नैतिक नियमांचा समावेश केलेला आहे. ह्मणजे ह्या स्कंधत्रयात्मक धर्म शब्दानें वर सांगितलेल्या त्रिविध ईश्वरस्वरूपाचा बोध होतो. पण प्रस्तुत गोष्टीचें उत्तम प्रमाण ह्मटलें ह्मणजे सर्व औपनिषद सिद्धांतांचें सारभूत असलेलें 'सत्यं विज्ञानमानन्दं ब्रह्म' ( बृह. ३, ९, २८ ) हें महावाक्य होय. ह्यांतील 'आनन्दं' 'विज्ञानं' आणि 'सत्यं' हीं तिन्ही उपपदें वरील तीन कल्पनांचीं अनुक्रमानें द्योतक आहेत. "आत्मनस्तुकामाय सर्वं प्रियं भवति,' 'ये शतं मनुष्याणामानन्दाः' इत्यादि वाक्यांवरून 'आनन्द' पदानें मनुष्याच्या मनोवृत्तींना संतोषकारक अशा सगुण ईश्वरकल्पनेचा ब्रह्मांत अंतर्भाव केला आहे हें उघड होतें. **स्पिनोझा, सेंट आगस्टाइन, आन्सेल्म,** इत्यादि पाश्चात्य तत्त्वज्ञान्यांनीं ज्याला God is knowledge असें ह्मटलें आहे त्या ज्ञानरूपी चिन्मय अव्यक्त स्वरूपाचा 'विज्ञान' पदानें बोध होतो. व "एष सेतुर्विधरणः" "सत्यकामः सत्यसंकल्पः" इ० वाक्यांवरून 'सत्य' शब्दानें अव्याहत क्रमानें सर्व सृष्टिव्यवहार चालविणाऱ्या जगदाधार

भूततत्त्वाचा बोध होतो. तात्पर्य, ज्या जगत्कारणब्रह्मस्वरूपाची पाश्चात्य देशांतील एकाही धार्मिकाला किंवा तत्त्वविवेचकाला किंवा नास्तिकाला पूर्ण ओळख झाली नाहीं, त्याचें एका 'सच्चिदानन्द' एवढ्याशा पदसमुच्चयानें वेदान्त्यांनीं बोधन केलें एवढीच गोष्ट त्यांचें श्रेष्ठत्व सिद्ध करण्यास पुरे आहे.

भरतखंडांतही एका काळीं ह्या तिन्ही कल्पना उत्पन्न झाल्या होत्या. प्रारंभीं केवळ बुद्धीच्या साहाय्यानेंच ह्या चराचर ब्रह्मांडाचें अवगाहन करण्याचा सांख्य, बौद्ध, वैशेषिकांनीं प्रयत्न केला; पण त्यांच्या पंचवीस तत्त्वांनीं किंवा सप्त पदार्थांनीं लोकांचें मुळींच समाधान झालें नाहीं. पुढें रोमन लोकांप्रमाणें त्रिकालाबाधित नियमविधींचें महात्म्य सांगणारे कर्मकांडी पूर्वमीमांसक झाले.त्यांनीं चोदनारूपविधीमध्यें सर्व धर्माचें सार आणून ठेवलें. **बेंथमचा** Moral Law व मीमांसकांचे चोदनाविधि ह्यांचा बाह्यस्वरूपांत मात्र भेद; बाकी दोहोंचें मूलतत्त्व एकच, व विचारसरणीही सारखीच. नित्यनैमित्तिक कर्मे करणें हेंच आयुष्यांतील कर्तव्य; व यज्ञपुरुष हीच उपास्य देवता, निराळा ईश्वर असा मुळींच नाहीं हा त्यांचा सिद्धांत असल्या निरीश्वरवादी मीमांसकांच्या मतांचें कांहीं दिवस फार प्राबल्य होतें; पण पुढें त्यांचाही लोकांना वीट आला. अर्थज्ञानविरहित वेदांचें पठन करणारांना **यास्कासारखे** ऋषि भारवाहकाची उपमा देऊं लागले, व **उषस्ति चाक्रायणासारखे** ज्ञानी 'मूर्धा ते विपतिष्यति' असा शाप देऊं लागले. येणेंप्रमाणें कर्मकांडाला कंटाळून **शांडिल्यांनीं** भक्तिमीमांसा केली. पण हा भक्तिमार्गही एकतर्फी वाटूं लागला. तेव्हां तिघांनाही एकवट करणारें औपनिषददर्शन प्रादुर्भूत होऊन पूर्वींची बेबंदशाही मोडली. कांहीं काळानें पुन्हा तसेंच मतवैचित्र्य उत्पन्न झालें; व बौद्ध, कुमा-

रिलप्रभृति मीमांसक, व पौराणिक, अशी त्रयी उत्पन्न झाली. पण पुन्हा **शंकराचार्यांनीं** औपनिषद् सिद्धांतांचा जीर्णोद्धार करून धर्मसंस्थापना केली. अर्थात् हिंदुस्थानांत जो प्रकार दोनदां घडून आला तोच युरोपांतही कधींकाळीं होईल असें मानण्यास काय हरकत आहे? सर्व देशांत व सर्वकाळीं मानवी बुद्धीचा साधारणपणें एकसारखाच विकास होत जातो; तेव्हां हिंदुस्थानाच्या प्राचीन इतिहासावरून युरोपाच्या भावी प्रगतीचें अनुमान करणें अगदींच वावगें होणार नाहीं.

मोक्षासंबंधानें युरोपियन तत्त्वज्ञानी जसे अजून अज्ञानी राहिले आहेत, तशीच जन्ममरणादिकांची उपपत्तिही त्यांना बरोबर कळली नाहीं. बायबल ह्मणतें, ईश्वरानें सहाव्या दिवशीं मातीचा पुतळा करून त्याच्या नाकांत श्वासोच्छ्वास सोडला तसा तो आदम झाला, व त्याच्या उदरास्थीपासून ईव्ह उत्पन्न झाली. ही रानटी कल्पना क्षणभर खरी मानली, तथापि हलीं दर मिनिटास जन्मणारे प्राणी कसे उद्भवतात, व प्रारंभीं तरी एवढा खटाटोप करण्यावांचून आकाशांतील बापाचें काय अडलें होतें, ह्याला जुन्या करारांतील उत्पत्त्यध्याय कांहीं उत्तर देऊं शकत नाहीं. तीच स्थिति युरोपियन तत्त्वज्ञान्यांची व भौतिकशास्त्रवेत्त्यांची आहे. ईश्वराचे घरीं सर्व प्राणी सारखे असतां एक राजा होऊन चैन भोगतो व दुसरा त्याची गुलामगिरी करतो, असा भेद कां व्हावा, ह्याला कोणाच्यानेंही समर्पक उत्तर देववत नाहीं. तसेंच परम कारुणिक ईश्वरानें जगांत मुद्दाम दुःखें उत्पन्न केल्याबद्दल निर्दयपणा व पक्षपातीपणा त्याच्या गळीं येतो, त्याचेंही कोणाच्यानें निराकरण करवत नाहीं. **बिशप बटलर** ह्मणतो, ही कष्टमय ऐहिक जीवयात्रा केवळ पारलौकिकसुखाची पात्रता जिवांच्या अंगीं येण्याकरितांच ईश्वरानें दिली आहे. पण असल्या उत्तरानें एकाद्या पोराचेंही समाधान होणार नाहीं. सर्व शक्तिमान्

ईश्वराला आरंभींच अखिलगुणसंपन्न जीव उत्पन्न करणें अशक्य नव्हतें. बरें हे अपूर्ण जीव त्यानें उत्पन्न केले नाहींत असें ह्मटलें तर ते आले कोठून असा प्रश्न येतोच. तात्पर्य, युरोपस्थ विद्वानांना दुरवगम्य झालेल्या असल्या प्रश्नांना वेदांती मात्र समर्पक उत्तर देऊं शकतो. व तें "वैषम्यनैर्घृण्ये न सापेक्षत्वात्तथा हि दर्शयति" (ब्रह्मसू. ५, १, ३४) ह्या सूत्रांत बादरायणाचार्यांनीं दिलें आहे. "एष ह्येव साधु कर्म कारयति," "पुण्यो वै पुण्येन कर्मणा भवति" इत्यादि वचनांत सांगितल्याप्रमाणें हा सुखदुःखमय संसार शुभाशुभ कर्मनिमित्तच आहे असें मानल्याखेरीज वरच्यासारख्या अनेक शंकांचें कधींही निराकरण होणार नाहीं. परंतु ही कल्पना युरोपियन तत्त्वज्ञांच्या डोक्यांत अजून शिरत नाहीं. स्पिनोझा ह्मणतो एका 'व्यापक द्रव्याचे सर्व चराचर वस्तु विकार आहेत,' फिक्टी ह्मणतो 'त्या छाया आहेत,' व शोपेनहोर ह्मणतो 'एका व्यापक इच्छेचीं तीं कार्यें आहेत;' पण हे विकार, छाया, किंवा कार्यें मूळ उद्भवलीं कशीं ह्याचें कोणीही उत्तर देत नाहीं. हार्टमननें मात्र एक चमत्कारिक कोटी लढविली आहे कीं, "ही सर्व सृष्टि 'अव्याकृत' (ब्रह्म) तत्त्वानें आपलें व्याकरण करण्याकरितांच उत्पन्न केली." ही कल्पना "लोकवत्तुलीलाकैवल्यम्" (ब्रह्मसू. २, १, ३३) ह्या सूत्रांतील समाधानासारखी थोडीशी आहे खरी; पण तेणेंकरूनही पूर्ण समाधान होत नाहीं. आह्मीं मागील अध्यायांत सांगितलेल्या वेदांत्यांच्या पंचमहासिद्धांतांपैकीं चवथा जन्ममरणपरंपरेचें कर्मनिमित्तत्व प्रतिपादन करणारा सिद्धांत युरोपियन तत्त्वविवेचकांच्या स्वप्नांतही आला नाहीं. नाहीं ह्मणावयाला प्लेटोला मात्र त्याचें थोडेंबहुत ज्ञान झालें होतें, हें या लेखावरील अवतरणांत वर्ड्स्वर्थ कवीनें केलेल्या प्लेटोच्या मताच्या अनुवादावरून चांगलें ध्यानांत येईल. ह्या जन्मांत होणारें ज्ञान केवळ स्मृतिरूप

असून मागच्या जन्मांत झालेल्या संस्कारांचेंच फळ आहे असें प्लेटोचें मत होतें, व तें त्यानें अनेक दृष्टांतांनीं सिद्ध केलें आहे. वरतीं सांगितलेल्या 'स्वयंभू कल्पना' असल्या पूर्वजन्मकृत संस्कारांपासूनच उत्पन्न होतात असें तो ह्मणत असे. ह्या प्लेटोच्या मताची पुढें पुष्कळ थट्टा झाली; व त्याचप्रमाणें त्याहून अधिक व्यापक व परिणत अशा वेदांत्यांच्या कर्मसिद्धांतांवरही अज्ञानी आणि परकी लोकांकडून पुष्कळ आक्षेप येतात. परंतु ते सर्व निर्मूल आहेत, व अर्वाचीन शास्त्रशोधावरूनही शेवटीं वेदांत्यांचेंच ह्मणणें खरें ठरूं पहात आहे असें थोडक्यांत आम्हीं दाखविणार आहों.

---

## प्रारब्धसिद्धांत.

### अध्याय ७ वा.

**कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ।**
**मा कर्मफलहेतुर्भुर्मा ते संगोस्त्वकर्माणि ॥**

भगवद्गीता २, ४७.

मागील अध्यायांत कर्मसिद्धांतासंबंधानें प्लेटोचें व **शंकराचार्यांचें** साम्य दाखवून दिलें; व तें साम्य जरी पुष्कळ असलें तरी पूर्ण नाहीं असेंही ध्वनित केलें. कर्मसिद्धांतांत दोन पोटसिद्धांत आहेत; अनेकजन्मपरंपरा व तिचें कर्मकार्यत्व. ह्यांपैकीं पहिला प्लेटोच्या लक्षांत आला होता, पण दुसऱ्याची त्याला बरोबर कल्पना झाली नव्हती; व दोहोंसंबंधानें आमच्या वेदांत्याप्रमाणें त्यानें पूर्ण विचार केला नव्हता असें ह्मणण्यास हरकत नाहीं. शिवाय प्लेटोला ही कल्पना **पायथागोरासपासून** मिळाली, व **पायथागोरा-**

सनें ती इजिप्त, अफगाणिस्थान, पंजाब येथें प्रवास करतांना हिंदुलोकांपासूनच घेतली असें कित्येक ह्मणतात. तेव्हां डेकार्टच्या ‘ स्वयंभू कल्पनां ’ ना कारण झालेलें जें प्लेटोचें मत तें प्रारंभीं हिंदुधर्मांतूनच तिकडे गेलें असें मानण्यास पुष्कळ आधार आहे. कसेंही असो, एवढा लांबीचा प्रवास करतांना त्यांत पुष्कळ छाटाछाट झाली असावीसें दिसतें, कारण अद्वैतांतील कर्मसिद्धांताइतकें तें परिणत नव्हतें; व पुढें त्याला परिपक्वता यावयाची तीही ख्रिस्तीधर्मामुळें अशक्य झाली. जन्मांतर्गत कर्माचें प्रतिपादन करणें ह्मणजे अनीतिमत्तेला उत्तेजन देणें होय, असें ख्रिस्ती पाद्र्यांस वाटून त्यांनीं असल्या सर्व नास्तिकमतवाद्यांना ‘ अग्नये स्वाहा ’ करण्याचा क्रम आरंभिला; पण बिचाऱ्यांना हें ठाऊक नव्हतें कीं, एकुणिसाव्या शतकांतील सुधारणेच्या अत्युच्च शिखरावर आरोहण केलेल्या ख्रिस्ती पाश्चात्यराष्ट्रापेक्षांही नीतिमत्तेंत ज्यांचा वरती नंबर लागतो अशा हिंदुलोकांचे अंतःकरणांत सदर्हू कर्मसिद्धांत फार दिवसापासून पूर्णपणें बिंबून गेले आहेत! पण तो जुलमानें धर्मशील बनविण्याचा काळ आतां गेला व विचारयुगास प्रारंभ झाला आहे; व त्याबरोबर नामरूपांनीं निराळी, पण तत्वतः वेदांत्यांच्या कर्मसिद्धांतांसारखींच मतें युरोपखंडांत जारीनें पसरूं लागलीं आहेत. पाश्चात्य तत्त्वविचारांचा उत्तरोत्तर अद्वैताकडेच कल दिसतो, ह्मणून कांहीं दिवसांनीं युरोपांत सर्वत्र अद्वैतमताची स्थापना होईल असें आह्मीं मागें अनुमान काढलें होतें. कर्मप्रतिपादक सिद्धांतांचा जो फैलाव होत आहे त्यावरून तर त्याला अधिकच बळकटी येते.

ह्या कर्मप्रतिपादक मताचें अर्वाचीन भौतिकशास्त्रसिद्धांतांशीं सादृश्य दाखविण्यापूर्वीं त्यासंबंधानें लोकांत असलेली कल्पना फार चुकलेली आहे हें येथें सांगितलें पाहिजे. ‘ माया ’ व ‘ मिथ्या ’ शब्दांच्या अर्थासंबंधानें लोकांत कसा गैरसमज

पसरला आहे, हें मागील एका अध्यायांत दाखविलें. तोच प्रकार थोड्याबहुत अंशानें प्रस्तुत कर्मसिद्धांतासंबंधानेंही झाला आहे. त्याचें मुख्य कारण, ह्या सिद्धांतांच्या तात्त्विक आणि नैतिक बाजूंचा पृथक् विचार न करतां बहुशः दोहोंचा गोंधळ करण्यांत येतो. हें कर्ममत नीतीला उत्तेजक असो कीं अनीतिप्रवर्तक असो, व्यावहारिकदृष्ट्या त्याचा उपयोग असो वा दुरुपयोग असो; तात्त्विकदृष्ट्या तो खरा आहे कीं नाहीं एवढेंच प्रथम पाहिलें पाहिजे; व नंतर त्याचा नीतीवर काय परिणाम होतो तें पहाणें ठीक होईल. आपल्याला अप्रिय पण सत्य अशा पुष्कळ गोष्टी आपणाला मानाव्या लागतात, त्यांपैकींच ही एक नसेल कशावरून? कर्ममत अनीतिप्रवर्तक असलें तरी तें खरें ठरलें तर अंगिकारलेंच पाहिजे. सत्य हें त्रिकालाबाधित आहे; तेव्हां देशकालभेदानें वारंवार बदलणाऱ्या नीतिकल्पनासाठीं तें कधींही त्याज्य होणार नाहीं. गुरुत्वाकर्षणाचा नियम खोटा मानून कोणी कड्यावरून उडी टाकील तरी त्याचें डोकें फुटावयाचें तें फुटेलच; त्याचप्रमाणें ख्रिस्ती असो वा हिंदु असो, नास्तिक असो वा धार्मिक असो, प्रारब्धकर्माप्रमाणें प्राणिमात्राला फळ मिळावयाचें हा सृष्टिनियमच असला तर तो कधींही भंग होणार नाहीं. तेव्हां ज्यांना कर्ममत अनीतिप्रवर्तक वाटत असेल त्यांनीं त्या मुद्यावर त्याची अवहेलना न करतां आपल्या नीतिकल्पना सुधारण्याच्या उद्योगास लवकर लागावें हें बरें. परंतु हा कर्मसिद्धांत अनीतिप्रवर्तक नाहीं इतकेंच नाहीं, तर त्याच्याइतकें अत्यंत उदात्त व नीतीला अनुकूल दुसरें मतच नाहीं असेंही दाखवितां येईल. मात्र हे दोन्ही विचार वर सांगितल्याप्रमाणें पृथक् ठेवले पाहिजेत.

कार्यमात्राला कारण असलेंच पाहिजे ह्या सामान्य नियमाला अनुसरून जन्ममरणालाही कोणतें तरी कारण पाहिजे, ही

गोष्ट बहुतेकांना संमत आहे. बहुतेकांना ह्मणण्याचें कारण इतकेंच कीं, नदीप्रवाहांतील दोन्हींकडून येऊन मिळणाऱ्या व पुन्हा वियुक्त होणाऱ्या काष्टांप्रमाणें जीवपरमाणू केवळ यदृच्छेनें संयोगवियोग पावतात, असलें यदृच्छात्मक मत प्रतिपादणारेही कित्येक नास्तिक झाले आहेत. पण ही चित्रविचित्र सृष्टि केवळ काकतालीयन्यायानें उत्पन्न झाली असें ह्मणणारांचें तात्पर्य वस्तुतः त्यासंबंधानें आपणाला कांहीं कळत नाहीं, असें सांगण्यांतच असतें. त्यांना 'अनुत्पत्तिप्रसंगः सर्वदा मोक्षप्रसंगो वा ' ही जी उभयतः पाश रज्जु आचार्यांनीं वरचेवर दाखविली आहे, तेवढें उत्तर बस्स आहे. आतां हें जन्मकारण कोणतें याविषयीं मात्र मतभेद आहे. ख्रिस्ती पाद्र्यासारख्या सगुणेश्वर प्रतिपादकांचें ह्मणणें, ईश्वरानें एकंदर चराचरसृष्टि निर्माण केली. परंतु हें मत किती पोकळ आहे तें **बादरायणाचार्यांनीं** 'पत्युरसामञ्जस्यात्, ' 'सम्बन्धानुपपत्तेश्च ' 'अधिष्टानानुपत्तेश्च, ' 'करणवच्चेन्न भोगादिभ्यः ' आणि 'अन्तवत्त्वमसर्वज्ञता वा, ' ( ब्रह्मसूत्र २,२,३७-४१ ) ह्या पाशुपतसिद्धांतखंडनपर पांच सूत्रांत स्पष्ट केलें आहे. उच्चनीच जीव उत्पन्न करणाऱ्या ईश्वरावर रागद्वेषादि दोषांची प्राप्ति येते; कुलालाचा घटाशीं असतो तसा ईश्वराचा सृष्टीशीं संबंध संभवत नाहीं; रूपादिविहीन प्रकृतिपरमाणूपासून ईश्वराला जगत् निर्माण करतां यावयाचें नाहीं; ईश्वराला शरीर इंद्रियें भोग हीं संभवत नाहींत, व त्याच्याशिवाय कार्यनिष्पत्ति व्हावयाची नाहीं; कर्त्याहून कार्य भिन्न मानलें तर परिच्छिन्नत्व असर्वज्ञत्व वगैरे दोष ईश्वरावर येतात. इत्यादि आक्षेपांचें प्राचीन अर्वाचीन कोणत्याही तार्किकाकडून निराकरण झालेलें नाहीं. शेवटीं जन्ममरणादि सृष्टीला जिवाचें अदृष्ट कर्मच कारण होतें असें मानावें लागतें. " यथाकारी यथाचारी भवति, " [ जशीं कर्में करतो व आचरण

ठेवतो तसा होतो ] "तद्य इह रमणीयचरणा अभ्याशोह यत्ते रमणीयां योनिमापद्येरन् अथ य इह कपूयचरणा अभ्याशोह यत्ते कपूयां योनिमापद्येरन्" [ रमणीय आचरण करणारे चांगल्या जन्माला जातात, व वाईट आचरण करणारे वाईट योनींत जन्म घेतात ] इत्यादि अनेक श्रुतिवाक्यांत सांगितल्याप्रमाणें पूर्वार्जित कर्मानुरूपच प्राणिमात्राला जन्मांतरप्राप्ति होते, असें मानल्यावांचून निर्वाह लागत नाहीं. मनुष्य प्रतिक्षणीं ज्या क्रिया करतो त्याचें तत्क्षणीं नाहीं तर केव्हां तरी कार्य झालेंच पाहिजे. हातांतून दगड सुटला कीं तो खालीं पडलाच पाहिजे, त्याचप्रमाणें एकदा क्रिया घडली कीं तिचे परिणामही झालेच पाहिजेत. मग तें फळ ह्या जन्मांत मिळो कीं जन्मांतरीं मिळो. सबब सध्यां जीं आपण फळें भोगतों तीं पूर्वकर्मांचे परिणाम आहेत व हल्लीं कर्में करतों त्याचीं पुढें फळें मिळतील, हें निर्विवाद सिद्ध होतें. आतां पूर्वकर्माचें भावी फल होतें तें त्या कर्माचा चित्तावर संस्कार झाला असतो ह्मणूनच होतें ही गोष्ट ध्यानांत ठेवली ह्मणजे प्रस्तुत कर्ममतावर येणाऱ्या बहुतेक आक्षेपांचें निरसन होईल. युरोपांत मध्ययुगामध्यें नियति ( Necessity ) आणि इच्छास्वातंत्र्य ( Free Will ) ह्या दोन पक्षांचा जो मोठा कडाक्याचा वाद चालला होता, व अजूनही बराच चालू आहे, त्यांत पहिल्या ह्मणजे नियति ऊर्फ प्रारब्धवादी पक्षावर दुसऱ्याचा मोठा आक्षेप काय तो हा होता, कीं सर्व कर्में प्रारब्धानुसार होतात व मनुष्याला इच्छास्वातंत्र्य मुळींच नाहीं असें मानलें, तर मनुष्यावरील सदाचरणाची जबाबदारी उडून जाईल. चोरी खून वगैरे दुष्कृत्यें करणारे लोक प्रारब्धानें तीं करण्यास बुद्धि झाली अशा सबबीवर सुटून जाऊं पाहतील; व तेणेंकरून पाप पुण्य, सद्गुण दुर्गुण, नीति अनीति, ह्यांतील भेदच नाहींसा होईल. हा आक्षेप आह्मीं वर सांगितल्याप्रमाणें प्रारब्धमताचें

तात्त्विक सत्यत्व व व्यावहारिक उपयुक्तता ह्यांचा गोंधळ केल्यामुळेंच उत्पन्न होतो; व म्हणून क्षणभर तो खरा मानला, तरी तेणेंकरून प्रारब्धमताच्या सत्यत्वाला बिलकुल बाध येत नाहीं हें उघड आहे. पण हल्लीं भौतिक व नैतिक शास्त्रसंबंधीं जे सिद्धांत लोकांत पसरत आहेत त्यावरूनही अनुभवदृष्ट्या तो निर्मूल आहे असें स्पष्ट होतें. दुराचरणी लोक स्वेच्छेनें तसे न होतां पूर्वसंस्कारामुळेंच तसे होतात; व त्यामुळें असले लोक शिक्षेपेक्षां दयेसच विशेष पात्र आहेत, असें मत आतां सर्वत्र मान्य झालें आहे. लहानपणीं शिक्षण व संगत असेल त्याप्रमाणें मनुष्य पुढें सुगुणी किंवा दुर्गुणी निपजतो. ह्या हल्लीं सर्वसाधारण झालेल्या समजुतीच्या मुळाशीं तरी पूर्वार्जित संस्कारानुसार मनुष्याच्या हातून बरेंवाईट आचरण घडतें हेंच तत्त्व आहे. पण इतक्यावरच अर्वाचीन शास्त्रवेत्ते थांबले नाहींत. त्यांनीं असेंही सप्रमाण सिद्ध केलें आहे कीं, आईबापांच्या सुकृतदुष्कृतांचाही परिणाम त्यांच्या पुत्रपौत्रांवर होतो. बाप मद्यपी किंवा वेश्यालंपट असला तर मुलेंही तशीं निपजतात, किंवा अनेक शारीरमानसिक व्यथांनीं ग्रस्त होतात. आणि त्यामुळें पुष्कळदां बापाच्या पापांचें मुलांना प्रायश्चित्त भोगावें लागतें. वस्तुतः मुलांचा तेथें काय अपराध असतो ? व बाप तरी आपल्या दुराचरणाबद्दलच्या शिक्षेंतून कां सुटावा ? पण सृष्टिनियम अबाधित चालावयाचे. क्वचित् प्रसंगीं त्याजपासून अन्याय होत असला तरी अमुक कारणांचा अमुक परिणाम झालाच पाहिजे, ह्या नियमाला अपवाद होऊं शकत नाहीं. मुद्दाम कड्यावरून उडी टाकणारा व चुकीनें पाय घसरून पडणारा ह्या दोघांनाही दुखापत सारखीच होते; दुसऱ्याचा अपराध कमी ह्मणून गुरुत्वाकर्षणाचा नियम त्याच्याकरितां भंग होत नाहीं. हाच न्याय

नीतिसंबंधानेंही लावला पाहिजे. बाप दुर्गुणी असला किंवा लहानपणीं कुशिक्षण मिळालें तर मुलगा पुढें चोऱ्या करणार हा नियम अबाधित आहे; मग त्यामुळें त्याच्या इच्छास्वातंत्र्यास बाध येवो न येवो. वेदांतांतील प्रारब्धसिद्धांताचें तरी तात्पर्य हेंच; वस्तुतः इच्छास्वातंत्र्य किंवा क्रियास्वातंत्र्य ह्याचा संकुचित अर्थ केला पाहिजे. जगांतील प्रत्येक वस्तु दुसऱ्यावर अवलंबून असल्यामुळें पूर्ण स्वातंत्र्य कोठेंच नाहीं. सबब स्वातंत्र्य ह्मणजे बाह्यशक्तीचा अभाव इतकाच अर्थ घ्यावयाचा. दुसऱ्याच्या हुकुमानें खून करणारा व रागाच्या आवेशांत खून करणारा हे दोघेही एका अर्थानें सारखेच परतंत्र आहेत; कारण एक परकी पुरुषाच्या व दुसरा मनोविकाराच्या स्वाधीन असतो. तथापि दुसऱ्याचें क्रियास्वातंत्र्य गेलें असें कोणी समजत नाहीं, कारण मनोविकार त्याच्याहून निराळा नाहीं. तत्त्वदृष्ट्या सर्व क्रिया मानसिक संस्काराचेच परिणाम होत. ते संस्कार पूर्वशिक्षणापासून किंवा पूर्वजांच्या आचरणापासून येतात असें हल्लींचे आनुवंशिक मतवादी (Heredity) ह्मणतात; अद्वैती आणखी थोडे पुढें जातात, आणि ह्या क्रियाप्रवर्तक संस्कारांत पूर्वजन्मार्जित संस्काराचाही अंतर्भाव करितात. आईबापासारख्या परकी जिवांचे संस्कार जर मुलाला येऊं शकतात तर त्याच जीवाचे पूर्वस्थितींतील संस्कार येण्यास वस्तुतः मुळींच हरकत नसावी. खरें म्हटलें, तर जन्ममृत्यु हीं केवळ एका स्थितींतून दुसऱ्या स्थितींत जाण्याचीं द्वारें आहेत. "वासांसि जीर्णानि यथा विहाय नवानि गृण्हाति नरोऽपराणि। तथा शरीराणि विहाय जीर्णान्यन्यानि संयाति नवानि देही॥" (भग० २,२२) ह्या भगवद्वचनाप्रमाणें, किंवा "Our birth is but a sleep and a forgetting" ह्या **वर्डस्वर्थ** कवींच्या उक्तीप्रमाणें जन्ममरणपरंपरा हीं फक्त जिवाचीं अनेक

स्थित्यंतरें आहेत. तेव्हां काळचे संस्कार जसे मधल्या निद्रे-मुळें आज नाहींसे होत नाहींत, तसेच पूर्वजन्मींचे संस्कारही ह्या जन्मीं टिकतात व फलप्रद होतात असें मानण्यास काय हरकत आहे ? पण आमचा प्रारब्धसिद्धांत अर्वाचीन भौतिकशास्त्रवेत्त्यां-च्या आनुवंशिक मताशीं (Doctrine of Heredity) समान आहे. इतकेंच नाहीं, तर तो अधिक व्यापक आहे. ह्मणजे हल्लीं लोकमान्य झालेल्या **डार्विनस्पेन्सर**च्या उत्क्रांतिमताशींही ( Doctrine of Evolution ) त्याचें निकट साधर्म्य आहे. उत्क्रांतिमताचें तरी तात्पर्य हेंच कीं, अनेक वेळां एकच कृत्य केलें ह्मणजे त्या प्रकारचा मनावर संस्कार होऊन तशी संवय बनते, व तेणेंकरून प्राण्याच्या अंतर्बाह्य रचनेंतही फरक प-डतो. उंच झाडांचीं फळें वगैरे खाणें भाग पडल्यामुळें उंटाची मान लांब होते, आणि जमिनीवर आसन घालून बसल्यानें वानराची शेपटी झिजून जाऊन मनुष्य बनतो. येणेंप्रमाणें किड्यांचे मासे, माशांचे पक्षी, पक्ष्यांचे चतुष्पाद, व चतुष्पा-दांचे द्विपाद अशी प्राण्यांची उत्तरोत्तर उत्क्रांति होत जाते, असें **डार्विन**नें मत प्रतिपादिलें; व **स्पेन्सर**नें त्याचाच वि-स्तार केला आहे. ह्यांत आणि " रमणीय चरणा ब्राह्मणादि योनिमापद्यन्ते, कपूयचरणाः शूकरयोनिमापद्यन्ते " ह्या वेदांत-मतांत फारसा फरक आहे असें आह्मांला वाटत नाहीं. प्रथम-दर्शनीं दोन महत्वाचे फरक दिसून येतात खरे. एक **डार्वि-न**ची उत्क्रांति फार सावकाश व क्रमानें होणारी आहे; व दुसरी वेदांतमतांत उत्क्रान्तीशिवाय अवक्रान्तीचीही ह्मणजे मनुष्या-पासून शूकरयोनीप्रत जाण्याची कल्पना जास्ती आहे ती **डा-र्विन**च्या मतांत नाहीं. ह्यांपैकीं दुसऱ्यासंबंधानें असें ह्मणतां येईल कीं, **डार्विन**ला समजली नाहीं अशी अवक्रान्तीची क-ल्पना वेदांतांत आहे हा दोष नाहीं, तर त्याच्या अधिक पूर्ण-त्वाचें लक्षण आहे. कारण अनेक प्रमाणांवरून उत्क्रान्ती

( Evolution ) प्रमाणें प्राण्याची अवक्रांतिही ( Degeneration ) होऊं शकते असें सिद्ध करतां येईल. पहिल्या मुद्या-संबंधानें असें उत्तर देतां येईल कीं, **डार्विन**प्रमाणें वेदान्त्या-नींहीं क्रमिक उत्क्रान्तीची कल्पना मानली होती. ' तस्माद्वा एतस्मादात्मन आकाशः संभूतः ' ( तैत्ति० २. १, १ ) इत्यादि वाक्यांत वर्णिलेली बाह्यसृष्ट्युत्पत्ति, किंवा सुप्रसिद्ध पंचाहुति प्रकरणांत सांगितलेली जीवोत्पत्ति ह्या दोन्ही क्रमिक असून व्याकरणरूपच आहेत. वेदान्तग्रंथांतील अव्याकृतांचें व्या-करण व **हर्बर्ट स्पेन्सरनें** सांगितलेली सामान्या ( General ) पासून विशेषाची ( Particular ) अथवा शुद्धा ( Simple ) पासून मिश्राची (Complex) उत्पत्ति हीं दोन्ही एकच आहेत. व्याकरण आणि Evolution ह्या शब्दांचा धात्वर्थ समान तसें तात्पर्यही एकच आहे, व बीजवृक्षांचा दृष्टांत दोघांनाही लागतो. उपादानकारणांत बीजरूपानें असलेल्या गुणांचें बाहेर प्रकट होणें ह्यालाच व्याकरण (वि+आ+करण) किंवा Evolution ( e, ex, and volvo I roll ) ह्मणतात. " यं वै सोम्यैतमणिमानं न निभालयसे एतस्य वै सोम्यैषोऽणिम्न एवं महान्यग्रोधस्तिष्ठति " ( छांदो. ६, १२, २ ) [ हे सोम्य, ह्या बीजांत तुला अदृश्य असा जो अतिसूक्ष्म परमाणु आहे त्यापा-सूनच एवढा मोठा न्यग्रोधवृक्ष उद्भवतो ] ह्या **उद्दालकानें** स्वपुत्राला केलेल्या उपदेशाचें व एका सूक्ष्म जीवपरमाणू ( Protoplasm ) पासून सजीव शरीर उत्पन्न होतें, ह्या अ-र्वाचीन भौतिकशास्त्र सिद्धांताचें स्वरूप एकच आहे. तात्पर्य, **डार्विन**चें उत्क्रांतिमत व त्याच्या पोटांतील आनुवंशिक मत आणि वेदांत्यांचा प्रारब्धसिद्धांत ह्यामध्यें तात्त्विकदृष्ट्या फा-रसा भेद नाहीं. आतां हल्लींच्या भौतिकशास्त्रवेत्त्यांइतका त्यांनीं उत्क्रांतिमताचा पूर्ण विचार केला नव्हता, व तसेंच दृष्टिगोचर प्रमाणें देऊन, व प्रयोग करून आपलें मत सिद्ध

करण्याची रीतिही त्यांना माहीत नव्हती हें खरें. प्राचीनकाळीं रसायनपदार्थविज्ञान इत्यादि शास्त्रें किती बाल्यावस्थेंत होतीं हें लक्षांत आणलें म्हणजे त्याचें आश्चर्य वाटणार नाहीं. पण तेणेंकरून वेदांत्यांच्या मताचें सत्यत्व कबूल करण्यास अडचण येत नाहीं. उलट असल्या बाह्य साधनांचें आनुकूल्य नसतां केवळ एक प्रकारच्या अंतर्ज्ञानानेंच वरील महासिद्धांत आमच्या प्राचीन ऋषींना कळून चुकले, ही गोष्ट त्यांचें विशेष गौरव करते. आतां तत्त्वशोधनांत उत्तम विचारसरणीचाही स्वतंत्र उपयोग असतो हें अंशतः खरें आहे ; व म्हणून अर्वाचीन भौतिकशास्त्रांपासून ती विचारसरणी घेणें आपलें कर्तव्य आहे. उकिडर्यावर पडलेला हिरा जसा कोणी टाकीत नाहीं त्याचप्रमाणें चांगली गोष्ट कोठेंही सांपडली तरी घेण्यास हरकत नाहीं. तेव्हां आमचे वेदान्तसिद्धांत जर खरे आहेत, तर अलीकडील पिढीला ते स्पष्ट समजण्याकरितां अर्वाचीन तर्कपद्धतीचा उपयोग करणें मुळींच वावगें होणार नाहीं. सूर्याला जशी दिवटी नको तशी प्राचीन अपरोक्षज्ञानी वेदांताचार्यांना अनुमानासारख्या अकिंचित्कर साधनांची जरूर नव्हती, व म्हणून त्यांनीं तिकडे दुर्लक्ष केलें. हल्लींच्या अप्रबुद्ध लोकसमाजाला ती जरूर भासूं लागली असल्यास दुसऱ्या अनेक पाश्चात्य संस्थांप्रमाणें युरोपियन विचारसरणीही घेण्यास आमचे शास्त्रकार बिलकुल आड येणार नाहींत.

वरील विवेचनावरून अर्वाचीन शास्त्रशोधांनीं कर्मसिद्धांताचें सत्यत्व कसें उत्तरोत्तर स्थापित होत आहे हें ध्यानांत येईल. तसेंच अनीतिप्रवर्तकत्वाच्या आक्षेपाचेंही निराकरण करण्यास फारसें कठीण जाणार नाहीं. वस्तुतः माझ्या प्रत्येक कर्माचें फल मला कधीं तरी भोगावें लागेल ह्यासारखी नीतीला उत्तेजक दुसरी कोणतीच कल्पना होणार नाहीं. लहान मुला-

प्रमाणें आकाशांतील बापाचा बागुलबोवा दाखवून लोकांना सन्मार्गांत ठेवण्यापेक्षां जसें करावें तसें भोगावें ही समजूत पापभीरुता व स्वावलंबन वाढविण्याला अधिक कारण होईल ह्यांत संदेह नाहीं.

अद्वैतमतावर दुसरा एक आक्षेप असा आहे कीं, त्यांत नैष्कर्म्याचें प्रतिपादन केलें आहे. कर्मे तेवढीं बंधनकारक असें मत बनल्यामुळें सर्वसंगपरित्याग करून अरण्यांत जाऊन रहाणें, हेंच लोकांना आयुष्यांतील कर्तव्य वाटूं लागलें; व त्यामुळें हिंदु लोक इतके आळशी व अजागळ झाले आहेत. हा आक्षेप आणणारांच्या दोन चुका होतात. एक वेदांतांत पूर्ण नैष्कर्म्य प्रतिपादिलें आहे हें खोटें, व दुसरी त्यापासून आह्मी आळशी झालों हेंही खोटें. वेदांतग्रंथांत कर्मनिषेध केला आहे तो व्यावहारिक कर्तव्यांचा नव्हे, तर ज्योतिष्टोमादिस्वर्गफलोद्देशानें केलेल्या काम्य कर्मांचा निषेध होय. तसेंच, प्राकृत कर्मांचीही जी निंदा केलेली आढळते ती त्यांच्या फलांच्या दृष्टीनें केली आहे. संसारबंधनाला कारण नुसतीं कर्मे नव्हेत, तर त्याच्या फलांची इच्छा होते; सबब निष्कामबुद्धीनें पाहिजे तीं कर्मे करण्यास हरकत नाहीं, हा वेदांताचा खरा सिद्धांत होय. व तोच प्रस्तुत लेखावरील अवतरणांतर्गत श्लोकांत भगवंतानीं अर्जुनास सांगितला आहे. कर्मे करूं नये ह्याचा अर्थ फलाची इच्छा धरूं नको एवढाच; रिकामा बैस असा अर्थ करावयाचा नाहीं, असें श्रीकृष्णांनीं स्पष्ट ह्मटलें आहे. "काम्यानां कर्मणां न्यासं संन्यासं कवयो विदुः" "कृपणाः फलहेतवः" वगैरे अनेक स्थळीं कर्मफलत्यागाचा उपदेश करून श्रीकृष्णांनीं अर्जुनास युद्धाला उद्युक्त केलें. नैष्कर्म्यप्रतिपादक वेदांताच्या उपदेशानें धनंजय शत्रुहननासारख्या निर्घृण कृत्यास प्रवृत्त कसा झाला ह्याचें पुष्कळांना गूढ वाटतें. पण वस्तुतः त्यांत आश्चर्यकारक कांहींच नाहीं. "मा ते संगोऽस्त्व-

कर्मणि " ह्मणजे कर्तव्यपराङ्मुख होऊं नको हाच भगवंताचा खरा उपदेश होय. मात्र तीं कर्में स्वार्थदृष्टीनें करूं नको तर परोपकारार्थ कर इतकेंच त्यांचें सांगणें होतें. जें काय करावयाचें तें मनोविकारशांत्यर्थ किंवा वासनातृप्त्यर्थ नाहीं, तर कर्तव्य ह्मणून करावयाचें हा वेदांताचा मुख्य उपदेश होय. व त्याहून उदात्त सिद्धांत दुसऱ्या कोणत्याही राष्ट्रांत किंवा धर्मांत आढळावयाचा नाहीं. इतरांपेक्षां हिंदुलोकांत अधिक परार्थबुद्धि व कर्तव्यपरता आढळून येते ती वरील उपदेशाचाच परिणाम नाहीं काय ?

दुसरा आक्षेप तर अगदींच पोरकट आहे. वेदांतांतील नैष्कर्म्यप्रतिपादनानें हिंदुलोक आळशी झाले ह्मणणें ह्मणजे एका तोंडांत मारली तर दुसरा गाल पुढें करावा, असें बायबलांत सांगितल्यावरून खिस्तपुत्र अतिशय सहनशील बनले आहेत असें ह्मणण्यासारखेंच आहे. दुसरें विधान जसें अनुभवविरुद्ध होईल तसेंच पहिलें खोटें आहे. एवढें मात्र खरें कीं बायबलांतील प्रत्येक आज्ञा तोंडानें वंद्य ह्मणणारे खिस्ती लोक परस्व परजीवित अपहरण करण्यांत नेहमीं गुंतलेले असतात, ह्यावरून जसें त्या बायबलाचें व्यर्थत्व सिद्ध होतें; तशीच वेदांतांत उपदेशिलेली परार्थपरता हिंदुलोकांच्या अंगीं भिनून गेली आहे ही गोष्ट आमची धर्मशीलता व्यक्त करते.

# ज्ञानमाहात्म्य.

## अध्याय ८ वा.

**श्रेयान द्रव्यमयाद्यज्ञाज्ज्ञानयज्ञः परंतप ।**
**सर्वं कर्माखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते ॥**

**भगवद्गीता ४, ३३.**

मागील अध्यायसप्तकांत वेदांतांतील मुख्य मुख्य सिद्धांतांची वाचकांना ओळख करून दिली. प्रो. **ड्यूसन**साहेबांचे व्याख्यानद्वारा एकंदर अद्वैतमताचें सामान्यस्वरूप त्यांजपुढें मांडलें. आजपर्यंत भरतखंडांत उत्पन्न झालेल्या अनेक मतसंप्रदायांपेक्षां त्याचें उत्तमत्व वर्णिलें. सूर्यखद्योताप्रमाणें अद्वैताशीं तुलना केली असतां ख्रिस्तीसारखे सगुणेश्वरप्रतिपादक धर्म किती तुच्छ भासतात हेंही दाखविलें. व शेवटीं अर्वाचीन युरोपियन तत्त्वज्ञानाच्या व भौतिकशास्त्रांच्या सिद्धांतांशीं त्याचें साधर्म्य वैधर्म्य दाखवून अद्वैतमताचें श्रेष्ठत्व स्थापन केलें. परंतु एवढा वेळ केलेलें विवेचन सुंदर मूर्ति घडवून नाक बाकी ठेवण्यासारखें किंवा शिखराविरहित देऊळ बांधण्यासारखें झालें आहे. कारण, एकंदर अद्वैतप्रक्रियेचा ललामभूत किंबहुना पृथ्वीवरील सर्व धर्मसंप्रदायांहून वेदांताचें वैशिष्ट्य दाखविणारा असा मुख्य सिद्धांत अजून सांगावयाचा राहिलाच आहे. प्रसंगोपात् पूर्वी एकदोन वेळां त्याचा उल्लेख करण्यांत आला आहे खरा; परंतु त्याच्या महत्वाला अनुरूप स्वतंत्रपणें दोन शब्द लिहिल्याशिवाय ही मीमांसा कदापि पुरी झाल्यासारखी होणार नाहीं.

कोणत्याही मतसंप्रदायाचा बरेवाईटपणा पहाणें झाल्यास त्याच्या तीन अंगांचा विचार केला पाहिजे. प्रतिपाद्य विषय

प्राप्य फल, व तत्प्रापक साधन, ह्या तिन्ही गोष्टी ज्या धर्मांत उत्तम रीतीनें विचाराच्या कसोटीस उतरतील तो धर्म उत्तम; व जर ह्या तिहींपैकीं एक अंग हीन ठरेल तर तेवढ्या अंशानें तो धर्मही अपूर्ण मानला पाहिजे. वेदांतप्रतिपाद्य निर्गुणब्रह्म व मोक्षफळ ह्या दोहोंचें श्रेष्टत्व मागें दाखविलें; पण प्राकृतजनांस त्यांजपेक्षां साधनविचारच एका अर्थानें अधिक महत्वाचा आहे. ब्रह्मतत्त्वाच्या स्वरूपासंबंधानें अतिशय मतभेद असूं शकेल. " श्रुतिर्विभिन्ना स्मृतयश्च भिन्ना नैकोमुनिर्यस्य मतं प्रमाणम् " अशी सर्वत्र स्थिति असल्यामुळें सिद्धवस्तूसंबंधानें अमुक एक सिद्धांतच खरा व बाकी सर्व खोटे, असें ह्मणणें मनुष्याच्या अल्पबुद्धीस धाडसाचें होणार आहे. पुरुषमतिवैरूप्यामुळें अद्वितीय ब्रह्मतत्त्वासंबंधानेंही नानाविध कल्पना संभवनीय आहेत, व जरी त्यांपैकीं कांहीं चुकलेल्या असल्या तरी असल्या संशयाकुल विषयांत पक्षाभिनिवेष दाखविणें किंवा वितंडा वाढविणें कदापि रास्त होणार नाहीं. निदान लोकव्यवहाराला तरी तेणेंकरून पुष्कळ अडथळा येईल. तसेंच फलाविषयींही कल्पना चुकलेली एक वेळ पुरवेल. कारण असल्या मोक्षविषयक कल्पनांत कितीही हीनोत्तमभाव असला तरी प्रत्येकींत थोडाबहुत चांगलेपणा असतोच, व तेवढ्याचीच कोणी इच्छा करूं लागल्यास त्यास प्रतिबंध करणें उचित होणार नाहीं. " ये यथा मां प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहम् " असें सर्व प्रकारच्या मुमुक्षूंस त्यांच्या त्यांच्या योग्यतेप्रमाणें मोक्षप्राप्ति करून देण्याचें वचन भगवंतांनी दिलें आहे. शिवाय ज्याप्रमाणें लोकव्यवहारांत व्यवसायवैचित्र्य आढळतें त्याचप्रमाणें मोक्षव्यवहारांतही किंचित् उद्दिष्टवैचित्र्य असलेलें वाईट नाहीं. दुसरें, जर मनुष्य सन्मार्गांत आहे तर उद्दिष्ट फलाविषयीं त्याला बरोबर ज्ञान नसलें तरी एक वेळ अडणार नाहीं. एकाद्या अदृष्टपूर्वस्थळीं जाऊं इच्छिणारा वाटसरू जसा

एकदां सरळ रस्त्याला लागला ह्मणजे थेट आपल्या गांवीं जाऊन पोंचतो, त्याचप्रमाणें फलाविषयीं अज्ञान असलें तरी सत्साधनाचा अंगिकार केल्यास मुमुक्षूला कधींना कधीं तें फल मिळेलच. मुंबईहून पुण्यास येणारा मनुष्य बी. बी. सी. आय. गाडींत बसला तर भलत्याच दिशेला जाईल, तसें उद्दिष्ट फलाची कल्पना बरोबर असली तरी भलत्याच मार्गोपदेशानें तें कधींही मिळावयाचें नाहीं. सबब मोक्षस्वरूपापेक्षांही मोक्षसाधन समजणें प्राकृतजनांस अधिक महत्वाचें आहे. तात्पर्य वेदांतानें उपदेशिलेल्या ज्ञानरूप साधनाचें श्रेष्टत्व दाखविणें अत्यंत आवश्यक आहे.

आतांपर्यंत जें अद्वैतसिद्धांतांचें विवेचन केलें तें क्षणभर एकीकडे ठेवूं. प्रत्येक धर्माचे लोक आपआपलीं मतेंच खरीं असा आग्रह धरतात. ख्रिस्ती पाद्री सांगणार आकाशांतील बापच खरा; महंमदी ह्मणणार पैगंबर कायतो श्रेष्ट; जोहोवाखेरीज अन्य देव सैतानाचे दूत असें यहुदी ह्मणतो; व अद्वैतब्रह्माव्यतिरिक्त सर्व जग मिथ्या असें हिंदु वेदांती प्रतिपादतो. तर ह्यांपैकीं खरा कोण? प्रत्येकजण सारखाच आग्रही व पंडितंमन्य दिसतो; तेव्हां शेवटच्याचेंच ह्मणणें खरें व बाकीचे खोटे, असें मानण्याला तरी खात्रीलायक पुरावा काय आहे? मोठ्यानें ओरडेल किंवा लोकांना खूप शिव्या देईल तो खरा असें धरून चाललें तर खिस्ती मिशनऱ्यांचा कदाचित् सर्वांपेक्षां वरती नंबर लागेल; पण निष्पक्षपाती शोधकास ही सत्याची कसोटी संमत होणार नाहीं. वेदान्तसिद्धांतांचें सत्यत्व व श्रेष्टत्व आम्हीं इतका वेळ सिद्ध केलें खरें, पण आमचीही दृष्टि स्वधर्माभिमानानें मंद झाली नसेल कशावरून? आपलें शेंबडें पोर असलें तरी तें मदनमूर्ति वाटतें, त्याचप्रमाणें वाडवडिलांपासून आमच्या अंतःकरणांत खिळून गेलेलीं मतें आह्मांस उत्तम वाटणें स्वाभाविक आहे.

विचारदृष्टीनें खरें ठरेल तें चांगलें, हें ह्मणणें सोपें आहे; परंतु मोठमोठ्या लोकांच्या विचारशक्तीवरही मनोविकारांचा केवढा दाब पडतो ह्याचीं वारंवार उदाहरणें नजरेस येतात. तेव्हां आमच्या तुटपुंज्या तर्कशक्तीनें अद्वैतसिद्धांत खरे ठरले ह्मणजे ते निर्दोष होतात असें नाहीं. हा आक्षेप आह्मांला सर्वथैव कबूल आहे, व ह्मणूनच जरी आह्मीं आतांपर्यंत होईल तितक्या समदृष्टीनें निरनिराळ्या मतांचें परीक्षण करून अद्वैताचें श्रेष्ठत्व स्थापन करण्याचा प्रयत्न केला तरी तो बाजूला ठेवतों. ईश्वरस्वरूपासारख्या इंद्रियागोचर व कल्पनातीत वस्तूसंबंधानें शुष्क वितंडा वाढविण्यापेक्षां तो वादग्रस्त विषय समजून अजीबात एकीकडे ठेवतों; इतकेंच नाहीं तर क्षणभर वेदांतसिद्धांत खोटे व तद्विरुद्ध मतेंच खरीं अशीही कल्पना करतों. तरी देखील जीविषयीं हल्लीं मतभेद होण्याचा संभव नाहीं, किंवा झाला तरी प्रत्यक्ष अनुभवानें तो सहज दूर करतां येईल, अशा एका गोष्टीवरूनच अद्वैताचें श्रेष्ठत्व सिद्ध होतें. ही गोष्ट ज्ञानाचें माहात्म्य होय.

पूर्वीं सांगितलेल्या वेदांतपंचसिद्धांतापैकीं पांचवा सिद्धांत ज्ञानाचें मोक्षप्रापकत्व असा होता, त्याचें स्मरण केल्यास आमच्या ह्मणण्याचें तात्पर्य लक्षांत येईल. पहिले चार सिद्धांत पाश्चात्य धर्मांत किंवा तत्त्वज्ञानांत थोडयाबहुत अंशानें तरी सांपडतात; पण ह्या शेवटच्याचा मागमूसही नाहीं ह्मटलें तरी चालेल. ह्याचें मुख्य कारण यूरोपखंडांत धर्माची व तत्त्वज्ञानाची झालेली तोडातोड होय असें मागें ध्वनित केलेंच आहे. धर्मापासून अलग राहिल्यामुळें तत्त्वज्ञानाला मुक्तीची कल्पना सुचली नाहीं, व तत्त्वज्ञानाशीं विरोध केल्यानें ख्रिस्तीधर्माला ज्ञानाचें पाठबळ नाहींसें झालें; व तेणेंकरून एक निष्फळ व दुसरा अंध होऊन गेला; पण वेदांतानें ह्या दोहोंचा समेट करून मुक्ति व ज्ञान ह्यांचा त्रिकालाबाधित कार्यकारणभाव

घालून दिला. ह्याचा असा परिणाम झाला कीं, ज्ञानप्रसार व धर्मश्रद्धा ह्याचें युरोपांत नेहमीं व्यस्त प्रमाण आढळतें; पण हिंदुस्थानांत तें नेहमीं समच राहिलें आहे.

ख्रिस्तीधर्माची मुख्य मदार भक्तीवर; व ही भक्ति आंधळी असल्यामुळें जसजशी ज्ञानवृद्धि होते, तसतसा तिचा लोप होऊन धर्महि ऱ्हास पावतो. आकाशांतील बापावर किंवा त्याच्या पृथ्वीवरील मुलावर विश्वास ठेवा ह्मणजे तुमचें तारण होईल हें सांगणें, जोंपर्यंत शेंकडा नव्याण्णव लोक अडाणी होते व सर्व विद्या कला ल्याटिन भाषेंत अडकल्या होत्या तोंपर्यंत ठीक होतें. पण ह्या एकोणिसाव्या शतकासारख्या ज्ञानयुगांत तें लोकांना कसें खरें वाटावें? ज्या ख्रिस्ताला पायलेट-पासून स्वतःचेंच रक्षण करतां येईना, तो लोकांचें तारण कसें करणार? अथवा ज्या पवित्रशास्त्रांत पदोपदीं चुका, असंबद्ध प्रलाप, व भाकडकथा भरल्या आहेत, तें पुस्तक सर्वज्ञ ईश्वर करील कसा, असें अलीकडील चाणाक्ष लोकांस वाटूं लागलें तर तो दोष कोणाचा? त्यांच्या समंजसतेचा किंवा ख्रिस्तीधर्माच्या वेडगळपणाचा? भौतिकशास्त्रांची झपाट्यानें वृद्धि होत आहे, लोकांची विचारशक्ति प्रगल्भ झाली आहे, व प्रत्यक्षप्रमाणावांचून कोणतीही गोष्ट खरी न मानण्याकडे त्यांचा कल होत चालला आहे, अशा वेळीं आपलें सर्व ज्ञान गुंडाळून ठेवून अंधपरंपरान्यायानें माझ्यावर विश्वास ठेवा व माझ्याबरोबर तुह्मीही खड्ड्यांत पडा असें सांगणारा धर्म लोकांस कसा रुचावा बरें? ज्ञानसूर्याचा एकदां उदय झाल्यावर बळेंच पांघरूण घेतल्यानें रात्र होत नाहीं. मोठमोठे पगार दिले ह्मणजे हवे तितके भाडोत्री ख्रिस्ती उपदेशक मिळतात; पण तेणेंकरून युरोपांत हल्लीं चोहोंकडे माजत चाललेलें नास्तिक्य झांकून रहात नाहीं. **लार्ड बेकननें** Knowledge is power (ज्ञान ही शक्ति आहे) असें सूत्र केलें खरें; पण

त्यालाँही ह्या ज्ञानशक्तीचा पूर्ण प्रभाव कळला नव्हता असें ह्मणावें लागतें. एरव्हीं विचार व श्रद्धा ह्यांचा भेद करून विचारापासून धर्माला त्यानें दूर केलें नसतें. बेकननें धर्माचें विचारबाह्यत्व प्रतिपादन केलें तें सद्धेतूनें ह्मणजे धर्मसंरक्षणार्थच केलें ह्यांत संशय नाहीं; पण त्याचा परिणाम मात्र अगदीं उलट झाला. बेकनच्या सिद्धांतावरच ह्यूमसारख्याला नास्तिक वादाची इमारत उभारतां आली हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. तेव्हां ह्या प्रबळ ज्ञानशक्तीशीं विरोध करून आपला कोतेपणा जगास व्यक्त करण्याऐवजीं त्या ज्ञानालाच आपलें सहकारी करून घेण्यांत आमच्या वेदांताचार्यांनीं अलौकिक शहाणपण दाखविलें नाहीं काय ? जगांत जेवढें पाप उत्पन्न झालें तें ज्ञानामुळें असें ह्मणणारा ख्रिस्तीधर्म, व सर्व पापांचा नाश केवळ ज्ञानापासूनच असें प्रतिपादन करणारा हिंदुधर्म ह्या दोहोंत किती जमीनअस्मानाचें अंतर आहे ? एडनबागेंत ज्ञानाचें फळ खाल्लें ह्या महान् अपराधाबद्दल आदमईव्हला ईश्वरानें अधःश्च्युति दिली, असें ख्रिस्ती पवित्रशास्त्र सांगतें; व ‘ तरति शोकमात्मवित्,’ ‘सर्वं ज्ञानप्लवेनैव वृजिनं संतरिष्यसि’ असें वेदान्तग्रन्थ ह्मणतात. ह्यापैकीं पुढील पिढीला कोणतें मत ग्राह्य होईल ह्याविषयीं कोणाही समंजस मनुष्याला संशय राहणार नाहीं. वरील अवतरणांतील भगवद्वचनांत निर्दिष्ट केल्याप्रमाणें मोक्षप्राप्त्यर्थ जीं जीं साधनें निरनिराळ्या धर्मगुरूंनीं सांगितलीं आहेत, त्या सर्वांत ज्ञानयज्ञाची कोणालाही सर येणार नाहीं. किंबहुना कित्येक तर उलट विप्रलंभक आहेत. अमक्या पुरुषावर किंवा पुस्तकावर डोळे मिटून विश्वास ठेवा असा मेषपात्र उपदेश हिंदुधर्म करीत नाहीं, तर ज्ञान मिळवा व विशेषेंकरून स्वतःला ओळखा असें अत्याग्रहानें सांगतो.‘ नहि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ’ ‘ ज्ञानाग्निः सर्व कर्माणि भस्मसात् कुरुते तथा ’ इत्यादि अनेक प्रकारें ज्ञानाचा महिमा वर्णन करतांना

आमच्या आचार्यांची वाणी थकून गेली आहे. ख्रिस्ती महंमदीसारखे धर्म लोकांना अज्ञानसागरांत निमग्न ठेवण्याचा अहर्निश प्रयत्न करीत असतां पृथ्वीवर ज्ञपाट्यानें ज्ञानप्रसार होत आहे ही एकच गोष्ट त्या त्या धर्मांचें अकिंचित्करत्व व त्या मानानें अद्वैतमताचें श्रेष्ठत्व सिद्ध करण्यास पुरे नाहीं काय? पूर्वी सांगितलेल्या विशिष्ट सिद्धांतांच्या सत्यत्वाविषयीं विचार एकीकडे ठेवून एवढ्या एकाच सामान्य मुद्यावर वेदांताची इतर कोणत्याही धर्माशीं तुलना करण्यास आह्मी तयार आहों.

येणेंप्रमाणें ज्ञानाला प्राधान्य दिलें, ह्मणून श्रद्धादि इतर साधनांना हिंदुधर्म तुच्छ मानतो असें मात्र होत नाहीं. आत्मानात्मज्ञानाप्रमाणें भक्ति सदाचरण इत्यादिकांचीही प्राणिमात्राला जरूर आहे; पण ती प्राधान्येन नाहीं, तर ज्ञानसाधकत्व रूपानें आहे. ह्मणजे मोक्षाचें साधन ज्ञान, व त्या ज्ञानप्राप्तीला हीं बाकीचीं साधनें आहेत. केवळ भक्तीनें मुक्ति मिळावयाची नाहीं हें खरें; पण श्रद्धा, सदाचरण नसेल तर खरें ज्ञानही प्राप्त व्हावयाचें नाहीं, हा वेदांत्यांचा सिद्धांत आहे. व त्यावरून मोक्षाची व ज्ञानाची किती उदात्त कल्पना त्यांनीं केली होती तें ध्यानांत येईल. ज्या ज्ञानाचा वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें महिमा वर्णिला आहे, तें सहज मिळणारें पुस्तकीज्ञान नव्हे, तर अत्यंत प्रयासानें प्राप्त होणारें अपरोक्ष ज्ञान होय. व हें अपरोक्ष ज्ञान सदाचरणानें व श्रद्धेनें मुमुक्षूंच्या अंगीं पात्रता आल्यावांचून कधींही प्राप्त व्हावयाचें नाहीं. हरदाशी वेदांत कानावरून गेल्यानें, किंवा गुरुमुखापासून उपनिषदांचा एकदां पाठ ऐकल्यानें अथवा त्यापेक्षांही स्वस्त झालेल्या छापील पुस्तकांचीं पानें चाळल्यानें ब्रह्मज्ञान होतें तर आज बहुतेकांना निर्वाण प्राप्त होऊन पृथ्वी निर्मनुष्य होण्याची वेळ आली असती; व अनेक धर्मपंथ, नीति-

ग्रंथ वे कायदे ह्यांचीही जरूर राहिली नसती. पण ज्याला आत्मसाक्षात्कार ह्मणतात तो अपरोक्षानुभव होणें इतकें सुलभ नाहीं. 'तत्त्वमसि' वाक्याचें कितीही शब्दार्थज्ञान झालें तरी याचकाला पैसा उचलून देण्याला हात धजत नाहीं. असलें शब्दज्ञान अवतरणांतर्गत ज्ञानयज्ञपदानें घ्यावयाचें नाहीं, तर आपपरभावाचा पूर्ण लोप होऊन 'वसुधैवकुटुंबकम्' अशी ज्याची स्थिति झाली आहे तोच खरा ज्ञानी ह्मणावयाचा. ही स्थितिं प्राप्त होण्याला अर्थातच प्रथम अहंकारादि मनोविकारांचा नाश केला पाहिजे, दुर्वासना टाकल्या पाहिजेत, व शमदमादिकांच्या योगानें मन स्वाधीन केलें पाहिजे. अर्थज्ञान करून घेणें ही ज्ञानार्जनाची पहिली पायरी होय; व तिचा "आत्मा वारेऽद्रष्टव्यः श्रोतव्यो मन्तव्यो निदिध्यासितव्यः" ह्या वाक्यांतील श्रोतव्यपदानें निर्देश केला आहे. अर्थश्रवण झाल्यानंतर त्याचें मनन केलें पाहिजे. तें मनन साध्य होण्याला अर्थात् चित्तविक्षेप करणाऱ्या सर्व वासना व मनोविकार दग्ध झाले पाहिजेत. मनन झाल्यानंतर एकाग्र चित्तानें ब्रह्माचें ध्यान केलें पाहिजे. आणि हें ध्यान श्रद्धायुक्त अंतःकरण असल्याशिवाय कधींही सिद्धीस जावयाचें नाहीं. येणेंप्रमाणें कित्येक दिवस निदिध्यास केल्यानंतर द्रष्टव्यपदानें बोधित केलेला आत्मसाक्षात्कार होतो. ज्याप्रमाणें आरशावरील मळ पुसला किंवा दीपावरील आवरण काढलें कीं, त्यांची स्वाभाविक स्वच्छता व तेजस्विता आपोआप व्यक्त होते, त्याचप्रमाणें हें अपरोक्ष ब्रह्मज्ञान मनननिदिध्यासांनीं भ्रमपरिवार दूर झाला कीं आपोआप प्रादुर्भूत होतें. पण श्रवण, मनन, निदिध्यास हीं श्रद्धा सदाचरण वगैरे गुणावांचून कधींही प्राप्त व्हावयाचीं नाहींत. "श्रद्धावांल्लभते ज्ञानं तत्परः संयतेंद्रियः। ज्ञानं लब्ध्वा परां शांतिमचिरेणाधिगच्छति॥" ह्या

भगवद्वचनांतील तात्पर्य हेंच आहे. "श्रेयो हि ज्ञानमभ्यासाज्ज्ञानाद्ध्यानं विशिष्यते । ध्यानात्कर्मफलत्यागस्त्यागाच्छांतिरनंतरम् ॥" ह्या वाक्यांतही तीच परंपरा निराळ्या तऱ्हेनें व्यक्त केली आहे. तात्पर्य, इतर धर्मांत व संप्रदायांत एक एका साधनावरच भिस्त ठेवलेली असते; पण वेदांतानें अपरोक्ष ज्ञानाचा उपदेश करून त्या सर्वांचा अंतर्भाव केला आहे. प्राचीनकाळीं ग्रीसदेशांत **डेल्फास** नामक देवालयावर Know Thyself ( स्वतःला जाण ) असें वाक्य लिहिलें होतें, त्याचें त्यावेळीं मोठमोठ्या पंडितांनाही गूढ पडलें होतें, 'आत्मावाऽऽरे द्रष्टव्यः' ह्या आमच्या औपनिषद वाक्याची त्यांना ओळख झाली असती तर त्यांच्या अंतःकरणांत तावडतोब प्रकाश पडून आज शेंकडों वर्षें यूरोपखंड जें अज्ञानांधकारांत चांचपडत आहे तें तसें खचित राहिलें नसतें. असो; झाली गोष्ट परत येत नाहीं. 'सत्यमेव जयते' हा सिद्धांत अबाधित असल्यामुळें कधीं तरी सर्व पृथ्वीवरील लोकांना सत्स्वरूप परब्रह्माची ओळख होईल ह्यांत शंका नाहीं. मात्र सहजावृत्त्या ती होण्यापेक्षां आह्मीं हिंदुलोकांनीं ती करून देणें ह्यांत आमचा विशेष पुरुषार्थ आहे. रोमनलोकांनीं ग्रीसदेश जिंकला तरी ग्रीकविद्येचा पगडा रोमनलोकांवर बसला; त्याचप्रमाणें हिंदुस्थानदेश सध्यां जरी परकीयांच्या ताब्यांत गेला असला, तरी तेणेंकरून हिंदुधर्माची युरोपांत छाप बसण्याला हरकत येणार नाहीं. इंग्रज लोकांनीं आमचीं शरीरेंच फक्त जिंकलीं आहेत; पण आपणाला सर्व युरोपियन व अमेरिकन राष्ट्रांचीं मनें जिंकावयाचीं आहेत हें हिंदुमात्रानें लक्षांत बाळगलें पाहिजे. पण स्वस्थ बसल्यानें हें साध्य व्हावें कसें ? लोकांना उपदेश करण्याची पात्रता येण्याला अगोदर आपली आपणालाच ओळख व्हावयाला नको काय ? दुसऱ्याचें अज्ञान घालवितां येण्यापूर्वीं स्वतःचें अज्ञान जावयाला नको

काय ? चंद्रबिंब घेऊं पाहणाऱ्या बाळकाप्रमाणें ईश्वर, आत्मा, मुक्ति इत्यादि अतींद्रिय परमगूढ वस्तूंविषयीं मनुष्यमात्राच्या हृदयांत स्वभावतःच उत्कट जिज्ञासा उत्पन्न होत असते; व तिजपासूनच सर्व धर्मप्रक्रिया व तत्त्वविचार ह्यांचा प्रादुर्भाव होतो. मी कोण आहें, आलों कोठून, जाणार कोठें वगैरे चिकट प्रश्न आयुष्यामध्यें प्रत्येक मनुष्याच्या अंतःकरणांत उद्भवून क्षणभर तरी वैराग्य उत्पन्न करतातच.

But for those obstinate questionings
Of sense and outward things,
Fallings from us, vanishings;
Misgivings blank, of a creature
Moving about in worlds not realized.*

ह्या वर्ड्स्वर्थकवीच्या प्रासादिक वाणीनें ग्रथित केलेल्या विचारांनीं मनुष्यमात्राचें अंतःकरण ग्रस्त झालेलें असतें, व ते ते विचार तो स्वसामर्थ्यानुरूप प्रदर्शितही करीत असतो. ह्या नियमाला अपवाद आढळल्यास तो ' स वै मुक्तोऽथवा पशुः ' ह्यापैकीं एकाद्या कोटींत घालावा लागेल. हल्लीं सर्व प्रकारच्या उदात्त विचारांना फांटा देऊन केवळ उदरपोषणादि देहधर्म उरकण्यांत गढून गेलेले आम्ही हिंदुलोक कोणत्या वर्गांत जाऊं ह्याचा ज्याचा त्यानें विचार करावा. सध्यां आम्ही महानिद्रेंत घोरत पडलों आहों; तींतून केव्हां जागे होऊं तेव्हां खरें.

---

* पण ते प्रत्यक्ष व बाह्यवस्तूसंबंधानें फिरफिरून उद्भवणारे प्रश्न, ते वयानुसारें उत्तरोत्तर विसरत जाणारे पूर्वजन्मार्जित संस्कार व नष्ट होणाऱ्या वासना, आणि काल्पनिक सृष्टीमध्यें संचार करणाऱ्या जीवाच्या अंतःकरणाला व्यापणारे दुरवगाह्य संशय हे आम्हाला दिल्याबद्दल मी परमेश्वराचे आभार मानतों.

तात्पर्य Plain living and high thinking are no more ( साधें आचरण व उदात्त विचार हीं समूळ नाहींशीं झालीं ) असें जें वर्डस्वर्थकवीनें फार हृदयद्रावक वर्णन केलें आहे तें हल्लींच्या आमच्या स्थितीस पूर्णपणें लागू पडतें.

असो. ह्या सच्चिदानंद ब्रह्मविषयक विचारांत दोन महिने घालवितां आल्यानें आह्मांस तर परम समाधान वाटत आहे. वाचकांना कंटाळा आला असल्यास तसदी दिल्याबद्दल माफी मागून ही अद्वैतमीमांसाष्टाध्यायी पुरी करतों.